म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बाळ-वाङ्मय
दा. क्र. ६३६८

# भारतांतील आजचा राजकीय दृष्टिकोन

## निवडणुकीपूर्वीची चिकित्सा

IRBK-0106368

संपादक
जे. आर्. चंद्रन
एम्. एम्. टॉमस

सामाजिक प्रश्नविषयक वाङ्मय समिति
बंगलूर
१९५७

# भारतांतील
# आजचा राजकीय दृष्टिकोन

निवडणुकींपूर्वीची चिकित्सा

अ. क्र. ..६३९८ ता. दि. ........
वि. ...........

लेखक

एस. पी. अप्पास्वामी
जे. आर. चंद्रन
व्ही. हेनरी देवदास
एडविन् देवदासन
व्हिक्टर कोइलपिल्ले
ख्रिस्तोफर कुरिन
ई. व्ही. मॅथ्यु
एम्. एम्. टॉमस
जे. वेदशिरोमणी

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम
दि. ता.
क्रमां.
नों. दि.

IRBK-0106368

सामाजिक प्रश्नविषयक वाङ्मय समिति
बंगलूर

किंमत १ रुपाया

# POLITICAL OUTLOOK IN INDIA TODAY

(Marathi)

*First Impression 1977*

Printed by V P Bhagwat at Mouj Printing Bureau Khatau Wadi Girgaon Bombay 4 and Published for the Committee for Literature on Social Concerns by S D Karandikar Secretary the Bombay Tract & Book Society 84 Sankli Street Byculla Bombay 8

# प्रस्तावना

पुन्हा एकदा आपला देश निवडणुकांची तयारी करीत आहे. आपलें सरकार निवडून देण्यासाठीं आपण लवकरच मतदान करणार आहोत.

गेल्या सार्वजनिक निवडणुकांमध्ये लोकांनीं ज्या प्रकारें भाग घेतला त्यावरून पार्लमेंटरी पद्धतीच्या लोकशाहीला आमच्या देशाची अतीव पात्रता दिसून आली. त्यानंतरच्या काळात राष्ट्रीय विकास साधू इच्छिणाऱ्या नवलोकशाहीला आणि आंतरराष्ट्रीय शांततेविषयीं काळजी बाळगणाऱ्या स्वतंत्र सार्वभौम राज्याला कोणकोणते प्रश्न हाताळावे लागतात याचा आम्हाला बराच अनुभव मिळाला आहे. माणसाप्रमाणेच राष्ट्रेंहि अनुभवानेंच शहाणीं होत असतात. तेव्हा आमच्या लोकशाहीची प्रगति कोठवर आली आहे हें येत्या निवडणुकांवरून चांगल्या प्रकारें दिसून येईल. त्याचें महत्त्व निवडणूकयंत्रणा कशा रीतीनें काम देते यावरून नव्हे, तर लोक आपली निवड कशी काय करतात यावरून अजमाविण्यात येईल.

निधर्मी राज्यातील इतर नागरिकांप्रमाणे ख्रिस्ती लोकांनींहि देशाच्या राजकारणात पूर्णपणें भाग घेण्याचें आणि विशेषकरून निवडणुकांत आपली जबाबदारी ओळखून मतदान करण्याचें अगत्य आहे अशा विश्वासानें हें पुस्तक लिहिलें आहे. आपल्यासाठीं काही विशिष्ट हक्क मिळविणें अशी ख्रिस्ती लोकांची राजकारणी भूमिका नाही. उलट पक्षीं एकंदर राष्ट्राचें कल्याण आणि जगातील राष्ट्रांमध्ये न्यायनिष्ठ शांतता राखण्याचें कार्य ही साध्य करण्याची जबाबदारी ओळखून वागणे त्यांचें कर्तव्य आहे. आपल्या देशाचा भूतपूर्व वारसा मोलवान व आजचीं राष्ट्रीय उद्दिष्टें उच्च आहेत आणि अशा देशाचे आपण नागरिक आहोत ही गोष्ट ख्रिस्ती लोकांना अभिमानास्पद वाटते. निधर्मी लोकशाही राज्याचा आदर्श एक मौलिक परंपरा असून भारतीय समाजामध्यें स्वातंत्र्याला बाध न आणता ऐक्य निर्माण करून ते जतन व्हावें आणि न्यायानुसार सुव्यवस्था राखली जावी एतदर्थ त्याला उचलून धरून त्याचा विकास करणें आवश्यक आहे. राष्ट्राच्या मोठेपणाचा अभिमान तर बाळगला पाहिजेच. पण त्यासोबत देशाचें लगोलग वा कालांतरानें नुकसान करतील अशा शक्ति किंवा चळवळीं यावर सक्त नजर ठेविली पाहिजे. ख्रिस्ती मतदारानें आपला उमेदवार वा पक्ष समजून उमजून निवडावा म्हणून त्याच्यापुढें निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या भूमिका मांडणें हा या पुस्तकाचा उद्देश आहे. काहीं ख्रिस्ती लोक ह्या ना त्या पक्षाचे

सभासद असतील आणि त्या नात्याने त्यांना राजकारणात अधिक सक्रिय भाग घेणे प्राप्त आहे, अशानांहि विचारपूर्वक निर्णय घेण्यास उपयुक्त होईल अशी संशोधनसामुग्री या पुस्तकांत आढळेल.

येथें जे कांहीं मांडलें आहे तें एका प्रातिनिधिक ख्रिस्ती गटाचे एकत्र केलेले अभ्यासपूर्ण विचार आहेत. ही मराठी आवृत्ति थोडीबहुत संक्षेपानें निवत आहे, पण यांत महत्त्वाचें कांहीं वगळण्यांत आलेलें नाहीं अशी आशा आहे. एक गोष्ट आम्ही स्पष्ट करूं इच्छितो की, या पुस्तकांत व्यक्त झालेल्या मतांना लेखकच सर्वस्वी जबाबदार आहेत, लेखकांचा संबंध आहे अशा संस्थांचीं व संघटनांचीं किंवा सामाजिक प्रश्नविषयक वाङ्मय समितीचीं तीं मतें मानण्यांत येऊं नयेत. एकंदरींत पाहतां हें पुस्तक म्हणजे लेखक आणि त्यांचे कांहीं मित्र यांच्या मतांचा परिपाक होय.

**जे. आर. चन्द्रन**
**एम्. एम्. टॉमस**
संपादक

## ह्या पुस्तकाचे साहाय्यकारी लेखक

**एस् पी अप्पास्वामी**, चिटणीस, वाङ्मयशाखा, भारत व सिलोन वाय् एम्. सी. ए. समिति, बंगलूर.

**जे. आर. चंद्रन**, प्राचार्य, युनायटेड थिऑलॉजिकल कॉलेज, बंगलूर.

**व्ही. हेनरी देवदास**, चिटणीस, वाय. एम्. सी ए., मुंबई.

**एडविन देवदासन**, ऑरगनायझिंग सेक्रेटरी, एन्. सी. सी. रिलीफ कमिटी, न्यू दिल्ली.

**व्हिक्टर कोइलपिल्ले**, संपादक, द गार्डियन, मद्रास.

**ख्रिस्तोफर कुरिन**, लेक्चरर, अर्थशास्त्रशाखा, मद्रास ख्रिश्चन कॉलेज, तांबरम्.

**ई. व्ही. मॅथ्यु**. ॲडव्होकेट, बंगलूर.

**एम्. एम्. टॉमस**, संपादकीय चिटणीस, सामाजिक प्रश्न विषयक वाङ्मय समिति, त्रिवेंद्रम.

**जे. वेदशिरोमणी**, प्राचार्य, सेंट जॉन्स कॉलेज, पालमकोट्टा

ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ३०८५५
वा. क्र. २५६५
दि. ४-८-६१

१

# लोकशाहींतील निवडणुकी

वादविवाद आणि संमतिद्वारा राज्य म्हणजे लोकशाही. हिच्यात राजकीय सत्तेसंबधीं अंतिम निर्णय जनतेच्या हातीं राखून ठेवलेला असतो. लोकशाही राज्यपद्धतींत राजकीय प्रश्नाविषयीं वादविवाद करण्याची व आपलें मत प्रदर्शित करण्याची संधि जनतेला मिळाली पाहिजे. वृत्तसंस्था, सार्वजनिक सभा, आणि पार्लमेंट अशा काहीं संस्थांच्या द्वारें लोकमत व्यक्त होत असतें. या संस्था कायम स्वरूपाच्या आहेत. निवडणुकींचे प्रसंग मात्र असे असतात कीं, त्यावेळीं लोक आपलें सरकार निवडून देण्याचा अधिकार उपयोगांत आणून आपलें निर्णायक मत व्यक्त करितात. राज्यें आणि केंद्र येथील विधान सभामध्यें बसण्या साठीं लोक आपले प्रतिनिधि काहीं मुदतीसाठीं या पद्धतीनें निवडून देतात. ही मुदत साधारणपणें पाच वर्षांची असते. विधान सभेत जो पक्ष बहुसंख्य असेल तो आपलें सरकार बनवितो. म्हणजे निवडणुकींच्या मार्गानें आपल्याला हवें असलेलें सरकार निवडण्यात येत असतें. मतदार स्त्रीपुरुष आपला मतदानाचा अधिकार बजाविण्यात ज्याप्रकारें आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवतील त्या प्रकारचेंच सरकार ते निवडून देतील. इतर कोणत्याहि राज्यपद्धतींपेक्षां लोकशाहीत लोकांना त्यांच्या लायकीसारखेंच सरकार मिळत असतें.

## मताधिकाराचें वैशिष्ट्य

भारतांत राजकीय प्रौढ मताधिकार अलिकडेच प्राप्त झाला आहे. खरें पाहता ब्रिटिशाचा आमच्याशी संबंध आल्यावर "लोकशाही संस्थाना" सुरुवात झाली ती वाढता वाढता कालांतरानें तिचें पर्यवसान प्रौढ मताधिकारात झालें. ग्राम-पंचायतीसारख्या सामाजिक आणि जातीय संस्थामध्यें लोकशाहीची परंपरा भारतात पूर्वीपासून होती यांत संशय नाहीं, पण स्वातंत्र्यासाठीं राष्ट्रीय लढ्यांत जनतेन

भाग घेतल्यामुळे आणि त्यांतून राजकीय जागृति निर्माण झाल्यामुळे सार्वत्रिक मतदानाचा अधिकार प्रत्येकाला असला पाहिजे अशी मागणी प्रामुख्यानें पुढे आली. पश्चिमेंत शेकडो वर्षे झगडत राहून जे मिळालें तें आम्हाला स्वातंत्र्य लढ्याच्याद्वारें प्राप्त झालें.

सार्वत्रिक प्रौढ मतदानाचें तत्त्व मान्य केल्यानें नैतिक दृष्ट्या सर्व स्त्री-पुरुषांची योग्यता सारखीच आहे असा विश्वास आपोआप व्यक्त होतो. ह्या दृष्टीनें पाहू जातां कायद्यासमोर सगळे समान आहेत हें जे लोकशाहींतील एक सर्वमान्य तत्त्व त्याचें ही राजकीय समानता स्वाभाविकपणें आवश्यक अंग ठरतें. एक राजकारण तज्ज्ञ म्हणतो, "मतदानाची पद्धति वास्तविक एक यंत्रणाच आहे. मनुष्याचें मनुष्यत्व व्यक्त करण्याची ती एक पद्धति आहे. तिचा उपयोग करणें म्हणजे आपला स्वाभाविक हक्क बजावणें असें म्हणतां येणार नाहीं. मनुष्याच्या जीवनविषयक आशाआकांक्षांच्या आवर्तांत त्यानें काहीं अचूक पद्धतीनें आपलें व्यक्तिमत्व प्रगट करावें हा स्वाभाविक हक्काचा अर्थ होय."

यावरून मतदान निर्बंध करतां आलें पाहिजे या तत्त्वावर स्थापिलेल्या आमच्यासारख्या कोणत्याहि लोकशाहीत मताचा अर्थ अमुक उमेदवार मान्य किंवा अमान्य ठरविणें एवढाच नव्हे, तर त्यापेक्षां अधिक आहे. मतदाराचें व्यक्तिमत्त्व, त्याची प्रतिष्ठा आणि त्याच्या निष्ठा ह्या त्याच्या मतदानावरून दिसून येतात. तेव्हां मतदान करायचें तें एका उमेदवाराला किंवा पक्षाला निवडून आणण्याकरितां नव्हे; एखाद्या विशिष्ट पक्षाला बहुमत मिळून त्यानें सरकार स्थापावें ह्याहि हेतूनें मतदान करायचें नाहीं. उलटपक्षीं काळजीपूर्वक विचार करून एक जरा मत दिलेलें असलें तरी त्यावरून कांहीं विशिष्ट प्रश्नाविषयीं मतदाराचा दृष्टिकोन काय आहे हें दिसून येईल. मग तें मत ज्या उमेदवाराला दिलें असेल तो निवडून आला न आला सारखेंच होय. आणि मत जेव्हां उमेदवाराला पाहून नव्हे, तर पक्षासाठीं देण्यांत येतें तेव्हां तर हें विशेषेंकरून खरें आहे. तेव्हां एखादा उमेदवार किंवा पक्ष निवडून येण्याची खातरी नसतानाहि त्याला मत देणें हा वेडेपणा होत नाहीं.

अगदीं राजकारणाच्या दृष्टीनें पाहिलें तरी लोकशाहींतील निवडणुकी कोणत्याहि एका पक्षाचें सरकार बनविण्यापुरत्याच नसतात. तर त्यावरून नागरिकासमोर

असलेल्या प्रश्नांविषयीं त्यांची मतें काय आहेत हे अजमावून घेणे हाहि त्याचा हेतु असतो. आपल्या मताचा जय होण्याची जरी आशा नसली तरीहि आपली बाजू विचारपूर्वक मांडणे हे विचार न करता स्वस्थ बसण्यापेक्षा केव्हाहि चांगले. एखाद्या अल्पसंख्य गटानें आपल्या निष्ठांचा पाठपुरावा निश्चयपूर्वक केला तर कालांतरानें त्यांना पाठिंबा मिळण्याची शक्यता असते. आज सर्वमान्य झालेल्या पुष्कळ कल्पना व तत्त्वें--यांत लोकशाहीचाहि समावेश आहे—अशाप्रकारें दीर्घ प्रयत्न केल्यावरच मान्यता पावलीं आहेत हे इतिहासावरून सहज सिद्ध होण्यासारखे आहे.

निवडणुकींबाबत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. तो हा की, निवडणुकीचा निकाल म्हणजे नोंदविण्यांत आलेल्या मतांची मोजदाद आणि गोळाबेरीज नव्हे, तर अनेक नागरिकांच्या मतांचें दिग्दर्शन होय.

आधुनिक राज्यांत जनमताचें महत्त्व किती आहे हें कांहीं उदाहरणांवरून दिसून येईल. १९५४ सालीं आंध्रराज्याच्या निवडणुकी झाल्या. त्यावेळीं साम्यवादी पक्ष फार मोठ्या बहुमतानें निवडून येईल असें मत भारतांत आणि भारताबाहेरहि प्रगट करण्यांत आलें होतें. याला कारणेंहि तशींच बलवत्तर होतीं. विशेष म्हणजे असें कीं, १९४७ मधली कॉंग्रेसपक्षाची धडाडी लुप्तप्राय झाली होती. आणि राष्ट्रास नवीन आव्हान करण्यास कॉंग्रेसच्या आवडी अधिवेशनांत नुकतीच कुठं सुरवात झाली होती. तथापि कॉंग्रेसच बहुमतानें निवडून देण्यात आली. लोकमताचा कौल कोणत्या बाजूला पडेल हे सांगणें अशक्य असतें ह्याचें आणखी एक उदाहरण म्हणजे सिलोनमध्ये नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकी. युनायटेड नॅशनल पक्ष कोसळून पडेल असा कयास बहुतेक राजकारणपटूंनीं केला नव्हता. हिंदु कोडबिलाचा पुरस्कार भारतांत प्रथमच झाला तेव्हां सत्ताधारी पक्षांतील एका प्रभावी गटानें त्याला विरोध केला होता. पण शेवटीं महिलांच्या दडपणानें म्हणा वा इतर कांहीं कारणासाठीं म्हणा, पार्लमेंटला हा प्रश्न गंभीरपणें हातीं घेणें भाग पडलें. अखिल भारतीय महिला परिषद आणि महिलांच्या इतर कांहीं संस्था यांनीं एकामागून एक ठराव संमत करून विवाह आणि वारसाहक्क याबाबतींत स्त्रियांना पुरुषांबरोबर समानतेचे हक्क मिळतील असे कायदे करण्याची जोराची मागणी केली. आणि ह्या मागणीला स्त्रियांचा एवढा पाठिंबा मिळाला

कीं आपल्या विधिमंडळाच्या सभासदांना या प्रश्नाकडे लक्ष पुरविण्यावाचून गत्यंतर उरलें नाहीं.

वरील उदाहरणावरून दोन गोष्टी दिसून येतात. पहिली ही कीं, निवडणुकींत एकेका मतदाराचें स्वतंत्र मत मतदानाच्याद्वारें व्यक्त होऊं शकतें, दुसरी ही कीं, लोकशाहीमध्यें निवडणुकींच्या वेळींच नव्हे तर इतर वेळींहि लोकमत व्यक्त होऊं शकतें. इतकेंच केवळ नव्हे तर निवणुकींमध्यें मतदान जबाबदारपणें व्हायचें असेल तर निवडणुकींबाहेर लोकमत तयार करणें अत्यंत जरुरीचें आहे हें यावरून सिद्ध होतें.

मताधिकाराचा हा विशेष लक्षांत घेतां निवडणुकीचा खरा हेतु सफल होत आहे कीं नाहीं ह्याकडे लोकशाहीनें लक्ष पुरविणें महत्त्वाचें आहे ही गोष्ट प्रकर्षानें लक्षांत येते.

निवडणुकी सार्थ आहेत कीं नाहीं हें ठरविण्यापूर्वी निदान तीन गोष्टींची चिकित्सा होणें अगत्याचें आहे.

१. निवडणुकी घेण्यासाठीं योग्य व्यवस्था करण्यांत आली आहे का आणि ही व्यवस्था एतद्विषयक राष्ट्रीय हेतुसिद्धीला पुरेशी आहे काय?

२. उमेदवार व कार्यक्रम यांतून निवड करायला लोकांना वाव देण्यांत आला आहे काय?

३. जबाबदारपणें निर्णय घेण्याची मतदाराची पात्रता आहे काय?

## निवडणुकींची यंत्रणा

मतदानपद्धतीचा इतिहास हा विशाल व गुंतागुंतीचा विषय आहे. निवडणुकींच्या बाबतींत निरनिराळ्या राज्यांचा जो कांहीं अनुभव असेल त्यांतून कांहींहि निष्पन्न होवो, एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, अनेक प्रकारचे गट निवडणुकी आपल्याला अनुकूल व्हाव्यात म्हणून युक्तायुक्त मार्गांनीं प्रयत्न करीत असतात, अर्थात् प्रत्येक मतदाराचें स्वातंत्र्य अबाधित राहील अशी खबरदारी घेण्यात आली पाहिजे.

आपल्या देशांत आपण नुकतें कुटुंब एकत्रकुटुंबपद्धति आणि जातपातविषयक सत्तापरंपरेंतून बाहेर पडत आहोंत. तेव्हां प्रत्येक व्यक्तीनें स्वतः निर्णय

घेण्याबद्दलची जाणीव समाजात अगदी कमी दिसून येत असली तर तें अगदी स्वाभाविक आहे. समाजरचनेंत दूरगामी व मूलभूत बदल घडून आला तरच ह्या स्थितींत म्हणावा असा फरक पडणार आहे. तरीहि जुने ऋणानुबंध आणि सहानुभूति यांचा निवडणुकीच्या वेळीं गैरवाजवी फायदा करून घेणें कसें शक्य असतें हे लोकांना कळून येणें महत्त्वाचें आहे. दुसरें कांहीहि करता आलें नाहीं तरी जात, धर्म आणि भाषा एतद्विषयक निष्ठांचा गैरफायदा घेऊं पाहणाऱ्या पक्षांना पाठिंबा देण्यास नकार देणें आणि त्यांच्यावर टीकेची झोड उठविणें एवढें तरी आपणास करतां येण्यासारखें आहे. कोणत्याहि दरिद्री देशांत अधिक पैसे देणाऱ्याला आपलें मत विकण्याचा मोह होणें शक्य आहे. पण लोकशाही संस्थांच्या मूलभूत रचनेचें अशा प्रकारचें विध्वंसन जर होत असेल तर सरकार व साधारण जनता यांनीं कोणत्या ना कोणत्या तरी उपायानें त्यांना प्रतिकार केला पाहिजे.

इतर देशांतल्याप्रमाणें भारतांतहि उमेदवाराच्या निवडणूकखर्चाला कायद्यानें मर्यादा घातली असून खर्चाचा रीतसर हिशेब सादर करणें अवश्य आहे. मतें मिळविण्यासाठीं पैशाचा वाममार्गानें उपयोग करण्यात येऊं नये म्हणून वास्तविक ही खबरदारी घेण्यांत आली आहे. पण व्यवहारांत प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीनें पैशाचा प्रभाव पडतच असतो. उदाहरणार्थ, एखादें खेडें, समाज किंवा संस्था यांच्या आर्थिक वा इतर फायद्यासाठीं सामुदायिक रीतीनें मतें विकल्याचीं उदाहरणें घडलीं आहेत. भारतात निवडणूक मंडळाचें कार्य स्वतंत्रपणे चालत असून त्यांनीं अशा प्रकारचे बरेच अपप्रकार चव्हाट्यावर आणले आहेत. मतदारावर उघडपणें वा गुप्तरीतीनें जी जबरदस्ती करण्यांत येते तिचा योग्य परामर्श घेण्यासाठीं हल्लीं चालू आहे त्यापेक्षां अधिक कडक कायद्याची फार जरुरी आहे.

निर्वेध आणि प्रामाणिक निवडणुकींना वातावरण अनुकूल राखण्याविषयीं भारत सरकारानें आजपर्यंत फार जागरूकता दाखविली आहे. सत्ताधारी पक्षानें सरकारी यंत्रणेचा उपयोग आपल्या फायद्यासाठीं करून घेतल्याच्या तक्रारी विरोधी पक्षांनीं केल्या असल्या तरी एकंदरीनें त्यांनीं निवडणूकयंत्रणेच्या निःपक्षपातीपणाबद्दल विश्वासच प्रगट केला आहे.

निवडणुकीपूर्वी मतें मिळविण्याची खटपट विनाअडथळा करण्याची सधी प्रतिस्पर्धी पक्षांना देण्यांत येत असते, मात्र निवडणुकीला सुरुवात होण्यापूर्वी

चोवीस तास मतें मिळविण्यास अर्ज करण्यात येतें. निवडणुकीवर देखरेख ठेवण्यास आणि मतमोजणी करण्यासाठीं पुरेसे निवडणूक अधिकारी नेमण्यात येत असतात निवडणुकी चालू असताना, विशेषेकरून मतमोजणी चालू असताना तिच्यावर नजर ठेवण्याची संधि मतदारांचे प्रतिनिधि, वृत्तसंस्था व साधारण जनता यांना देण्यात येते प्रत्येक मतदाराला आपलें मत गुप्तपणे नोंदता येईल अशा प्रकारची व्यवस्था करण्यात येते.

निवडणूकयंत्रणेतील तंत्र सांभाळलेंच पाहिजे अशी मागणी करणें जरूरीचें आहे. परंतु हें तंत्र इतकें गुंतागुंतीचे आहे कीं, कित्येक बाबतींत सत्प्रवृत्त उमेदवार आणि मतदार यांना तें जाचक ठरलें आहे या अनुभवाचा फायदा घेऊन निवडणूक यंत्रणा कांहींशी सुटसुटीत करण्यात आली आहे. त्यामुळें निवडणुकी अधिक निर्बंधपणें घेता येतील आणि त्या अधिक निर्दोष होतील अशी आशा आहे.

भ्रष्टाकार आणि जबरदस्ती यांचें प्राबल्य दूर ठेवण्यासाठीं कडक उपाययोजना करण्याची सक्त जरूरी आहे हेंच ह्यावरून दिसून येतं. निवडणुकींत प्रामाणिकपणा आणण्याचा पक्षोपपक्षांत करार होऊन राष्ट्रीय ध्येयाविषयींची निष्ठा राखण्याचा प्रयत्न निखालस अपक्षीय भूमिकेवरून जर झाला, तर निर्वधता आणि प्रामाणिकपणा यांच्या यंत्रणेस तो उपकारक होईल.

## योग्य मतदार आणि समुचित धोरणें

निवडणुकींत कोणत्याहि राज्याला समाधानकारक पार्लमेंट जर लाभलें नाहीं तर देशांतील राजकीय संस्थांना योग्य उमेदवार व समुचित धोरणें निर्माण करतां आली नाहींत असें म्हणावें लागेल उमेदवार म्हणून पुढें येणारे वा येऊ शकणारे लोक जर हीनकर्तृत्व असले तर लोकशाही राज्य-यंत्रणा चालू ठेवणें अतिशय जिकिरीचें होतें. निवडणुकींना उभे राहणारे नुसते महत्त्वाकांक्षी आणि पदलोलुप असतात असा अनुभव लोकांना वेळोवेळीं येण्याचा संभव आहे. याचीं कारणं शोधून काढणें जरूरीचें आहे. स्वातंत्र्यासाठीं जो राष्ट्रीय लढा देण्यात आला त्यात राजकारणी लोकांकडून, हालअपेष्टा सोसणें, स्वार्थत्याग आणि सेवावृत्ति यांची अपेक्षा करण्यात येत असे. पण आज स्वार्थपरायण लोक सत्तेच्या भागीदारीसाठीं धावधुडया करीत आहेत. किंवा असेंहि म्हणता येईल कीं, शासनसंस्था, न्यायखातें आणि

विश्वविद्यालयें यात समाजातील बुद्धिमतांचा भरणा करण्यात आलेला आहे. शिवाय आपला निवडणुकींचा खर्च करण्याची ज्याची पात्रता असेल असा उमेदवार विशिष्ट राज्यात तरी लायक लोकांना निवडणुकीस उभे राहणे अशक्य करतो हेंहि एक कारण असू शकेल. स्थानिक निवडणुकींकडे पाहिले तर लायक उमेदवाराचा जो अभाव दिसून येतो त्याचे कारण खेड्यांतून शहराकडे जी रीघ लागलेली असते तीहि असू शकेल. याचे आणखीहि एक कारण संभवते. ते हें कीं, पुढारीपणाला लायक असलेली माणसें आणि साधारण जनता यांच्यामध्ये परस्पराविषयीं सहानुभूति व विश्वास यांचा अभाव असतो. हे अंतर धोकादायक असते आणि जिथे सुशिक्षितांचें प्रमाण अल्प असते अशा समाजात हा धोका निर्माण होण्याचा संभव अधिक असतो. लायक उमेदवार न मिळण्याची कारणे शोधून त्यांचे विश्लेषण केलें तर समाजरचना, वैयक्तिक जबाबदारीच्या जाणिवेची वाढ, पुढारीपणासाठीं लायक बनवील असे शिक्षण अशासारख्या गोष्टींवर भर देऊन समाजाचें जीवन सुदृढ केल्याशिवाय जबाबदारपद्धतीच्या निवडणुकी घेणे शक्य नाहीं असें म्हणणे भाग पडेल

तथापि लायक उमेदवार असूनच काहीं भागत नाही. आधुनिक लोकशाही राज्यांना सुदृढ आणि निर्दोष पक्षांची गरज आहे. स्वतंत्र उमेदवाराला स्थान नाहीं असें नाहीं, पण मजबूत पक्ष असल्याशिवाय त्याचें तेज पडत नाहीं. उलटपक्षीं, जेथ मजबूत पक्ष असतील तेथें पक्षाचे राजकारण आपल्या मुठींत ठेवू पाहणाऱ्या घमेंडखोरांना जाब विचारण्यासाठी आणि स्वतंत्र विचाराची गळचेपी आणि पक्षांतर्गत ऐक्यासाठी व्यक्तींना दडपून टाकण्याची प्रवृत्ति जेथे बोकाळत असेल तेथे त्यांना टणटणीत विरोध करण्यासाठी काहीं स्वतंत्र सभासद असणें अवश्य आहे.

तथापि सांप्रत भारतात धोका आहे तो स्वतंत्र विचारांना राजकारणात थारा मिळणार नाहीं हा नाहीं, तर मजबूत पक्ष निर्माण होणार नाहीत हा होय. दुही आणि शिस्तभंग यांचा विचार केला तर काँग्रेस पक्ष सुद्धा असावा तितका मजबूत नाहीं असें म्हणावें लागते. आणि विरोधी पक्षाची भूमिका वठवील असा एखादा मजबूत लोकशाही पक्ष निर्माण होण्याची चिन्हें आज तरी दिसत येत नाहीत आहेत ते नुसते दुर्बळ फुटीर गट आहेत

कोणत्याहि पक्षाचे सामर्थ्य आणि त्याच्या उमेदवारांची गुणवत्ता, बव्हंशानें उमेदवाराना द्रव्यसाहाय्य कशाप्रकारें करण्यात येते, यावर अवलंबून आहे. कांहीं थोड्या धनिकाच्या बहुमोल देणग्यांवर अवलबून राहणारा आणि आपल्या उमेदवारांनीं आपापल्या निवडणुकीचा खर्च करावा अशी अपेक्षा करणारा पक्ष सुदृढ होणें अगदीं अशक्य आहे. कामचलाऊ उपाय म्हणून ह्या पद्धतींचा अवलंब पक्षाना करावा लागला आहे. पण आता त्या सोडून देण्याची वेळ आली आहे. राजकीय पक्षाच्या निधीना साधारण माणसानीं हातभार लाविला तर भारतांत लोकशाहीला जितकी सुदृढता येईल तितकी दुसऱ्या कशानेहि येणार नाहीं. दुसऱ्याच्या उमेदवारीचा खर्च उचलायला लोक कोठवर तयार आहेत यावरून लोकानीं लोकशाहीची तत्त्वप्रणाली कोठवर स्वीकारली आहे हें दिसून येईल

कोणत्या परिस्थितींत मजबूत राजकीय पक्ष जन्मास येतात याचा ऊहापोह करण्यास येथें सवड नाहीं. पुष्कळ गुतागुतीच्या गमकाचा विचार करावा लागणार आहे. पण एवढें मात्र म्हणता येईल कीं, राजकीय प्रश्नावर सर्वांना मत प्रगट करण्यासाठीं आणि लोकमताला वळण लागावें म्हणून त्याना शिक्षण देण्यासाठीं दळणवळणाच्या साधनाचा उपयोग करण्यात यावा म्हणून उत्तेजन देण्यात आले पाहिजे. राजकीय प्रश्नावर चर्चा करण्यास जेथें उत्तेजन देण्यात येत नसेल किंवा मज्जाव होत असेल किंवा लोकच जेथे राजकीय ज्ञान संपादण्यास तयार नसतील, तेथें भरीव पक्षकार्यक्रम तयार होण्याची मुळींच शक्यता नाहीं.

## माहितगार मतदार

मतदारानी निर्णय घेण्याची वेळ आल्यावर नेत्रदीपक प्रचार करून निवडणुकींत जय किंवा अपजय येणें ही दु:खदायक गोष्ट आहे. ह्या बाबतीत योग्य अशी तरतूद करता येईल अशी कायद्यात कांहीं व्यवस्था नाहीं. अशा प्रचाराचा कमींत कमी परिणाम व्हावा असे जर वाटत असेल तर माहितगार आणि राजकीय बाबतींत सुजाण मतदार वर्ग निर्माण करूनच तें साध्य होईल. शिक्षणाच्या ह्या कार्यक्रमात राजकीय पक्षाचा फार उपयोग होण्यासारखा आहे. राजकीय पक्षाच्या कार्यांचें स्वरूप समजून घ्यायला त्या त्या पक्षाच्या जीवनात प्रत्यक्ष भाग घेणें हा उत्तम मार्ग होय. लोकानीं राजकीय पक्षाचे सभासद व्हावें आणि पक्षकार्याला साहाय्य करावें म्हणून त्याना उत्तेजन देणें महत्त्वाचें आहे. स्थानिक मतदार

मंचात राजकारणाची चर्चा जर चालू ठेविली नाहीं तर कोणत्याहि पक्षाची विचार प्रणाली निःसत्व होईल. उलटपक्षीं जागरूक स्थानिक पक्ष इतर मतदाराचें लक्ष आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न करीत राहील आणि अशा प्रकारें चालू घडामोडींचा आणि राजकीय मतांचा परिचय करून घेण्यास त्याना प्रोत्साहन देईल.

एक गोष्ट मात्र खरी कीं, कोणत्याहि पक्षाच्या सभासदाची संख्या अल्पच असणार. पण एका दृष्टीनें हें हितावहच आहे. कारण बहुसंख्य मतदाराना पक्षांविषयीं फारशी आस्था नाही आणि पक्षांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन चेष्टेचा आहे याची जाणीव पक्षांना जेव्हा होईल तेव्हा पक्षउत्साहाला आणि अतिरेकाला त्याच्यामुळें आपोआप पायबंद पडेल. पण एकटर जनताच जर राजकीय पक्षाविषयीं उदासीन असेल तर मग ती बाब फार गंभीर समजली पाहिजे. लोकांच्या उदासीनतेला कारण मिळू नये म्हणून पक्षानीं आपली जबाबदारी ओळखून वागलें पाहिजे. वृत्तसंस्था आणि नभोवाणी यानींहि आपली राजकीय भाष्यें जबाबदारपणानें केलीं पाहिजेत.

आपणावर राज्य कशाप्रकारें करण्यात येत आहे आणि राज्यकारभारात आपणास भाग कसा घेता येईल याचें ज्ञान स्त्री-पुरुषाना व्हावें म्हणून प्रदर्शनें व्याख्यानमाला, वादविवाद आणि ग्रंथप्रकाशन याच्या द्वारा त्याना शिक्षण देण्याचें कार्य सरकार आणि खाजगी संस्था यानीं करणें अत्यंत आवश्यक आहे.

आपण ह्या किंवा त्या उमेदवाराला ज्या कारणासाठीं मत देत असतों अशीं कारणें अनेक आहेत. सुजाण मतदाराला राजकीय निर्णय–प्रवृत्त करणाऱ्या किंवा ज्यानीं त्याला प्रवृत्त केलें पाहिजे अशा ज्या कांहीं चांगल्या गोष्टी आहेत त्यांपैकीं तीन महत्त्वाच्या आहेत. ज्ञानप्रधान आत्महित, चालू घटनाचें ज्ञान आणि इतिहासाची जाणीव.

"मी, माझें कुटुंब आणि माझी जात" यानाच हितकर होईल अशा प्रकारचा राजकीय निर्णय घेण्याकडे आपली जी सहज प्रवृत्ति होते तिचा आपण धिक्कार केला पाहिजे, पण तो सयुक्तिक कारणासाठीं केला पाहिजे. लोकांविषयींच्या आस्थेवाईकपणानें जे निर्णय घेण्यांत येतात ते वैचारिक कारणासाठीं घेतलेल्या निर्णयांपेक्षा अधिक निर्दोष असतात. राजकारणांत आत्महिताला स्थान आहेच. पण ज्या मानानें एखाद्या विशिष्ट लहानमोठ्या समाजाशीं आपला संबंध आहे

असे आपणास वाटत असेल त्या मानानें हे आत्महित आपल्यापुरतेंच किंवा काहींशा विस्तृत लोकसभारापुरतें मर्यादित असलें पाहिजे. दोगाई आणि घातुक आहे तें म्हणजे, आपण आपल्या दैनंदिन व्यवहारात लोकांच्या बऱ्याच मोठ्या परिसरावर वास्तविक अवलंबून असताना आपल्या लोकांविषयींच्या आस्थेचे क्षेत्र एका अगदी सङ्कुचित परिसरापुरतेंच मर्यादित करणे. आज भारतांत आपले प्रत्येकाचे हितसंबंध सर्वांच्या हितसंबंधाशी गुंतलेले आहेत, आणि भारताचे हित एकंदर मानवजातीच्या हिताशीं गुंतलेलें आहे. व्यापक समाजाच्या एकतेच्या संदर्भात आत्महिताला वाव देण्यात आला पाहिजे. आत्महिताचे उज्ज्वलीकरण झालें पाहिजे.

कोणत्याहि राजकीय घटनेचे चित्र रेखाटताना किंवा कोणत्याहि राजकीय प्रश्नाविषयीं चर्चा करीत असताना आपणास एका गोष्टीचा विसर पडता कामा नये. ती गोष्ट ही कीं आपणासारख्याच मानवी भावना असलेल्या लोकांचे विविध व परस्परविरोधी हितसंबंध त्यात गुंतलेले आहेत. आपल्या परिसराच्या बाहेरील लोकांविषयीं काल्पनिक सहानुभूति जरी बाळगली तरी तिच्यामुळें आपल्या राजकीय निर्णयाला एक प्रकारची धार आणि गुणवत्ता प्राप्त होईल.

आमच्या राजकीय मतावर व निर्णयावर वर्तमानपत्रांची छाप पडते. आणि असे होणे स्वाभाविक आहे. राष्ट्रात आणि जगात ज्यांच्याशीं आमची गाठ बांधलेली आहे अशा इतर सर्व लोकांविषयींचे आमचे ज्ञान वर्तमानपत्रांतून झालेलें असतें. बाह्य घटनांचे तौलनिक ज्ञान झाल्याशिवाय योग्य मत बनविणे अशक्य असतें. प्रथमच सत्यघटना माहीत असणे आवश्यक असते. त्या आम्हाला वृत्तपत्रांतून माहीत होतात. कोणत्याहि घटनेचे योग्य मूल्यमापन आम्हाला करावयाचे असेल तर आम्हीं अनेक वर्तमानपत्रें वाचलीं पाहिजेत आणि त्यांच्या बातमीपद्धतींतले व अर्थपद्धतींतले पूर्वग्रह बाद करण्यास शिकलें पाहिजे. आपण दुसऱ्याच्या डोक्यानें विचार करीत नाहीं याची खातरजमा व्हावी म्हणून ध्यानमननाची सवय आम्हीं केली पाहिजे. राजकीय जीवनात घोषवाक्यें आवश्यक असतात, कारण विचारमंथनातून त्यांना विशिष्ट रूप मिळालेलें असत. पण बहुधा ते विचारांची वाट खुंटवितात मनदारानें त्यांच्यात गुरफटून जाणे हे धोक्याचें आहे.

इतिहासाच्या जाणिवेमुळें सत्य घटनाविषयीं आमच्या मनात आदर निर्माण होण्यास मदत होईल आणि भूतकाळातील मनाच्या निर्विकार बुद्धीनें परामर्श घेणें आम्हांला शक्य होईल. ज्यांनीं पूर्वी इतिहासाची घडण केली आहे त्यांच्याविषयीं मत बनविताना आम्ही त्यांच्या अंगी वृथा सद्गुण व कर्तृत्व चिकटविणार नाहीं किंवा त्यांचें मान कमीहि करणार नाहीं. त्यांच्या काळांतला दडक लावून आम्ही त्यांचे मूल्यमापन करूं आणि त्यांच्याकडे व्यंगचित्रे म्हणून नव्हे तर मत्यसृष्टीतील प्राणी म्हणून पाहूं. चालू जमान्यातील प्रश्न मनात बाळगून भूतकाळाविषयींचे अशा प्रकारचें ज्ञान होत गेलें म्हणजे मतदाराला योग्य निर्णय घेतां यावा म्हणून जें शहाणपण त्याला येणें जरुरीचें आहे तें त्याचा लाभ करून देण्यास मदत होईल.

## स्थानिक निवडणुकींचें स्थान

ह्या सबंध प्रकरणात आपल्यापुढे लोकशाहीतील राष्ट्रीय निवडणुकी आहेत. पण स्थानिक निवडणुकींचें विस्मरण आम्हाला होऊं नये. त्या म्हणजे तयारी करण्याची भूमि होत. तेथे इयत्ता उच्च असली तर राष्ट्रीय पातळीवरहि ती उच्च राहणें शक्य आहे. स्थानिक निवडणुकी जबाबदारपणें पार पाडण्यास जे लोक शिकले त्यांच्या राष्ट्रीय निवडणुकी अगदी खऱ्याखुऱ्या अर्थानें लोकशाही स्वरूपाच्या असल्याच त्यांना दिसून येईल. राष्ट्रीय पार्लमेंटला उभे राहिलेल्या अनेक उमेदवारांनी आपले व्यावहारिक शिक्षण स्थानिक निवडणुकींत मतदार पक्षकार्यकर्ते, आणि उमेदवार या नात्यानें घेतलें आहे.

राष्ट्रीय निवडणुकींत मताधिकार म्हणजे स्थानिक पंचायतीपासून तों लोकसभेपर्यंत लोकशाही राजवटींत प्रौढ नागरिकाच्या हक्काचें प्रतीक होय. अर्थात् राष्ट्रीय निवडणुकींत मतदान जबाबदारपणें न होणें हें इतर सर्व निवडणुकींत मतदान ज्या प्रकारें करण्यात आलें असेल त्यावर आणि ज्या ज्या वेळीं प्रत्येक नागरिक आपला मतदानाचा अधिकार बजावितो त्या त्या वेळीं त्यानें मिळविलेल्या समजूतदारपणा आणि राजकीय शहाणपणा यावर अवलंबून आहे.

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ३०८९५
क्रमांक २५६९

# २

# नवभारताचीं उद्दिष्टें

निरनिराळ्या राजकीय पक्षांचे कार्यक्रम व धोरणें कशींहि असोत, राष्ट्राचीं सर्वसाधारण ध्येयें त्या सगळ्याना मान्य असावीं लागतात. राष्ट्रीय ध्येयावर सगळ्याची सारखी निष्ठा असणें ही पक्षनिष्ठ राजवटीची मूलभूत गरज आहे. पक्ष अनेक असले कीं त्याचा परस्परांशीं विरोध असणारच, पण हा विरोध नुसता विरोधासाठींच असला तर तेथें लोकशाहीला जागाच उरणार नाहीं. पक्षोपपक्षांत विरोध निर्माण करणाऱ्या गोष्टींपेक्षां त्यांचा एकोपा साधणाऱ्या गोष्टी अधिक असल्या पाहिजेत अशी लोकशाहीत अपेक्षा असते. अशा काही सर्वसाधारण निष्ठा असल्याशिवाय पक्ष हे 'पक्ष' ह्या नांवाला पात्रच ठरणार नाहींत. सामान्य निष्ठांच्या अभावीं प्रत्येक पक्ष आपणच राष्ट्र असल्याचा दावा करील, आणि इतर पक्षाच्या अस्तित्वहक्कालाच प्रतिरोध करील. अशा वृत्तींत हुकुमशाहीचें बीज सामावलेलें असतें, मग ती हुकुमशाही जातीयवादी, साम्यवादी वा दुसऱ्या कोणत्याहि प्रकारची असो. आमच्या म्हणण्याचा आशय असा नव्हे कीं, राष्ट्राच्या निरनिराळ्या अंगोपांगांत तत्त्वप्रणाली किंवा राष्ट्रापुढें असलेली ध्येयें आणि तीं साध्य करण्याची निश्चित् कल्पना यांविषयीं ततोतत एकवाक्यता असलीच पाहिजे. अशा प्रकारची काटेकोर एकवाक्यता धार्मिक, सांस्कृतिक वा राजकीय स्वातंत्र्याला बाधक होण्यासारखी आहे. आम्हाला एवढेंच म्हणायचें आहे की, राष्ट्रीय मूलभूत ध्येयें आणि तीं साध्य करण्यासाठी जीं साधनें योजायचीं, त्याची निश्चित कल्पना याविषयीं ढोकळ मानानें एकवाक्यता असली पाहिजे. राष्ट्राचीं ध्येयें अनेक असू शकतील आणि त्याना राष्ट्रांतून किंवा राष्ट्राबाहेरून धोका निर्माण झाला तर तो धोका पक्षाला आहे असें न मानता समग्र राष्ट्रालाच आहे असें मानण्यात येईल. युद्धासारख्या राष्ट्रीय आपत्तीच्या वेळीं

राजकीय पक्षांतील मतभेद बाजूला सारण्यात येत असतात याचें कारण सर्वसाधारण ध्येयाची ही जाणीवच होय.

ह्या दृष्टीनें पाहू जाता कोणत्याहि देशातील निरनिराळ्या राजकीय पक्षांचीं धोरणें व कार्यक्रम यांचें मूल्यमापन करण्याचा राष्ट्रीय ध्येयें हा एक दंडकच ठरतो. यामुळेंच निरनिराळ्या पक्षासंबंधीं कसोशीनें चिकित्सा करण्यापूर्वी राष्ट्रीय ध्येयसिद्धीला हे पक्ष साहाय्यक होतात की, प्रत्यवाय आणतात हें पाहण्यासाठीं राष्ट्रीय मूलभूत ध्येयें कोणतीं हें समजून घेणें आवश्यक आहे.

स्वातंत्र्यानंतर भारताच्या लोकांनीं आपलीं सर्वसाधारण ध्येयें भारताच्या घटनेंत नमूद करून ठेविलीं आहेत तीं अशीं

> आम्ही, भारताच्या लोकांनीं, भारताचें सार्वभौम प्रजासत्ताक लोकराज्य बनविण्याचा संकल्प केलेला असून त्याच्या नागरिकांना खालील गोष्टी उपलब्ध करून देण्याचा मनसुबा केला आहे.
>
> सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय,
>
> विचार, उच्चार, श्रद्धा, धर्म आणि उपासना याबाबतींत स्वातंत्र्य, दर्जा आणि संधि याबाबतीत समानता,
>
> शिवाय त्या सर्वांमध्यें बंधुभावाचा पुरस्कार करून प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्राचें ऐक्य राखणें याविषयींची हमी आम्ही देतों.
>
> कॉन्स्टिटयुअंट असेंब्लीमध्यें आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजीं ही घटना संमत करतों, तिला कायद्यानें मान्यता देतो आणि राष्ट्राकरिता ती स्वीकृत करितो.

अशा प्रकारें न्यायनीति, स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव हीं भारताचीं सर्वसाधारण ध्येयें म्हणून घोषित करण्यात आलीं आहेत. मूलभूत हक्क आणि राज्यधोरणविषयक तत्त्वांचे दिग्दर्शन ह्या विभागात तीं अधिक तपशीलवार देण्यात आलीं आहेत राष्ट्रातील जनतेला न्यायनीति, स्वातंत्र्य, समता आणि एकता उपलब्ध करून देणारें सरकार एक साधन आहे असें घटना मानिते.

घटना कार्यवाहींत आल्यापासून राजकीय पक्षोपपक्षांत झालेलें मतप्रदर्शन आणि वर्तमानपत्रांतून झालेली चर्चा याच्या अनुषंगानें राष्ट्रीय उद्दिष्ट आकारित झालीं

आहेत. जनतेला जागवणाऱ्या गरजा आणि राष्ट्रानुभवाचें चिंतन यांचा या कामी हातभार लागलेला आहे. आमचें राजकीय, आर्थिक व सामाजिक कर्तृत्व मर्यादित आहे याची जाणीव असल्यामुळे आम्हां भारतीयांना तादृश व अंतिम स्वरूपाचीं कोणतीं राष्ट्रीय ध्येयें अंगीकारतां येण्यासारखीं आहेत याचा वास्तववादी अंदाज करतां आला आहे.

## १ राष्ट्रीय ऐक्य

व्यक्तीची इज्जत व राष्ट्राची एकता साध्य करण्याचा मार्ग म्हणून बंधुभावाचा उल्लेख घटनेच्या प्रस्तावामध्यें केलेला आपण पाहिला आहे. यावरून हें स्पष्ट होतें कीं, स्वातंत्र्याला बाध न आणतां राष्ट्रीय ऐक्य साधणें हें भारताचें प्रमुख उद्दिष्ट आहे.

भारतानें शतकानुशतक एक प्रकारची सांस्कृतिक एकता राखली आहे यांत तिळमात्र संशय नाहीं. पण भारताच्या दीर्घकालीन इतिहासांत अगदीं अल्पकाळ वजा करतां भारताला राजकीय एकता कधीं साध्य झालीच नाहीं. गेल्या दोन शतकांत मात्र इंग्रजांचा कायदा व व्यवस्था, इंग्रजी भाषेचा प्रभाव आणि विशेषतः भारताच्या लोकांनीं राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं दिलेला लढा यांच्याद्वारें राजकीय एकता साध्य झाली. देशाची विभागणी ही राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीं द्यावी लागलेली किंमत होय. तथापि भारत स्वतंत्र झाला आणि त्यानें आपली आधुनिक राज्यसत्ता स्थापिली त्यांत राष्ट्रीय चळवळीचें वांछित फलद्रूप झालें. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखालीं संस्थानी राजवटींचें सामिलीकरण झालें. त्यायोगें राष्ट्रीय एकता अधिक मजबूत झाली. राष्ट्रीयत्वाचा विकास आणि निकोप राष्ट्रीयत्वाची जाणीव यांच्यावर इतर कांहीं आघात अजूनहि होतच आहेत. ते आजहि राष्ट्राच्या जीवनांत ज्वलंत प्रश्न होऊन बसले आहेत. राष्ट्रैक्याच्या रचनेसंबंधीं आपली विचारसरणी आणि कार्यक्रम काय आहे हें विशद करून सांगण्याची जबाबदारी प्रत्येक पक्षावर आहे.

भारत अनेक धर्म, नाना संस्कृति आणि विविध भाषांची भूमि आहे. राष्ट्रीय समाजजीवनांतील ह्या गोष्टींबाबत राष्ट्रानें दिलेला लढा आणि स्वातंत्र्यप्राप्ति यांच्या योगानें एक नवीन आत्मप्रतिष्ठेची जाणीव, वैयक्तिकतेची एक नवीन जाणीव निर्माण झाली आहे. आज देशभर धर्मांची पुनर्घटना, संस्कृतीचें

पुनरुज्जीवन व भाषाचा पुनर्विकास दिसून येत आहे. याच्यापाठीं देशाच्या विधायक शक्तींना चालना मिळत असल्यामुळे त्या सर्व स्वागतार्हच आहेत. परंतु त्यासोबत परिस्थिति अशी आहे की, पूर्वी कधीहि पाहिली नव्हती अशी अरिष्टेंहि उभीं राहिली. धर्म, संस्कृति आणि भाषा एतद्विषयक आत्मप्रतिष्ठेच्या जाणिवेमुळे त्याच्यात आक्रमक व एकलकोंडेपणाची वृत्ति निर्माण होत. याचा परिणाम असा होतो कीं, साम्यवाद, भाषावाद, प्रदेशवाद यासारख्या फुटपाडू संघटना व डोकें काढितात, आणि राज्यसत्तेच्या हव्यासामुळे सगळ्या क्षेत्रांत राष्ट्राचीं शकलें पाडून देशाच्या ऐक्याला धोका निर्माण करितात बहुसंख्यांचा धर्म-हिंदुधर्म प्रभावी संस्कृतिप्रवाह—आर्य संस्कृति आणि हिंदी भाषा ही राष्ट्राच्या सत्ताधिष्ठित वर्गावर वजन आणण्याचा प्रयत्न करूं लागली, आणि सर्व राष्ट्र म्हणजे आपली मिरासदारी आहे असा दावा करूं लागली, आणि इस्लाम, खिस्ती, शीख, बौद्ध आणि झोरास्ट्रियनादि इतर धर्म, वासिक, द्रविडी, इस्लामी आणि पाश्चिमात्यादि इतर संस्कृति आणि हिंदीतर भाषा ही स्वसंरक्षणासाठीं म्हणा वा स्वार्थासाठीं म्हणा, आडमुठेपणाने राष्ट्रप्रवाहापासून दूर, वेगळे राहण्याचा प्रयत्न करूं लागली तर बंधुभावाचा जो आदर्श राष्ट्रापुढें आहे त्याचा मागमूसहि उरणार नाहीं साम्राज्यवाद आणि एकाडे शिलेदारी ही दोन्हीहि नवराष्ट्रवादाला घातक आहेत निधर्मी राज्य आणि त्याचा विकास यातूनच राष्ट्रीय ऐक्याचा मार्ग आहे. म्हणजे धर्म, संस्कृति आणि भाषा यातली विविधता व स्वतंत्रता ओळखून सर्वसाधारण कल्याणासाठीं एकजुटीनें प्रयत्न करणें म्हणजे या मार्गाचा अवलंब करणें होय. ब्रिटनबरोबर दिलेल्या लढ्यात जो नव्या स्वरूपाचा राष्ट्रवाद उदयास आला त्याची वाढ राष्ट्राच्या विकासासाठीं एकजुटीनें प्रयत्न करून एक सर्वसाधारण परंपरा निर्माण केली तरच होणार आहे

## २. आर्थिक न्यायनीति

घटनेच्या प्रस्तावात जीं राष्ट्रीय ध्येयें नमूद केली आहेत त्यातील एक ध्येय "सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायनीति आणि समान दर्जा व समान संधि" असें आहे. शासनपद्धतीच्या आदेशतत्त्वामध्यें म्हटलें आहे कीं, "राष्ट्रीय जीवनाच्या अंगोपांगात न्यायनीति अनुस्यूत असेल अशी समाजव्यवस्था" घडवून आणणें सरकाराचें कर्तव्य आहे. आर्थिक क्षेत्रात तर विशेषेकरून सर्व

जनतेला "उपजीविकेची भरपूर साधनें" उपलब्ध करून देऊन समाजाच्या धनोत्पादक वस्तूंची मालकी व विल्हेवाट अशा प्रकारें नियंत्रित व्हावी कीं, अर्थयंत्रणेमुळें "संपत्तीचें केंद्रीकरण बेजबाबदारपणें न होतां समाजकल्याणाला ती उपयुक्त व्हावी.

लोककल्याण हा सरकारच्या आर्थिक धोरणाचा मुख्य हेतु आहे. स्त्रीपुरुषांत समानता, मुलांचें आणि कामगारांचें आरोग्य आणि शक्ति यांचा दुरुपयोग होणार नाहीं या विषयींचें संरक्षण; कामधंदा आणि शिक्षणाची तरतूद, बेकारी, वार्धक्य, आजार, शारीरिक अपात्रता आणि अशाच प्रकारच्या इतर अनाहूत गरजा यापासून निर्भयता, कामधंद्याबाबत न्याय्य आणि सकरुण सोयी आणि योग्य जीवनवेतनाची निश्चिति, शिष्टसंमत राहणी आणि फुरसद आणि सामाजिक व सांस्कृतिक संधीचा योग्य उपभोग,—हीं राष्ट्राच्या आर्थिक जीवनाला हितकारक होतील अशीं तत्त्वें होत.

हीं आदेशतत्त्वें जोपर्यंत आचरणात आणलीं जात नाहींत, तोंपर्यंत तीं सदिच्छेपेक्षा काही अधिक आहेत असें म्हणतां येणार नाही. या बाबतींत भारताच्या लोकांनीं थोडे का होईना, प्रयत्न चालू ठेविले आहेत. आज कल्याणकारी राज्य आणि समाजवादाचा आदर्श राष्ट्रानें पुढें ठेविला असून तो साध्य करण्यासाठीं राष्ट्रीय नियोजनपद्धतीचा अंगीकार केला आहे. या आदर्शांचें स्वरूप बरेचसें विस्कळित असणें शक्य आहे. पण ज्या मानानें यात आर्थिक आणि सामाजिक रचनांचें तंत्र व्यवहार्यतः व्यक्त झालेलें असेल त्या मानानें हें स्वरूप चांगलेंच म्हणावें लागेल. तथापि नियोजन यशस्वी होणें असेल तर हे आदर्श व्यवहारात आणून त्याचें तंत्र व लक्ष्य निश्चित केलें पाहिजे. ढोबळ मानानें प्रतिपादिलेल्या या आदर्शांबाबत निरनिराळ्या पक्षामध्यें आपापल्या मतप्रणालीनुसार, समाजसुधारणा आणि आर्थिक विकास यांचें तंत्र व गतिसंबंधी मतभेद दिसून येतात. असे मतभेद स्वागतार्ह होत. राष्ट्रांत चोहोंकडे या योजना कार्यवाहींत आणल्या जात असताना त्यांचे राजकीय, आर्थिक आणि सामाजिक हेतु आणि त्यांची दैनंदिन अमलबजावणी यांची चिकित्सापूर्वक पाहणी करण्यात राष्ट्राची शक्ति उपयोगांत आली पाहिजे. लोकशाही समाजवादाच्या चौकटींत "समाजवादी समाजरचना," "वैज्ञानिक समाजवाद" आणि

त्यासारख्या इतर गोष्टींना वाव आहे. परस्पराच्या समाजवादी दृष्टिकोनावर टीका करण्यात, किंबहुना त्यांना "निःसत्व," "प्रतिगामी," "अव्यवहारी" अशी नावें देण्यात सुद्धा काहीं गैर नाहीं. खरें पाहू जाता आमच्या योजना लोकशाही स्वरूपाच्या व्हायच्या असतील, आणि त्याच्याद्वारें आर्थिक विकास साधून जनतेला त्यापासून निर्भयता आणि न्याय लाभणार असेल तर एकमेकासबंधीं अशा प्रकारचे विचार प्रगट करणें आवश्यक आहे. जमीनविषयक कायद्यात सुधारणा, आर्थिक व इतर तत्सम ध्येयें फलद्रूप होण्यास लागणारी समाजव्यवस्था, विकास योजनांचें तत्त्वज्ञान आणि कुटिरोद्योग व लहान उद्योगधंदे यांचें राष्ट्राच्या अर्थकारणातील स्थान, अवजड व लहान उद्योगधंदे यांचे परस्पराशीं असलेले संबंध, बेकारीचें निवारण व उत्पादनवाढ यातून कोणाला अग्रहक्क मिळावा, खाजगी व सार्वजनिक मालकीचे उद्योगधंदे, आणि आर्थिक जीवनात सरकारानें हात घालण्याची मर्यादा कोठपर्यंत असावी यांचे सापेक्षतेनें आर्थिक फायदे कोणते. तुटीचें आर्थिक धोरण व परदेशाची मदत अशा प्रश्नाचीं उत्तरें शोधून काढणें जरूरीचें आहे. हीं उत्तरें लोकशाही पद्धतीनुरूप असावींत असें वाटत असलें तर मग निरनिराळ्या पक्षातील विचारमंथन चालू राहिलें पाहिजे. जमिनीची मालकीपद्धति आणि सरंजामशाहीचे इतर अवशेष नाहींसे करण्याबाबत, बेकारीनिवारण आणि देशाचें औद्योगीकरण याबाबत पक्षाचा जो कार्यक्रम असेल त्यावरून कोणत्याहि पक्षाचें मूल्य-मापन लोक करतील. या बाबतींत निश्चित् कार्यक्रम आणि तो चिकाटीनें राबविणारें राजकारण याची निःसंशय जरुरी आहे. त्यातच राजकीय सुदृढता राहील कीं नाहीं यांची चिंता आणि सामाजिक बाबतींत दिसून येणारें लोकाचें औदासिन्य याची जाणीव ही प्रगति खुटविणारीच आहे पक्षावर याचा परिणाम कोठवर व्हावा? या प्रश्नाचीं उत्तरें निरनिराळीं आहेत. असें जरी असलें तरी सर्व राजकीय पक्षापासून एका गोष्टीची मागणी झाली पाहिजे. ती गोष्ट ही कीं, आर्थिक विकासाचीं आश्वासनें देत असता त्यानीं तीं निश्चयपूर्वक वास्तव व जबाबदारपणानें द्यावींत.

## ३. लोकशाही

भारतानें लोकशाही पद्धतीची राजवट स्वीकारली आहे. ढोकळ मानानें लोकशाहीला दोन बाजू आहेत. एक म्हणजे सरकार लोकांना जबाबदार असते व दुसरी म्हणजे सरकारला कायद्याचें बंधन असतें. एका अर्थी लोकशाही ही

बहुसंख्यांची सत्ता तर दुसऱ्या अर्थी ती सत्ताच बहुसंख्यांना विशिष्ट जबाबदारीनें बांधून घेत असते. बहुसंख्यांचा विचार केव्हा बदलेल याचा नेम नसतो आणि दृष्टीनें कायद्याच्या स्वरूपात फेरबदल होणें शक्य असतें. यावरून दिसून येतें कीं, लोकशाही ही कल्पनाच कधीं स्थायीस्वरूपाची नसते, तर ती गतिमान् असते. फेरबदल कसेंहि झाले तरी जनतेनें लोकशाहीचा स्वीकार केलेला असतो म्हणजे धार्मिक, सांस्कृतिक, भाषिक विविधतेला राष्ट्राच्या ऐक्यासाठीं दाबण्यात येऊ नये आणि विचार, उच्चार, सख्य व विरोध याबाबतींतलें स्वातंत्र्य राष्ट्रीय नियोजनासाठीं बाधित होऊ नये असा निर्णय जनतेनें घेतलेला असतो.

न्यायनीतीचीं स्वाभाविक उद्दिष्टें गाठण्यासाठीं लोकशाही आपल्या सत्तेचा उपयोग करीत असते. पण हुकुमशाही पद्धतीनें सत्तेचा उपयोग केला तर न्यायनीतीला धोका पोहोंचतो हें लोकशाही जाणून असते. या दोन्ही गोष्टींवर भर देणें जरुरीचें आहे. कधीं कधीं समाजविघातक गोष्टी सरकारी यंत्रणेचा कबजा घेतात; असें घडून येण्यापूर्वीच त्यांचा योग्य बंदोबस्त करण्यात येत नाहीं. अशा गोष्टीमुळें जनतेचा लोकशाहीवरचा विश्वास उडून जातो. लोकशाहीमध्यें सरकारी सत्तेचा उपयोग समाजविरोधी शक्तींविरुद्ध व समाजसुधारणेसाठीं होत आहे हें लोकांच्या निदर्शनास आल्याशिवाय लोकशाही संस्थांवरचा लोकांचा विश्वास टिकून राहूं शकत नाहीं. लोकशाहीला सत्तेचें राजकारण मान्य असतें. पण याला दुसरीहि एक बाजू आहे. अलीकडेच रशियामध्यें स्टॅलिनवादाचें जें नागडें उघडें दर्शन झालें त्यापासून जर काहीं धडा घेण्यासारखा असला, तर तो हाच कीं, सत्ता मग ती राजाची असो वा लोकांची असो, भांडवलशाहीची असो वा समाजवादी असो, तिच्याकडे जागरूकपणें पाहिलें पाहिजे, आणि लाचलुचपतीसारखे अश्लाघ्य प्रकार तिच्यात शिरणार नाहींत याविषयीं खबरदारी घेतली पाहिजे. भांडवलशाहीप्रमाणेंच समाजवादातहि हें विनाशतत्त्व सामावलेलें आहे. पार्लमेंटरी पद्धतीच्या लोकशाहींत सत्तेच्या दुरुपयोगाला काहीसा पायबंद पडलेला असतो. पार्लमेंटरी पद्धतीच्या लोकशाहीचीं वैशिष्ट्यें म्हणजे न्यायप्रधान मूलभूत हक्क, न्यायखातें, अमलबजावणीखातें व विधानसभा यांतील बंधनें व समतोलपणा, अनेक पक्षीय राज्यपद्धति आणि प्रौढ मतदानपद्धति व निवडणुकी आणि सरकार बदलण्याचा हक्क. या सर्वांचा स्वीकार आपण करणार असलो तरच लोकशाही-विषयीं बोलणें काढण्यात काहींतरी अर्थ आहे.

जेथें क्रांतिकारक चळवळींचा बुजबुजाट झालेला आहे आणि योजनाबद्ध विकासकार्यें जेथें हातीं घेण्यात आलेली आहेत अशा आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या देशात सरकार, व्यक्ति व समाजसंघटना यांना जे अधिकार असतात ते जेथें गोरें काहीं स्थिरस्थावर आहे अशा पुढारलेल्या समाजातील अधिकाराहून निराळ्या प्रकारचे असतात. या कारणास्तव लोकशाहीतील संस्था आणि कार्यपद्धति यात निराळेपणाचा स्वीकार करावा लागतो तथापि पार्लमेंटरी राज्यपद्धति चालू ठेवणें हे कोणत्याहि एका पक्षाचें नव्हे, तर राष्ट्रीय कर्तव्य ठरतें. जो पक्ष ह्या कर्तव्याची जाणीव बाळगीत नाहीं तो राष्ट्रविघातक ठरतो. यावरून कोणताहि पक्ष या पार्लमेंटरी लोकशाहीच्या चौकटींत कार्य करण्याचें नाकारीत असेल तर तो राष्ट्राचा शत्रु आहे असें खुशाल समजावें.

भारताला आज एका लोकशाहीपोषक विरोधीपक्षाची फार गरज आहे. तसे विरोधीपक्ष अनेक आहेत. पण त्यातले लोकशाहीला पोषक होण्यासारखे जे आहेत ते दुर्बळ असून त्याच्यात ऐक्य नाहीं हातीं सत्ता आल्यावर जे कायदा गुडाळून ठेवतात आणि विरोधाचा हक्क मानण्यास तयार होत नाहीत, असे पक्ष, मग ते उजवे असोत वा डावे असोत, त्याच्या हातीं सत्ता देणे श्रेयस्कर नाहीं. पर्यायी सरकार स्थापण्यास समर्थ असे कमींत कमी पक्ष (दोनच असले तर उत्तमच) असावेत आणि त्यात सर्व राजकीय मतप्रवाह एकत्र आलेले असावेत, कारण कोणत्याहि लोकशाहीला याची फार फार गरज आहे. अशी परिस्थिति असेल तरच सरकार–पक्ष कार्यतत्पर आणि लोकमतानुवर्ती राहील. ज्या विरोधी पक्षाना सरकार स्थापण्याची संधि मिळणें दुरापास्त असते त्याना बेजबाबदारपणें टीका करण्याचा मोह बहुधा होत असतो. आज भारतात या बाबतींत सुधारणा घडवून आणण्याची आवश्यकता दिसून येते.

आजच्या जमान्यांत व्यक्तींचें अधिकाधिक समाजीकरण होत आहे, कल्याणकारी राज्याचें ध्येय वृद्धिंगत होत असून समाजकल्याणाच्या व्यापक योजना आखल्या जात आहेत. अशा वेळीं हें व्यक्तीचें, हें सरकारचें अशा मर्यादा घालणें कठिण आहे. जीवनात, धर्म व कुटुंब यासारख्या शुद्ध वैयक्तिक स्वरूपाच्या जीवन-क्षेत्रात राजकारणानें हस्तक्षेप केला आहे. सरकारनें हस्तक्षेप कोठपर्यंत करावा याविषयीं निर्णय घेणें कठिण असल्यामुळें जे पक्ष लोकशाही आदर्शांचा अवलंब प्रामाणिकपणें करीत असतील त्यानाहि व्यक्तीच्या खाजगी बाबतींत आणि मानवी

आत्म्याच्या स्वतंत्र क्षेत्रात ढवळाढवळ करण्याचा मोह होत असतो. पण कधी कधीं लोकशाही पक्षातहि कडक उपाययोजना म्हणून किंवा शीघ्र प्रगतिसाठीं लोकशाहीला न साजेल आणि स्वातंत्र्याला घातक ठरेल असा मार्ग पत्करावा लागतो. व्यक्तिगत मूल्याची पायमल्ली त्याच्या हातून कशी होऊन जाते हें कधी कधी त्याच्या लक्षातहि येत नाही. तेव्हा अशी सीमारेषा ओढणे आणि तीहि लवचीक अशी ओढणें कठीण असते. तरीहि स्वातंत्र्य आणि नियंत्रण यांच्या क्षेत्रात, खाजगी बाबतींतच नव्हे, तर राजकारण आणि अर्थशास्त्र यासारख्या व्यापक क्षेत्रातहि अशी सीमारेषा पाडणें भाग पडते. याला दुसरा पर्याय हुकुमशाही होय; मग तुम्ही तिला जातीयवादी, साम्यवादी किंवा हवें तर "लोकशाही" म्हणा.

आर्थिक उन्नतीसाठी जो स्वार्थत्याग करावा लागतो तो करण्यास लोक राजी खुशीनें तयार होणें शक्य आहे काय असा प्रश्न विचारणारे बरेच लोक आपल्या देशात आहेत. भौतिक उत्कर्ष त्वरित साधण्यासाठीं हुकुमशाही राजवटीत जी किंमत आम्हाला द्यावी लागते ती गैरवाजवी तर नाहीं ना, अशीहि पृच्छा ते करीत असतात. स्वातंत्र्योत्तर कालात जी प्रगति भारतानें केली आहे तिच्या-वरून स्पष्ट दिसून आलें आहे की, लोकशाहीत लोकांना हवा तसा स्वार्थत्याग करण्यास लावणें शक्य आहे. पहिल्या पाच वर्षांत भारतानें विकास योजनांच्या द्वारें केलेली प्रगति फार जरी नसली तरी ती क्षुल्लक मानता येण्यासारखी नाहीं. जलद् प्रगतीबद्दल बोलायचें तर जॉन स्ट्रेचीला दिलेल्या मुलाखतींत नेहरूंनी म्हटलें आहे कीं, सुरुवातीला लोकशाही दिरंगाई करीत असेल, पण शेवटी तीच गति जलद ठरते. ते कसेंहि असो, भौतिक प्रगति एक साधन आहे, साध्य नव्हे. भौतिक प्रगतीमुळें आत्मस्वातंत्र्य आणि सामाजिक न्यायनीति भंग पावणार नाहीं अशी परिस्थिति व हमी एका लोकशाहींतच मिळण्यासारखी आहे. यासाठींच भौतिक प्रगति साधण्यासाठीं जेथें मानवी हक्कांना तिलांजलि द्यावी लागते अशा विवाद्य पद्धतीचा अवलंब न करण्याचा निश्चय भारतानें केला आहे. राष्ट्राच्या प्रगतीला साधनें कोणतीं घ्यायची हें लोकशाहीच ठरविते.

## ४. नवा सामाजिक दृष्टिकोन

राष्ट्रीय ऐक्य, आर्थिक न्यायनीति आणि लोकशाही—भारतानें प्रयत्नपूर्वक साधण्यासारखीं हीं तीन ध्येयें आहेत. पण त्यांच्या सिद्धीसाठीं एक नवा

सामाजिक दृष्टिकोन निर्माण झाला पाहिजे. भारताच्या आद्यस्थापित्यांना याची जाणीव होती.

भारताच्या घटनेत घोषित केलें आहे कीं, "जाति व लिंगभेद या कारणावरून कोणाहि व्यक्तिविरुद्ध सरकार पक्षपाताचें धोरण ठेवणार नाही. कोणत्याहि नागरिकावर, तो अमुक जातीचा, अमुकलिंगी आहे म्हणून सार्वजनिक जीवनात कसलीहि नालायकी, कसलेहि दडपण, निर्बंध किंवा अवस्था लादलेली सरकारला खपणार नाहीं. घटना अस्पृश्यता मोडून टाकिते व्यवहारात ती कोणत्याहि स्वरूपात शिल्लक राहू नये असा कटाक्ष बाळगते आणि अस्पृश्यतेच्या कारणासाठी कोणालाहि हल्का लेखणें गुन्हा मानते." थोडक्यात म्हणजे सामाजिक दृष्टिकोन आणि व्यवहार यात कोणती सुधारणा झाली पाहिजे याविषयीं जें काहीं घोषित करण्यात आलें आहे त्यात राष्ट्राची याविषयींची मनोभूमिका दिसून येते. समाजकल्याण आणि सुधारणा घडवून आणण्यासाठीं सरकारला कायदे करण्याचा आदेशहि घटनेंत देण्यात आला आहे. हिंदुकोडची सुधारणा ही तर जातपातीची पकड आणि एकत्रकुटुंबपद्धति यावर जबरदस्त आघात करून राष्ट्रात व्यक्तीचें नवजात स्वातंत्र्य आणि सामाजिक समता यांचें पोषण होण्यास त्याची फार मदत होणार आहे. यात अडचणी अनेक आहेत हें खरें. शिवाय या बाबतींत सरकारनें काय करावें आणि कोणत्या मर्यादेपर्यंत करावें याविषयीं मतभेद असण्याचाहि संभव आहे. तरीहि या बाबतींतला आपला दृष्टिकोन बदलला पाहिजे याविषयीं भारताच्या जनतेमध्ये दुमत आढळणार नाहीं. हे उद्दिष्ट राष्ट्रीय आहे. तथापि नुसत्या सरकारच्या प्रयत्नानें तें फलद्रूप होईल असें नाहीं अर्थात् या कार्याला पोषक ठरतील अशा स्वयंप्रेरित, धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमाला उत्तेजन देणें सरकारचें कर्तव्य ठरतें

नवीन सामाजिक आणि सांस्कृतिक आचार–नीतिशिवाय निकोप लोकशाहीची रचना होणें अशक्यप्राय आहे. आम्हाला एक वडिलोपार्जित ठेवा लाभलेला आहे हें कबूल केलें पाहिजे. स्वराज्य किंवा सेल्फ गव्हर्नमेंटची आमची परंपरा अगदीं जुन्या काळापासून आमच्या ग्रामजीवनात अस्तित्वात होती. समाज म्हणजे परस्पर देवाणघेवाणीचें जणु काय एक प्रकारचें जाळें होतें. त्याचा परिणाम असा होई कीं, लोककल्याण साधून निर्भयता लाभत असे. अनेकात एकत्व पाहणारी विश्वव्यापी मनोरचना सहिष्णुतेचे धडे देत होती. भारतीय संस्कृतीमध्ये

अहिंसेचें तत्त्व खोलवर रुजलें होतें, आणि राममोहन रॉयपासून गांधीजी व नेहरू यांच्यासारखे राजकीय नेते या मूळ परंपरेवर राष्ट्रीय ऐक्य, सामाजिक समता आणि राजकीय स्वातंत्र्य या नव्या कल्पनांचें कलम लावण्याचा प्रयत्न करीत आले आहेत. जनतेनें या प्रयत्नांना ज्याप्रकारें साथ दिली त्यावरून थोड्याबहुत प्रमाणांत हें कलम यशस्वी झालें असल्याचें दिसून येतें. तथापि सगळ्याच राष्ट्रीय नेत्यांना प्रतिगामी शक्तींशीं आणि सामाजिक रूढींशीं सतत सामना देणें भाग झालें आहे. खरें पाहतां सनातनी आणि सुधारक यांचा झगडा राष्ट्रीय आत्माविष्काराच्या झगड्याबरोबर तीव्रतेनें चालत आला आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुधारणेचा प्रश्न आणि परंपरागत समाजरचना आणि संस्कृति यांची घडी आधुनिक काळाला अनुसरून बसविण्याची निकड तीव्र झाली आहे. समाजकार्यकर्ते, समाजशास्त्रज्ञ, इतिहासकार आणि अर्थशास्त्रज्ञ यांनीं लिहिलेली पुस्तकें किंवा गेल्या कित्येक वर्षांतील काँग्रेस व समाजवादी सभांच्या अध्यक्षांचीं भाषणें जर कोणीं वाचलीं तर त्यांत आधुनिक भारताच्या राजकीय आकांक्षा आणि त्याच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाला वळण लावणाऱ्या भावनिक प्रेरणा यांतील असंवादित्वाची जाणीव दिसून येते ती लक्षांत आल्या-वांचून राहणार नाहीं "सामाजिक मूल्यें, सामाजिक रूढी आणि आमचा सामाजिक दृष्टिकोन यांनीं गळ्याला फास असावा तसें आम्हांला जखडून टाकलें आहे." असे उद्गार श्री. ढेबर यांनीं काढले आहेत. "जातीयता ही लोकशाहीचा आणि समाजवादाचा मोठा शत्रु होय." असें नेहरूंचें म्हणणें आहे. कायद्याच्या जाणिवेला रूढी पोषक होतच असें नाहीं. एकत्र कुटुंबपद्धति आणि पोटजाति यांनीं दृढावलेलीं बंधनें समता आणि सामाजिक जबाबदारी यांची काहीं संकुचित मर्यादेबाहेर वाढ होऊं देत नाहीत. वांशिक व सरंजामशाही विचारधारा स्वातंत्र्य, उद्योगशीलता आणि प्रगति यांना प्रतिबंधच करितात. थोडक्यांत म्हणजे राष्ट्रराज्य, आर्थिक प्रगति आणि राजकीय स्वातंत्र्य यांना अशोक मेहता म्हणतात त्याप्रमाणें नवीन दृष्टिकोन जिचा पाया आहे अशी "जबाबदारीची जाणीव असलेली नवी शिस्त" हिचा टेका असणें आवश्यक आहे.

राष्ट्रीय संस्कृति निर्माण करणें हें आपलें ध्येय आहे. तिचें स्वरूप असें असलें पाहिजे कीं, तिच्यांत आमची वडिलोपार्जित जिंदगी तर राखली जावीच, पण आजचीं मानवतामूल्येंहि तिच्यामध्यें समाविष्ट झालीं पाहिजेत. या कार्याचा

संबंध शेवटी ग्रामीण व नागरी जीवनाचा जो विकास होणें आहे त्याच्याशी जाऊन पोहोंचतो. समाजविकास कार्यांनी अलीकडे राष्ट्राच्या कल्पनाशक्तीचा कब्जा घेतला आहे. भौतिक विकासाच्या दृष्टीनें हीं कार्यें महत्त्वाचीं गणण्यात येतात. पण सांस्कृतिक सुधारणामध्ये त्याची छाप कोठवर पडली आहे त्यावरून त्याची यशस्विता अजमावयाची आहे. कुटुंब, जातपात आणि धर्म यापलीकडे जाऊन समाजविषयक जाणीव त्याच्यामुळें वाढीस लागली तर राष्ट्रीय पुनर्घटनेच्या कार्याचें ते एक अत्यंत क्रांतिकारक अंग ठरणार आहे भारतीय जनतेचा सामाजिक घाट आणि सांस्कृतिक मूल्यें याच्यात बदल घडवून आणण्याच्या दृष्टिकोनातूनच सर्वोदय चळवळीचें मूल्यमापन झालें पाहिजे.

## ५. जागतिक शांतता

राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी भारतानें लढा दिला, आणि आज आमचें "सार्वभौम" राष्ट्र-राज्य आहे. तथापि जगातील राष्ट्रांसंबंधीं आमचीं कांहीं कर्तव्यें आहेत हें घटनेनें मान्य केलें आहे. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता यांचा पुरस्कार करण्याचा, राष्ट्राराष्ट्रांचे संबंध न्यायाचे आणि मानमान्यतेचे राखण्याचा, आंतरराष्ट्रीय कायदे आणि तहनामे यांचें संघटित राष्ट्रांच्या परस्पर संबंधात पालन करण्याचा आणि आंतरराष्ट्रीय कलह लवादामार्फत मिटविण्यास उत्तेजन देण्याचा यत्न सरकारानें करावा असें घटनेत नमूद करण्यांत आलें आहे.

इतर लहानमोठ्या राष्ट्रांशीं परस्परावलंबनाचे क्रियाशील संबंध जुळवून आणणें हा स्वातंत्र्याचा अर्थ आहे आपली राष्ट्रीय वैशिष्ट्ये आणि आशाआकांक्षा यांनुसार हें करण्याचा यत्न भारतानें केला आहे. भारतानें असे कार्यशील संबंध ज्यांच्याशीं जुळवून आणले आहेत अशा तीन निरनिराळ्या राष्ट्रसंघटना आहेत पहिली राष्ट्रकुलाची, दुसरी आफ्रिका—आशियाई राष्ट्रें सभासद असलेली बांडुंग परिषद आणि तिसरी संयुक्त राष्ट्रांची. पार्लमेंटरी राज्यपद्धति आणि सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठीं लोकशाहीपद्धति भारतानें अंगिकारिली आहे हें राष्ट्रकुलाचें सदस्यत्व दाखवितें. या सभासदत्वावरून आणखी एक गोष्ट व्यक्त होते. ती ही कीं, राष्ट्रकुलात आशियाई राष्ट्रांचा समावेश झालेला आहेच, कालांतरानें आफ्रिकेंतील राष्ट्रांचाहि होईल, तेव्हा खुद्द राष्ट्रकुलाचें संभाव्य सामर्थ्य भारताला मोठें आशादायक वाटतें. बांडुंगची संघटना आशियाच्य

लोकांच्या राष्ट्रीयत्वाचें, स्वायत्ततेसाठीं त्यांनीं केलेली धडपड आणि राष्ट्रसंघटनेंत महत्त्वाचें स्थान मिळविण्यासाठीं उत्सुकता याचें प्रतिनिधित्व करते. आर्थिक विकास आणि सामाजिक प्रगति या बाबतींत पाश्चिमात्यांची बरोबरी करण्याचा आशिया आणि आफ्रिकेतील देशांनीं केलेला निश्चयहि बांडुंग परिषदेच्याद्वारें व्यक्त होतो. याबाबतींत भारताचें सदस्यत्व जागतिक शांतता आणि एकंदर जगातील लोक याविषयींची भारताला किती कळकळ आहे हे दाखवितें. जागतिक लोकशाही आंतरराष्ट्रीय न्यायनीति आणि जागतिक शांतता याविषयींची कळकळ दाखविण्याचे निरनिराळ्या पक्षाचे मार्गहि निराळे आहेत. पण ही कळकळ राष्ट्रीय स्वरूपाची आहे हें नमूद करण्यास मुळींच हरकत नसावी.

आंतरराष्ट्रीय तंग वातावरण शिथिल करण्यासाठीं भारताचें साहाय्य म्हणून भारतांत आणि इतरत्रहि लोकमतानें पंचशीलाचा गौरव केला आहे. आजच्या जागतिक परिस्थितीला अनुलक्षून आंतरराष्ट्रीय सहिष्णुतेचीं पांच तत्त्वें त्यांत समाविष्ट आहेत, तीं अशी . "(१) एकमेकांच्या भूमीची अखंडता आणि सार्वभौम सत्ता याविषयीं परस्पर आदरभाव, (२) आक्रमण न करणें, (३) आर्थिक, राजकीय किंवा काल्पनिक कारणास्तव एकमेकांच्या खाजगी प्रश्नांत हस्तक्षेप न करणें, (४) समता आणि परस्परलाभ व (५) शांततेंत सहजीवित्व." हीं तत्त्वें कांहीं अंशीं राष्ट्रीय वैशिष्ट्यामधील सहिष्णुतेची परंपरा आणि कांहीं अंशीं गांधीजींच्या नेतृत्वाखालीं केलेल्या अनत्याचारी चळवळींतून उद्भूत झालीं आहेत. तीं विश्वसमाजाचे किंवा विश्वशासनाचे अंतिम आदर्श नव्हत, पण आजच्या जागतिक परिस्थितीला लागू पडणारीं आहेत विशिष्ट परिस्थितींत हीं तत्त्वें व्यवहारांत आणू म्हटलें तर अनेक अडचणी येतात. उदाहरणार्थ, हीं तत्त्वें आपण उपयोगांत आणलीं तर आपला शेजारी पाकिस्तान याशीं आमचे क्रियाशील संबंध जुळून येतील कीं काय हें अजून ठरायचें आहे

तथापि, आज जागतिक परस्परावलंबन, राष्ट्रीय सार्वभौमत्वाविषयीं निष्ठा, अण्वस्त्राचें भय आणि अमेरिका व रशिया यांच्यामध्यें चालू असलेलें शीतयुद्ध याच्या चौकटींत लोक आणि राष्ट्रें शांततेसाठीं प्रयत्न करीत आहेत. पंचशील हें त्याची वास्तववादी जाणीव असून तशा परिस्थितींतहि शांततेची उत्कटा व्यक्त करितें. येथेंहि आंतरराष्ट्रीय सत्ताराजकारण आणि सार्वत्रिक नीतिमत्ता यांचा परस्पर संबंध, तसेंच आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा कयास याविषयीं निरनिराळ्या

पक्षात मतभेद होणे शक्य आहे. कोणी तृतीय छावणीचा उल्लेख करील, दुसरा एखादा तटस्थ वादाचा, तर आणखी कोणी भौगोलिक किंवा मानसिक शांततेच्या तृतीय क्षेत्राचा उल्लेख करील. या मतभेदामध्यें महत्त्वाचे फरक आहेत. लोकांनींच त्याविषयीं निर्णय घ्यायचा आहे. एवढें मात्र खरें कीं, जगाच्या राजकारणांत भारतानें जो हा उपक्रम केला आहे त्याला लोकमताचा वाढता पाठिंबा मिळत आहे.

राष्ट्रीय एकता, आर्थिक न्यायनीति लोकशाही, नवा सामाजिक दृष्टिकोन आणि जागतिक शांतता या सदराखालीं जी ध्येयें नमूद केली आहेत त्यांचा सर्व नागरिकांनीं विशेषत: त्यांच्या मताची मागणी करणाराची पात्रता ठरवीत असताना काळजीपूर्वक विचार करावा. पुढील प्रकरणात भारतात आज असलेल्या मुख्य राजकीय पक्षाचें स्वरूप आणि धोरणे याविषयी चर्चा करण्याचा आम्हीं प्रयत्न केला आहे.

# ३

# काँग्रेस पक्ष

## ऐतिहासिक पार्श्वभूमि

राजकीय स्वातंत्र्यासाठीं जो लढा देण्यात आला त्यातील प्रमुख चळवळ अखंड इंडियन नॅशनल कॉंग्रेसच्या नावाखालींच मोडत आली आहे. या वस्तुस्थितीचा कॉंग्रेसला फायदा मिळाला आहे, तसेंच तिच्यामुळें कॉंग्रेसचें नुकसान झालें आहे. आजच्या कॉंग्रेस पक्षाविषयीं माहिती हवी असेल तर थोडक्यात तिच्या इतिहासावर नजर टाकणें श्रेयस्कर होईल.

अगदीं सुरुवातीला इंडियन नॅशनल कॉंग्रेस ही एक सुशिक्षितांची संघटना होती. ब्रिटिशांच्या राजवटीविरुद्ध असंतोषाची लाट उसळली, तेव्हा "वैध चळवळ करून ब्रिटिश राज्यकर्त्यांपासून काही सवलती मिळवाव्या" अशा हेतूनें त्यांनीं कॉंग्रेसची स्थापना केली. त्यावेळचे पुढारी उदारमतवादी होते, आणि ब्रिटिशांचा व आपला संबंध हा एक "ईश्वरी योगायोग" असून देशामध्यें उदारमतवादानुकूल लोकशाही स्थापन करणें हा ब्रिटिशांचा संकल्प आहे असा त्यांचा विश्वास होता. तेव्हा कॉंग्रेसचा हेतु अर्थातच "ब्रिटिश राजवटीचें भारतातून उच्चाटण करणें" हा नव्हता, तर त्या राजवटीचा मूळ पाया व्यापक करणें, तिची वृत्ति उदार बनविणें, तिचें स्वरूप उदात्त करणें हा होता.

कॉंग्रेसच्या इतिहासाच्या पुढल्या टप्प्यात एक युद्धयमान हिंदु राष्ट्रवाद उदयास आला. याचे पुढारी महाराष्ट्रांत बाळ गंगाधर टिळक, बंगालमध्यें अरविंद घोष व बिपिन चंद्र पाल आणि पंजाबमध्यें लाला लजपतराय हे होते. उदारमतवाद्यांनीं अर्ज निवेदनें यांचें जे धोरण स्वीकारलें होतें तें टाकून देऊन लोकांनीं स्व-यत्न व झुंझारवृत्तीचा अवलंब करावा असा आदेश या नव्या पुढाऱ्यांनीं दिला. आर्यधर्म आणि आर्यसंस्कृति ही पाश्चिमात्यांच्यापेक्षा उच्च प्रतीचीं आहेत असा

समजुतीवर हा नवा राष्ट्रवाद उभारण्यात आला होता. हिंदुसमाज आणि हिंदुधर्म यांत जे जे काहीं आहे ते सर्व पवित्र आहे असा त्याचा विश्वास होता. अर्थातच ते सामाजिक सुधारणाच्या विरुद्ध होते. म्हणजे त्यावेळचा हा राष्ट्रवाद, राजकीय झुजारपणा व सामाजिक कर्मठपणा ह्यांचे मिश्रण होता स्वराज्य व स्वदेशी यांविषयींच्या घोषणांनीं राष्ट्रीयतेच्या जाणिवेला नवी चालना दिली. ह्या जागृतीचे पर्यवसान वैयक्तिक अत्याचारांत झाले आणि सरकारकडून त्यांना दडपून टाकण्याचा प्रयत्न झाला.

युद्धकाळीं कॉंग्रेसचें साहाय्य सरकारला मिळालें. पण त्यामुळें अधिक स्वातंत्र्य मिळालें नाहीं. मॉंटेग्यु-चेल्म्सफर्ड सुधारणा अगदींच असमाधानकारक मानण्यात आल्या. पंजाबमधील हत्याकांडामुळें देशात चोहोंकडे अशांतता पसरली. याच वेळीं गांधीजी आपला "निर्भर्त्सना" संदेश घेऊन पुढें आले आणि त्यांनीं सत्याग्रह संघाची रचना केली. असहकार आणि कायदेभंगाच्या अनत्याचारी चळवळी महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली १९२७ च्या पुढें झाल्या. त्याच्यायोगें राष्ट्राच्या या चळवळींत एका नव्या चढाऊपणाचा शिरकाव होऊन त्याचें लोण सामान्य जनतेपर्यंत जाऊन पोहोचलें. अनेक सुशिक्षित लोकांना खेड्यात जाऊन रचनात्मक कार्य करण्याची प्रेरणा गांधीजींकडून मिळाली. गांधीजींनीं अखिल भारतीय ग्रामोद्योग परिषदे-सारख्या अनेक अखिल भारतीय स्वरूपाच्या संस्था स्थापून ग्रामविकास कार्यांत एकसूत्रीपणा आणला व त्याला चालना दिली. जनतेच्या आर्थिक उन्नतीच्या अनुबंधानें त्यांनी **स्वराज्य** शब्दामध्यें नवा अर्थ ओतला. स्वदेशी खेड्यांच्या स्वयंपूर्णतेचें तत्त्व झालं. ह्याच काळात चरखा राष्ट्रीय चळवळीचें प्रतीक म्हणून मान्यता पावला.

कायदेभंगाच्या चळवळी आणि त्यानंतर साधारण जनतेमध्यें झालेली जागृति यांच्या योगानें तरुणांना भारतीय जनतेच्या सामाजिक आणि आर्थिक अडचणींची जाणीव झाली आणि त्यांच्यावर समाजवादी विचारसरणीची छाया पडूं लागली. पूर्ण स्वराज्य हें कॉंग्रेसचें ध्येय आणि ग्रामीण जनतेच्या आर्थिक आणि सामाजिक हक्काकडे अधिक आस्थेनें पाहण्याचा शिरस्ता सुरू झाला.

१९३५ सालच्या घटनेनें कित्येक प्रांतामध्यें कॉंग्रेस मंत्रिमंडळाच्या हातीं सत्ता आली, पण लोकनेत्यांच्या संमतिशिवाय भारताला जेव्हा युद्धांत गोवण्यात आलें तेव्हा विरोध दर्शविण्यासाठीं कॉंग्रेस मंत्रिमंडळानें राजिनामे देऊन टाकले.

फॅसिस्ट राष्ट्रांचा प्रतिकार समान भूमिकेवरून करण्यास ब्रिटननें भारताला नकार दिला, तेव्हा कॉंग्रेसनें युद्धप्रयत्नाला प्रथम वैयक्तिक सत्याग्रहाने आणि पुढें १९४२ ची "चले जाव" चळवळ करून विरोध करण्यास सुरुवात केली. पुढाऱ्यांना बंदिवास मिळाल्यानें कॉंग्रेस जणु काय वनवासात असल्यासारखी झाली.

युद्धसमाप्तीनंतर बदललेली आंतरराष्ट्रीय परिस्थिति आणि इंग्लंडमध्यें लेबर सरकारचें आगमन यांचा परिणाम म्हणून भारताला स्वातंत्र्य मिळालें; मात्र स्वातंत्र्याची किंमत म्हणून देशाची फाळणी पत्करावी लागली. तेव्हांपासून कॉंग्रेसच्या हातीं सत्ता आहे, तिचें चळवळीचें स्वरूप नाहींसें होऊन आज तिला एक पक्षरूप प्राप्त झालेलें आहे. ह्या रूपांतरातून अनेक अडचणी उद्भवल्या असून सत्तेच्या पाठोपाठ नवे प्रश्नहि उपस्थित झाले आहेत. रूपांतराच्या काळांत कॉंग्रेसनें असलीं उद्दिष्टें आणि धोरणें यांत कोणत्याहि प्रकारचा फेरफार होऊं दिला नाहीं. तेव्हां आतां आपण तिच्या कांहीं उद्दिष्टांवर व धोरणांवर दृष्टि टाकूं.

## कॉंग्रेसचीं उद्दिष्टें व धोरणें

### १ भारताचें ऐक्य

देशांतील निरनिराळ्या धार्मिक, सांस्कृतिक आणि भाषिक गटांना जी राष्ट्रीय राजकारणविषयक जाणीव झाली आहे ती राष्ट्रीय चळवळीमुळें होय. तथापि, राष्ट्रीय ऐक्य, आणि विशेषेंकरून हिंदुमुस्लिम ऐक्य, एक मोठी समस्या ठरली असून कॉंग्रेसला या बाबतींत झगडावें लागलें आहे. राष्ट्रवाद आणि जातीयवाद यांचा लढा देशांत नेहमींच चालत आला आहे कॉंग्रेस साधारणपणें राष्ट्रवादाचा पुरस्कार करणारी आहे, तर मुस्लिम लीग, हिंदुमहासभा इत्यादि संस्था जातीयवादाचा पुरस्कार करीत आल्या आहेत. हिंदवेतर अल्पसंख्य गटांची भीति निवारण करण्यासाठीं कांहीं विशिष्ट कालमर्यादेपर्यंत जातवार मतदार संघ पद्धति स्वीकारण्यांत आली असली, तरी कॉंग्रेसनें अशा मतदान पद्धतीला विरोध करून निधर्मी राज्यालाच मान्यता दिली आहे.

राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीं देशाच्या फाळणीला मान्यता देणं भाग पडलें आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जे हिंदुमुस्लिम दंगे झाले त्यांनीं देशांत जातीयवादाला बळकटी आणली. निर्वासितांचा प्रश्न आणि काश्मिरचें भिजत पडलेलें घोंगडें यांचा जातीयवादाला जीवदान मिळण्यास उपयोग झाला आहे. तथापि, निधर्मी

राज्याची स्थापना करण्यात काँग्रेस यशस्वी झाली आणि आतापर्यंत तिनें हा निधर्मीपणा टिकविला आहे.

ब्रिटिशांनीं ठरविलेल्या प्रांताच्या मर्यादा अस्वाभाविक असल्याबद्दल काँग्रेसनें नेहमींच कडक टीका केली आणि भाषिक प्रांतावर जोर दिला. पण राष्ट्राच्या विकासाला अत्यंत आवश्यक असलेलें राज्यकारभार आणि राजकारण एतद्विषयक देशाच्या ऐक्याला भाषिक विभागामुळें बाध येईल असें लक्षात आलें तेव्हा स्वातन्त्र्यपूर्व काळातील आश्वासनाला कांहीशी मुरड घालण्यांत आली. पण काँग्रेस आपल्या वचनानें दृढ बांधली गेली होती आणि म्हणून तिला लोकाच्या भाषिक राज्याच्या मागणीला होकार देणें भाग पडलें. पण त्यानंतर घातपाती शक्तींचें जें प्रदर्शन करण्यात आलें तें पाहून "राज्यसीमा ठरविण्याचें भाषा हें प्रभावी गमक मानता येत नाहीं," अशी घोषणा अमृतसरच्या अधिवेशनात करावी लागली व अनेकभाषिक राज्याची शिफारस काँग्रेसने केली.

## २ आर्थिक धोरण

इंडियन नॅशनल काँग्रेसचें जें ध्येय पक्षाच्या घटनेच्या पहिल्या कलमात नमूद केलें आहे तें असे "भारताच्या जनतेचें कल्याण आणि प्रगति आणि समान संधि आणि समान राजकीय, आर्थिक आणि सामाजिक हक्क या पायावर उभारलेल्या सहकारी कुटुंबाची (कोऑपरेटिव्ह कॉमनवेल्थ) शांतताप्रधान व युक्त साधनाद्वारें भारतात स्थापना करणें, आणि जगात शांतता आणि बंधुभाव निर्माण व्हावा यासाठी प्रयत्न करणें"

१९३१ मध्यें कराची येथे भरलेलें काँग्रेस अधिवेशन आणि ए. आय्. सी. सी. यांनीं भारताच्या नागरिकांचे "मूलभूत हक्क आणि कर्तव्य" याची मांडणी केली. त्यातल्या बहुतेकांना भारताच्या आजच्या घटनेंत स्थान देण्यांत आलें आहे. भारताच्या आर्थिक प्रश्नांची सोडवणूक समाजवादी पद्धतीनें करावी असें नमूद करून त्यातच म्हटलें आहे कीं, "प्रमुख उद्योगधंदे आणि सैन्यदलें (services), खनिज संपत्ति, लोहमार्ग, जलमार्ग, सागरी वहातूक आणि दळणवळणाचीं इतर साधनें यांच्यावर सरकारची मालकी किंवा नियंत्रण असावें." १९३६ च्या निवडणूक जाहिरनाम्यात जमिनीचा प्रश्न हाताळण्यात आला होता आणि जमिनीची समान वाटणी करण्याविषयीं अगदीं जहाल कार्यक्रम आखण्यांत

आले होते. उद्योगधंद्याच्या बाबतीत नियोजनावरहि भर देण्यात आला होता. सामाजिक दृष्टिकोनाकडे दुर्लक्ष करण्यात आलें नव्हतें, तर लोकशिक्षणाचा एक कार्यक्रम पुढें मांडण्यात आला होता. इतकेंच केवळ नव्हे तर प्रत्येक व्यक्तीला आपली प्रगति करून घेता येईल अशी परिस्थिति निर्माण करण्याकडेहि लक्ष पुरविण्यात आलें होतें सामाजिक बाबतींत सगळ्याना सुरक्षितता लाभली पाहिजे अशी विचारसरणी पुढें ठेवण्यांत आली होती.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लवकरच कॉंग्रेसनें आपलें आर्थिक उद्दिष्ट ठरवून जाहीर केलें तें असें : "खाजगी मिरासदारी निर्माण न होऊ देतां आणि संपत्तीचें केंद्रीकरण न होऊ देता किमान उत्पादन साधील आणि नागरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेत समतोलपणा राखील अशा प्रकारची समाज-रचना करणें " ह्व्यास-खोर नाही आणि चढाओढखोरहि नाही किंवा तुकडेबजा नाही आणि एकछत्रीहि नाही अशा प्रकारची सामाजिक आणि आर्थिक यंत्रणा निर्माण करण्याचा कॉंग्रेसचा हेतु होता. ह्या तत्वाच्या अनुषंगाने पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखाली एक कमिटी नेमण्यात आली आणि तिनें एक आर्थिक कार्यक्रम आखला. पहिल्या आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनारूपात पुढे झालेल्या सर्व आर्थिक नियोजनात हा कार्यक्रम पायाभूत झाला आहे.

लोकाच्या राहणीचें मान द्रुतगतीनें वाढत वाढत जावें हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. प्रत्येकाला काम मिळावें, प्रत्येक व्यक्तीच्या अंगीं असलेल्या गुणाचा आविष्कार होईल अशी परिस्थिति असावी आणि उत्पन्न समप्रमाणात वाटण्यात यावें. शेतकीबाबत तर जहाल सुधारणा अवश्य होत्या पहिली पंचवार्षिक योजना ही उद्दिष्टे मिळविण्याचा आणि कॉंग्रेसनें लोकाना जी अभिवचनें दिली होतीं तीं कृतींत उतरविण्याचा एक प्रयत्न होता.

कॉंग्रेसच्या ह्या आर्थिक विचारसरणीकडे जेव्हा आपण पाहतो तेव्हा आपणाला तीन मुख्य प्रवाह दिसून येतात. पहिला सर्वोदय उद्दिष्ट. हें गांधीजींच्या खेड्याच्या स्वयंपूर्णतेच्या कल्पनेवर आधारलेलें आहे. दुसरा स्वतंत्र उद्योग. ह्यात औद्योगीकरण हें स्वतंत्र उद्योगाच्या द्वारें करण्यावर भर देण्यात आला आहे. आणि तिसरा, सरकारनें उपक्रम केलेलें पण उत्पादन साधनांची मालकी समाजाकडे असलेलें औद्योगीकरणाचें समाजवादी उद्दिष्ट. आजहि कॉंग्रेसच्या धोरणात हा त्रिमार्गी जोर दिसून येण्यासारखा आहे. याचें उदाहरण म्हणून अवर

चरखा आणि आर्थिक जीवनात सरकारी उपक्रम कोणत्या मर्यादेपर्यंत जावा याविषयींचा वाद दाखविता येईल मूल शिक्षण म्हणजे 'बेसिक' शिक्षण आणि विनोबा भावे ह्यांची भूदान चळवळ यामध्यें सर्वोदयाचा प्रभाव दिसून येतो. १९५३ च्या कॉंग्रेस अधिवेशनात ही "निखालस नीतिप्रवण चळवळ" आहे असे धन्योद्‌गार काढले असून पक्षाच्या सभासदांनीं तिच्याशीं सहकार्य करावे असा आदेश देण्यात आला आहे.

१९५५ च्या आवडी अधिवेशनांत नेहरूंच्या सांगण्यावरून व साम्यवादी आणि समाजवादी पक्षाच्या आव्हानाला उत्तर म्हणून कॉंग्रेसने घोषित केलें कीं, "ज्याच्यात उत्पादनाचीं साधनें समाजाच्या मालकीचीं किंवा समाजाच्या नियंत्रणाखालीं आहेत, ज्याच्यात उत्पादनाची वाढ झपाट्यानें होत राहिली आहे आणि ज्याच्यात राष्ट्रीय संपत्तीची वाटणी समानतेच्या तत्त्वावर होत आहे असा समाजवादी नमुन्याचा समाज स्थापन करण्यासाठी नियोजनाचा अवलंब करावा." समाजवादी मताची छाप पडू लागली आहे हें अगदी स्पष्ट आहे. पण म्हणून मतप्रणाली आणि आशाआकांक्षा यांचा समाजांतर्गत झगडा मिटला आहे असें म्हणतां येणार नाहीं. कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांनीं अगदीं निक्षून म्हटलें आहे कीं, पक्षानें स्वीकारलेला समाजवाद हा नियमबद्ध समाजवाद नाहीं आणि "समाजाचा समाजवादी नमुना" हा शब्दप्रयोग म्हणजे आर्थिक कल्पना आणि कार्यक्रम यांच्यामध्यें आर्थिक विचारसरणीचे जे धागेदोरे ग्रथित करायचे आहेत त्यांना साकल्येंकरून दिलेलें नांव आहे.

## ३ परराष्ट्रधोरण

कॉंग्रेसचें परराष्ट्रधोरण हें नेहरूंच्या नेतृत्वाखालीं विकसित होत होत आजचें रूप त्याला प्राप्त झालें आहे. समाजवादी कल्पना उदयास आल्या तेव्हां कोठें कॉंग्रेसला जगाकडे पाहण्याची दृष्टि आली. आणि तिनें आंतरराष्ट्रीय धोरणात एकंदर जगात लोकशाहीच नांदली पाहिजे असें मत प्रतिपादन केलें. युरोपमध्यें फॅसिस्ट पथानें वर डोकें काढलें तेव्हा त्याचा धिक्कार करणाऱ्या राजकीय संस्थांत कॉंग्रेस पहिली होती तिनें जपानच्या लष्करीगिरीचाहि धिक्कार केला आणि म्युनिकला जें घडलें त्याला कारण झालेल्या पश्चिम युरोपीय लोकसत्ताक राष्ट्रांच्या धोरणावर टीका केली. दुसरें महायुद्ध सुरू झालें तेव्हां कॉंग्रेस लोकशाही राष्ट्रांना

अनुकूल होती आणि ब्रिटिश सरकारनें केंद्रामध्यें जर तत्कालीन राष्ट्रीय सरकार नेमलें असतें तर तिनें युद्धकार्याखातर आपलें सगळें वजन खर्च केलें असतें. ब्रिटनला मदत करायची तर भारताच्या न्याय्य आणि लोकशाही हक्काला मान्यता मिळणें काँग्रेसच्या दृष्टीनें अवश्य होतें. "लोकशाहीची अविभाज्यता" हा काँग्रेसचा मूलभूत सिद्धांत होता. स्वतंत्र राष्ट्रांची जागतिक संघटना असावी आणि राष्ट्रांशीं आणि विशेषतः शेजारच्या राष्ट्रांशी मैत्रीचे संबंध असावेत याला काँग्रेसच्या जाहिरनाम्यात अनुकूलता दर्शविली आहे भारत 'परसत्तेखालीं दबलेली राष्ट्रें आणि लोक यांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न धसास लावील, कारण त्यांच्या स्वातंत्र्याच्या पायावर आणि चोहोंकडे साम्राज्याचा नायनाट होण्यावरच जागतिक शांततेची स्थापना करतां येणें शक्य आहे.

## पक्षाचें कर्तृत्व

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लवकरच ऑल इंडिया काँग्रेस कमिटीनें पुढील महत्त्वाच्या कार्याचा नामनिर्देश केला. तें कार्य हें देशांत खऱ्याखुऱ्या लोकशाहीची आणि सामाजिक न्यायनिति आणि समानता यावर आधारलेल्या समाजाची स्थापना करणें. अशा समाजात प्रत्येक स्त्रीपुरुषाला समानसंधि आणि आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास अप्रतिहतपणें घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यास सर्वांना मोकळीक मिळाली पाहिजे. हें घडवून आणण्याचे दोन मार्ग म्हणजे "केंद्राकडून योजनाबद्ध पुरस्कार आणि राजकीय आणि आर्थिक सत्तेचें विकेंद्रीकरण."

सत्ताधिष्ठित पक्ष ह्या नात्यानें काँग्रेसला हा ठराव कितपत कृतींत आणता आला आहे?

### १ राजकीय दृढीकरण

सत्ता हातीं आल्यावर अगदी सुरवातीसच काँग्रेस सरकारापुढें दोन प्रश्न अचानक उभे राहिले—पाकिस्तानातून भारतात येणाऱ्या लोकांचा जबरदस्त लोंढा आणि काश्मिरची स्वारी. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लवकरच पश्चिम पाकिस्तानातून ४९ लाख आणि पूर्व पाकिस्तानातून २६ लाख निर्वासित भारतात आले. त्यांचें पुनर्वसन करण्याचें कार्य पुरें झालें आहे. पण अलिकडे पुन्हा पूर्व पाकिस्तानातून लोक भारतात येऊं लागल्यामुळें काँग्रेस पुढाऱ्यांच्या आणि विशेषकरून पश्चिम बंगालच्या पुढाऱ्यांच्या मुत्सद्दीपणाला नवीनच आव्हान मिळालें आहे

कॉंग्रेसनें पार पाडलेलें एक महत्त्वाचें कार्य म्हणजे भारताची घटना. कॉंग्रेस पक्षाच्या विचारमंथनातून बाहेर पडलेले मूलभूत हक्क आणि आदेश तत्त्वें यांचा समावेश घटनेमध्ये झाला आहे. आणि ज्या अर्थी ही घटना एकंदर देशाला मान्य आहे त्या अर्थी लोकांनींच ती आपल्यास नजर केली आहे असें म्हणता येईल. भारत एक सार्वभौम प्रजासत्ताक लोकराज्य असल्याचें, व ज्यात भिन्न-जातीय समाज गुण्यागोविंदानें राहू शकेल आणि साऱ्या अर्थानें लोकसत्ताक होईल असें लोकराज्य असल्याचें, घोषित करण्यात आलें.

स्वतंत्र मतदारसंघ काढून टाकण्याचा निश्चय कॉंग्रेसनें केला आणि तो पार पाडला. ज्या अल्पसंख्यांना संरक्षणाची आवश्यकता होती त्यांना तें मिळालें आहे. वर्गीकृत जमातींना देशाच्या जीवनात इतर नागरिकांबरोबर अधिकाधिक सहभागी व्हावें या उद्देशानें त्यांना शिष्यवृत्त्या आणि फीमध्यें सवलती मिळतील अशा योजना करण्यात आल्या आहेत.

दिल्ली सरकारच्या नेतृत्वाखालीं संस्थानांचें सामिलीकरण घडवून आणण्यात त्या काळचे दुय्यम-पंतप्रधान सरदार वल्लभभाई यांचा मुत्सद्दीपणा दिसून आला. सुमारें ६०० संस्थानांचें मन केंद्र सरकाराचा अधिकार मान्य करण्याकडे वळविण्यात आलें. पुढें ह्या सगळ्या संस्थानांना लोकशाही घटनेखालीं आणण्यात आलें. कित्येक संस्थानिकांना राजप्रमुख पदावर घेण्याची हमी दिल्यानें सत्तांतराचा हा प्रश्न, सरंजामी पद्धत जारी असलेल्या कित्येक संस्थानांच्या बाबतींत हा बदल अगदीं क्रांतिकारक स्वरूपाचा असूनहि सोपा झाला.

कॉंग्रेसपक्षानें भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न जेव्हां धसास लावला तेव्हां देशांतील राष्ट्रीय ऐक्य आणि पक्षांतर्गत शिस्त याविषयींचा त्याचा कयास चुकलासें वाटतें. तेलगु भाषिकांचें स्वतंत्र राज्य झाल्यापासून फुटपाडू वृत्ति बळावल्या आणि राज्यपुन-र्रचनासमितीचा रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यावर ह्या वृत्ति किती जोरदार आहेत. हें मुंबईंतील घटनांवरून कळून चुकलें. तथापि, अमृतसरच्या ठरावाचा भावार्थ वास्तवता दाखविणारा असून राष्ट्रविकासाला मारक पुनर्रचनेवर अग्रहक्काचा मान असला पाहिजे हें लोकनिदर्शनाला आणण्यासाठीं ह्या ठरावाचा उपयोग झाला आहे. महाराष्ट्र आणि गुजरात यांचें एक द्वैभाषिक राज्य करण्याचा निर्णय हा राजकीय वास्तवतेनें संकुचित बुद्धीच्या भाषावादावर मिळविलेल्या विजयाचा पुरावाच होय



अनुक्रम 30839
प्रा.वा.
25595

## २ आर्थिक धोरण

आर्थिक क्षेत्रामधली कॅंग्रेसची कामगिरी "स्तुत्य" आहे असा शेरा जागतिक बॅंकेसारख्या संस्थांच्या तज्ज्ञांनीं मारला आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेत देशाच्या आर्थिक विकासाचा पाया चांगल्या प्रकारे घातलेला आहे.

मार्च १९५० मध्यें नॅशनल प्लॅनिंग कमिशन—राष्ट्रीय नियोजन मंडळ—नेमण्यात आलें. आणि पहिल्या पंचवार्षिक योजनेला एप्रिल १९५१ मध्यें आरंभ झाला.

कांहीं थोड्या बाबी सोडल्या तर योजनेंतील उत्पादनाचें लक्ष ह्या वर्षाच्या मार्चमध्येंच म्हणजे योजनेची कालमर्यादा संपतेवेळींच गाठण्यात आलें. ३५० कोटी रुपयांचा तुटीचा अर्थभरणा झाला असूनहि चलनी फुगवटा काबूत ठेव-ण्यात आला आहे. योजना काळांत राष्ट्रीय उत्पन्न ३ टक्क्यांनीं वाढलें आहे. दर डोई उत्पन्न २२८ रुपयाहून २५१ रुपयावर गेलें आहे. ह्या पांच वर्षांत राष्ट्रीय उत्पादन ११ टक्क्यांनीं वाढेल असा अंदाज करण्यात आला होता, तेथें वास्तविक वाढ १७ टक्क्यांनीं झाली. दर डोई उत्पन्नांत जी १० टक्क्यांची वाढ झाली ती लोकसंख्या ७ टक्क्यांनीं वाढली असूनहि झाली आहे.

खरी गोष्ट अशी आहे की, एकंदर अर्थकारण साकल्यानें पुढें पुढें सरकत असल्यामुळें आणि अन्नवस्त्राच्या उत्पादनानें ठरविलेलें लक्ष्य ओलांडिलें असल्या-मुळें शीघ्र आर्थिक प्रगतीला नियोजन साधनीभूत होऊं शकतें असा विश्वास दृढ झाला आहे. निराश वृत्ति जाऊन तेथें अधिक आशादायी वातावरण निर्माण झालें आहे. देशाची नैतिक व भौतिक साधनं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेखालर अधिक त्याग व परिश्रम करण्यासाठीं जणुं काय आता तयारच ठेवण्यात आलीं आहेत.

आर्थिक विस्तारामध्यें जनतेचें सहकार्य मिळविण्याचें एक महत्त्वाचें साधन म्हणून समाजविकास कार्य आणि राष्ट्रीय प्रगतिसेवापथकें हीं उपयुक्त ठरलीं आहेत. सरकारी मदतीला लोकांच्या स्वयंस्फूर्त अंगमेहनतींची जोड देऊन ग्रामीण विभा-गाची उत्पादनक्षमता वाढविणें हा त्याचा उद्देश आहे.

पहिल्या पंचवार्षिक योजनेला आलेल्या खर्चापैकीं सुमारें १५ टक्के खर्च युनायटेड स्टेटस्‌ची परदेशांना मदत योजना, कोलंबो योजनेमधील देश आणि जागतिक बॅंकेकडून कर्ज ह्यातून करण्यात आला. परदेशाची मदत घ्यायची तर तिला कोणत्याहि अटी असतां कामा नयेत असें कॉंग्रेसचें धोरण आहे. पण एकंदर खर्च पाहू जाता परदेशीय मदत कांहीं मोठी नाहीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

भारतीयांच्या कल्याणाला अवश्य असलेल्या तीन गोष्टींवर काँग्रेस पक्षानें आपल्या अलीकडच्या निवेदनात जोर दिला आहे, त्या म्हणजे जमीनविषयक सुधारणा, सगळ्यांना कामधंदा करण्याची अधिकाधिक संधि उपलब्ध करून देणें आणि उत्पन्नाची योग्य वाटणी करणें. दर डोई उत्पन्नात वाढ झाली आहे, पण चांगली वाढ व्हायला म्हणजे लोकांच्या सुधारलेल्या राहणीमानात प्रत्ययास येईल अशी वाढ व्हायला आणखी २० ते ३० वर्षांचा काळ लागेल, कारण इतर देशांशीं तुलना करता भारतातील दर डोई उत्पन्नाची पातळी फारच खालीं आहे योजना जर यशस्वी झाल्या तर राष्ट्रीय उत्पन्न २० वर्षांत दुप्पट होईल.

तथापि काँग्रेसनें शेतकऱ्याला नवीन तऱ्हेची व्यवस्था करण्याचे आश्वासन दिले आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या हितसंबंधाच्या अनुरोधानें उदाहरणार्थ, मध्यस्थ, मोठे मालक छोटे व मध्यम स्थितींतले मालक, स्वेच्छेनें जमीन कसणारे आणि जमिनीशिवाय असलेले कामकरी ह्यांच्या हितसंबंधाच्या अनुरोधानें पहिल्या पंचवार्षिक योजनेत एक व्यापक धोरण आखण्यात आलें त्याचा पहिला टप्पा म्हणजे जमीनदारी नष्ट करणें. हा आंध्र, मुंबई, मद्रास, हैद्राबाद, मध्य भारत, पंजाब, पेप्सु, सौराष्ट्र, भोपाळ, उत्तर प्रदेश आणि मध्यप्रदेश इत्यादि राज्यात जवळ जवळ पूर्ण झाला आहे. पण बऱ्याच राज्यात अजून जमीनधारा कमी करण्यात आलेला नाहीं. पंजाब आणि पेप्सुमध्ये तर अजूनहि धारा फारच फार म्हणजे उत्पन्नाच्या एक तृतीयांश आहे.

मध्यस्थाची प्रथा बंद पाडून आणि जमीन धारणाविषयक सुधारणा करून जमीन मालकी पद्धतींत बदल घडवून आणला म्हणजे शेतकऱ्याला जाचक झालेले आणि ज्यांच्या योगानें शेती उत्पादनात घट येते असे प्रश्न लगोलग सुटणार नाहींत याची जाणीव काँग्रेसला अगदीं सुरुवातीपासूनच होती. यासाठीं ज्याच्यात पाटबंधारे, खतें आणि बीं-बियाणें मिळण्याची सोय, सावकाराच्या पाशांतून शेतकऱ्याची सुटका, आणि नवीन पद्धतीनें शेती करण्याविषयींचे शिक्षण याचा समावेश होईल अशा एखाद्या व्यापक कार्यक्रमाची जरुरी भासू लागली आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनें-तील कामांच्या योगें आणखी एक कोटी सत्तर लक्ष एकर जमीन भिजण्याची सोय झाली आहे. समाजविकास कार्य आणि राष्ट्रीय प्रगति सेवापथकांची कामें यापासून सुमारे १० कोटी लोकांना फायदा झालेला असून आता खताचा अधिकाधिक उपयोग आणि चांगल्या प्रकारचें बींबियाणें यांचा उपयोग करण्यात येत आहे.

पहिल्या पञ्चवार्षिक उत्पन्नाच्या काळांत पाहिजे तितक्या प्रमाणात कामधंदे मिळू शकले नाहींत, याचा परिणाम असा झाला कीं, बेकारी हळू हळू वाढत गेली. तथापि काँग्रेस आणि सरकार यांना या चिंताजनक परिस्थितीची जाणीव आहे. खुद्द ऑल इंडिया काँग्रेस कमिटीनेंच १९५३ सालीं बेकारीबाबत चिंता व्यक्त करून त्या दृष्टीनें योजनेची पुन्हा तपासणी करण्यात यावी अशी सूचना केली

औद्योगीकरणावर जोर देऊन, त्यातल्या त्यात मूलोद्योगाला अग्रहक्क देऊन अर्थकारणाची प्रगति करणें हा दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा हेतु आहे. हा हेतु फार महत्त्वाकांक्षी असून याला ४८०० कोटी रुपये खर्च येणार आहे यातले १२०० कोटी रुपये तुटीच्या अर्थकारणानें संपादित करावयाचे असून त्याचें चलन फुगवट्यावर काय परिणाम होतील हें सांगता येणें कठीण आहे. सुमारें ८०० कोटी रुपये परदेशी साहाय्यनिधींतून घ्यावे लागणार आहेत. ४०० कोटींची तरतूद करण्यांत आलेली नाहीं. ही योजना महत्त्वाकांक्षी आहेच. पण आजच्या परिस्थितींत अशा प्रकारच्या विराट प्रयत्नांचीच जरुरी आहे असे दिसून आलें आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या फलश्रुतीनें जो विश्वास निर्माण झाला आहे त्याच्या बळावर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतहि आपलें राष्ट्र यशस्वी होण्याची आशा आहे.

ठरल्याप्रमाणें ही योजना जर पार पडली तर राष्ट्रीय उत्पन्न पंचवीस टक्क्यांनीं वाढेल आणि दर डोई उत्पन्न रु. २९१ वरून २९६ वर जाईल म्हणजे त्यांत अठरा टक्क्यांनीं वाढ होईल. नागरी आणि ग्रामीण विकासांत समतोलपणा राखण्यांत येईल अशी अपेक्षा असून उत्पादित उत्पन्नाची वाटणी योग्य प्रमाणात व्हावी आणि आरोग्य व शिक्षणाच्या सुखसोयींमध्यें चांगलीच सुधारणा व्हावी असें ध्येय पुढें ठेवण्यात आलें आहे.

सामान्य माणसाला अधिक समृद्ध जीवनाचा लाभ आणि भारताची सामाजिक न्यायनीतीमध्यें प्रगति ह्याचा एक विशिष्ट आणि महत्त्वाचा टप्पा दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत आखून ठेविला आहे. त्यात कर्तबगार अमलबजावणी आणि जनतेचें मनापासून व उत्साहपूर्ण सहकार्य यांची फार जरुरी आहे.

या योजनेची आखणी मोठ्या हिंमतीनें करण्यात आली आहे. पण कोणत्याहि योजनेच्या हेतुविपर्यांचा स्पष्ट विचार झालेला नसला तर तिच्यापासून धोका निर्माण

होण्याची भीति असते, आणि औद्योगिक आणि सामाजिक बाबतीत मागासलेल्या देशात तर ही भीति अधिकच असते. ही योजना पार पाडण्यास लागणारे अधिकारी आणि तज्ञ तयार करण्याकडे सरकारने तातडीनें लक्ष पुरविले पाहिजे. सरंजामशाही देशाचा लोकशाहीच्या चौकटीत आर्थिक विकास साधणे ही एक अभूतपूर्व गोष्ट आहे आणि ती यशस्वी होण्यासाठीं जनतेच्या जाणकार पाठिंब्याची आवश्यकता आहे ह्याला उपयुक्त ठरेल अशा प्रकारे आमची शिक्षणपद्धति बनविण्यात आली आहे कीं नाही याबद्दल शंका आहे.

## ३ परराष्ट्र धोरण

परराष्ट्रीय धोरणाबाबत कॉंग्रेसची कामगिरी उल्लेखनीय आहे.

१९५१ च्या कॉंग्रेस जाहिरनाम्यात थोडक्यात असे म्हटले होते कीं, "परराष्ट्रीय धोरणाविषयीं म्हणाल तर कॉंग्रेसने राष्ट्रहितासाटीं आणि जागतिक शांततेसाटीं स्वतंत्र भूमिका घेतली असून सगळ्या देशाबरोबर मैत्रीचे संबंध राखण्याचा प्रयत्न केला आहे ' संयुक्त राष्ट्रसंस्थेच्या चौकटीत बसेल असे भारताचे जे प्रभावी तटस्थतेचे परराष्ट्र धोरण आहे त्याचें पितृत्व, पंतप्रधान नेहरूकडे आहे असे सहज म्हणता येण्यासारखे आहे. हे धोरण भारताच्या पूर्वीच्या आणि सध्याच्या परिस्थितीचा परिपाक आहे. ब्रिटन आणि पाश्चिमात्य सत्तांशी भारताचे घनिष्ठ संबंध होते आणि राष्ट्रकुलात राहण्याचा निर्णय त्याने घेतला होता. हे संबंध चालू ठेवण्यात आले, आणि आपल्या सीमेबाहेरील देशाशीं तेढ निर्माण होऊन तिचा अडथळा आपल्या आर्थिक धोरणाला होऊ नये म्हणून आपले मोठे साम्यवादी शेजारी, चीन आणि रशिया यांच्याशीं मैत्री राखणे भारताला भाग पडलें.

परंतु नेहरूनीं अनेकदा सांगितल्याप्रमाणें हें धोरण म्हणजे प्रभावी तटस्थता आहे, कारण पंचशील नावाने ओळखण्यांत येणारीं पाच तत्त्वें यातूनच उदयास आली आहेत. चिनी सैनिकांनीं जेव्हा तिबेटमध्यें प्रवेश केला तेव्हा चीन आणि भारत ह्या दोन देशाच्या दरम्यान समजुतीचें वातावरण राखण्याची निकड भासू लागली. त्या निकडीचा परिणाम म्हणजे हीं पाच तत्त्वें.

भारताची कार्यशील तटस्थता एका तिसऱ्या राष्ट्रगटाच्या निर्मितीस कारण झाली. आंतरराष्ट्रीय परिस्थितीवर या गटाची छाप बरीच पडली असून शांतता

रक्षणाला, किमानपक्षी तेढ कमी करण्याला तिचा बराच उपयोग झाला आहे. प्रथम यात कोलंबो राष्ट्रेंच होतीं, पण पुढें ही व्याप्ति वाढविण्यात येऊन आफ्रिका आणि आशियामधील सगळ्याच स्वतंत्र राष्ट्रांचा समावेश करण्यात आला. साम्यवादी राष्ट्रांशीं मैत्रीचे संबंध असल्यामुळें आणि शीतयुद्धात तटस्थ भूमिका स्वीकारल्यामुळें कोरियन युद्धात, इंडोचायनामधील लढ्यात आणि चीन–यु. एस. ए. संबधात भारताला यशस्वी मध्यस्थी करता आली.

आंतरराष्ट्रीय क्षेत्रात भारताची इभ्रत आणि वजन त्याच्या भौतिक सामर्थ्याच्या मानानें कितीतरी अधिक आहे, याला कारण त्याचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचे व्यक्तिमत्त्व व पृथगात्मता होय. संयुक्त राष्ट्रपरिषदेचे भारताचे दिवंगत प्रतिनिधि बी. नरसिंगराव आणि सध्याचे प्रतिनिधि व्ही. के. कृष्ण मेनन ह्यांनी त्या परिषदांमध्ये एवढी मोलाची कामगिरी बजावली आहे कीं, भारताच्या शब्दाला युनो कौन्सिलांत आज मान आहे

सगळ्या राष्ट्रांशी मैत्री आणि जागतिक शांतता व बंधुभाव संपादन करणे आणि कोणत्याहि सत्तागटाला सामील होण्यास नकार हे भारताचे जाहीर धोरण आहे पण हंगेरीतील परिस्थितीबाबत भारताची भूमिका त्याच्या ह्या जाहीर धोरणाशी सुसंगत नसल्यामुळें पुष्कळ लोक बुचकळ्यात पडले आहेत.

काश्मिरवाद हा भारताच्या आंतरराष्ट्रीय संबंधातील एक अत्यंत गंभीर प्रश्न आहे. स्वातंत्र्यानंतर लवकरच टोळीवाल्यांनीं व पाकिस्तानी फौजांनीं काश्मिरावर स्वारी केली तेव्हा भारताने तांबडतोब संरक्षक सैनिकी उपाय योजले. पण जानेवारी १९४८ च्या युद्धबंदीनंतर शांततेने वाटाघाटी करून व काश्मिरमध्ये लोकमताची चाचणी घेऊन हा प्रश्न सोडविण्याची भूमिका भारताने घेतली आहे. गेल्या आठ वर्षांच्या अनिश्चिततेच्या काळात काश्मिरचे भारताशी जवळ जवळ सामिलीकरण झाले असून भारताच्या राजकीय आणि आर्थिक जीवनात ते पूर्णपणे सहभागी झाले आहे. पंतप्रधान नेहरू यांनी स्पष्ट सांगून टाकले आहे कीं, पाकिस्तानाने अमेरिकेकडून सैनिकी मदत घेऊन आपल्या सैन्यबळाची वाढ चालविली असल्यामुळें आणि सीटो करार व बगदाद सैनिकी करार यात पाकिस्तान सामील झाल्यामुळें, शिवाय गेल्या आठ वर्षांत काश्मिरची राजकीय आणि आर्थिक बाबींत प्रगति झाली असल्यामुळें काश्मिरच्या वादाचें स्वरूपच बदलले आहे, तेव्हा आता लोकमत अजमावून पाहण्याची आवश्यकता उरली नाही. काश्मिरची स्थितिस्थापकता

आता टळवायची म्हणजे लोकसंख्येच्या स्थलांतराची भयानकता आणि हालअपेष्टा यांना आवाहन करण्यासारखं आहे. ह्या वादामध्ये भारतानें पाकिस्तानपुढें ठेवलेल्या गोष्टी अशा आहेत, युद्ध तहकुबीच्या वेळीं ताब्यात असलेल्या मुलखा-वरून सीमा ठरविण्यात याव्यात आणि पाकिस्तानशीं युद्धप्रसंग ओढवून आणता नये. ह्या दोन्हीहि गोष्टींचा हेतु शांतता रक्षण आणि कायमची तेढ मिटविण्याचा आहे. तथापि एक गोष्ट येथें नमूद करणें आवश्यक आहे की, काश्मिरबाबत आपण घेतलेल्या भूमिकेच्या रास्ततेविषयीं जगाची खातरी करून देणें पंडित नेहरूंना शक्य झालेलें नाहीं.

आपल्या परदेशीय धोरणाच्या काहीं तत्त्वाबाबत भारतानें जी अढळ भूमिका घेतली आहे तिची झळ त्याला लागल्याशिवाय राहिलेली नाही. कोणत्यातरी एका गटाची बाजू स्वीकारून त्यातील राष्ट्राबरोबर परस्पर संरक्षण करारावर जर भारतानें सही केली तर त्याला आजच्यापेक्षा अधिक मोठ्या प्रमाणावर परदेशी आर्थिक मदत मिळण्याचा संभव आहे. पण असें झालें तर ज्या तत्त्वांनीं त्याला मानाचें स्थान दिलें आहे आणि जागतिक शांततेच्या परिसरात वजन वाढविलें आहे त्या तत्त्वांना मुरड घालण्याचा प्रसंग येईल.

## राजकीय श्रद्धा व नेतृत्व

राष्ट्रीय उद्दिष्ट साध्य करण्याविषयीचा कॉंग्रेसचा जो कार्यक्रम आहे त्यात स्वमताचा आग्रह मुळींच नसल्यामुळें त्याचें वर्गीकरण कोणताहि "वाद" किंवा मतप्रणाली याबरोबर करणें सर्वथैव अयोग्य होईल. यानें त्याला एकप्रकारचा लवचीकपणा येत असला तरी निश्चयात्मक क्रियेला अडथळा येऊन एकाच वेळीं निरनिराळ्या धोरणांचा पुरस्कार होण्याचा धोका निर्माण होतो. नियोजनाला निश्चित मार्गदर्शनाची जरुरी असते. तेव्हा जसजसे निरनिराळे प्रश्न उद्‌भवतील तसतसे ते सोडविण्याच्या आशेवर कोणत्याहि पक्षाला विसबून राहता येणार नाहीं. कोणतीहि योजना हातीं घेतली की तिच्यासंबधीं स्पष्ट निर्णय घेण्यात आले पाहिजेत आणि त्याची अमलबजावणी निश्चयात्मकपणें करण्यात आली पाहिजे. राष्ट्रीयीकरण काहीं विशिष्ट उद्योगधंद्यांच्याच बाबतीत मर्यादित करायचें असेल तर त्या मर्यादा स्पष्ट करण्यात आल्या पाहिजेत. स्वमताग्रहविहीन प्रयत्न, (याला मुरड घातलेली मतप्रणालीहि म्हणता येईल,) केला तर योजना आणि धोरणें यांना

शिथिल आणि अवजड रूप येते आणि मग निश्चयात्मक कृति करणे कठीण होऊन बसते.

शिवाय, तडजोडीचें धोरण पक्षाचे कार्यक्रम राष्ट्रीय उद्दिष्टें आणि आशा-आकांक्षा यांशीं जुळती व्हावी किंवा सुसंगत राहावी म्हणून जर स्वीकारलें असलें तर मग लोकशाहीला त्याच्यापासून कांहीं धोका नसतो, पण आपली सत्ता कायम राखण्यासाठीं जनमताच्या सुरावर नाचण्याचा प्रसंग अशा धोरणामुळें काँग्रेसवर ओढवला, आणि असें होण्याची भीति अगदींच निराधार नाहीं, तर मग काँग्रेस पक्षाचें वर्तन पक्षीय उद्दिष्टांशीं विसंगत होईल आणि देशांतील लोकशाहीला काँग्रेसपक्ष खरोखरांचा धोका ठरेल.

काँग्रेस पक्ष आता सत्ताधारी असल्यामुळें पक्षाचें वजन कमी होण्याचा धोका काँग्रेसने सावधगिरी ठेवून टाळला पाहिजे. आजची काँग्रेसची जी किर्ति आहे तिला कारण कांहीं नामवंत पुढारी आहेत यांतले अनेक भारतांत प्रसिद्ध असून जगातहि चोहोंकडे मानमान्यता पावले आहेत आता पुढारी आणि काँग्रेसजन यांना सत्तेच्या गुर्मीनें नीतिभ्रष्ट होण्याचा धोका आहे स्वतःच्या किंवा आप्तेष्टांच्या व मित्रमंडळींच्या फायद्यासाठीं सरकारी कामकाजांत हस्तक्षेप केल्याचीं, आणि सत्तेचा दुरुपयोग केल्याचीं उदाहरणें थोडीथोडकीं नाहींत. नियंत्रणांत शिथिलता आल्यामुळें आणि राजकीय पुढाऱ्यांनीं दैनंदिन कारभाराकडे पुरावें तितकें लक्ष न पुरविल्यामुळें राज्यकारभारांतील भ्रष्टाकार विकोपाला गेला आहे. सरकारने नीतिभ्रष्टताविरोधी उपाय योजिले असूनहि हें अरिष्ट अजून अस्तित्वांत आहेच. ह्याचा पूर्णपणे नायनाट होईल असे जालीम उपाय अंमलांत आणण्याची फार आवश्यकता आहे.

उदार धोरणाला अडथळा आणणारा एक कर्मठांचा वर्ग काँग्रेसमध्यें आहे. शिवाय पक्षाचें निधर्मी लोकशाहीस्वरूप व कार्यक्रम धोक्यांत आणणारा जातीयवादी वर्गहि काँग्रेसमध्यें आहे. हिंदु कायदा संविधानक सोडून द्यावें लागलें यावरून या वर्गाची शक्ति अजमावतां येण्यासारखी आहे. पक्षाच्या व्यापक धोरणापुढें आपल्या संकुचित ध्येयाला गौण स्थान देण्यास त्यांना कोणी भाग पाडीत असेल तर नेहरूंचें पहाडासारखें उच्च व्यक्तित्व होय. पुरुषोत्तमदास टंडन यांच्या नेतृत्वाखालीं सनातनी वर्गाच्या हातीं पक्षाचीं सूत्रें आलीं आणि केंद्रीय काँग्रेस सरकारचें धोरणच बदलण्याचा प्रयत्न त्यांनीं चालविला तेव्हां आणीबाणीचीच

वेळ आली होती. नेहरूंनीं मधें पडून त्याचा पाडाव केला. पण नेहरू गेल्यावर उदार मतवादी वर्ग या सनातनी वर्गाला तोंड द्यायला समर्थ ठरेल का?

कॉंग्रेसपक्षामध्यें भाषावाद हा आणखी एक फूटपाड्या प्रवाह दिसून आला आहे पक्षाचीं उद्दिष्टें आणि हुकुमनामे मोटमोठे कॉंग्रेसजन धाब्यावर बसवितात तेव्हा कित्येक कॉंग्रेसजनाची निष्ठा कशी सापेक्ष असते आणि त्याच्या आशाआकांक्षा कशा संकुचित म्हणजे मुख्यत्वेंकरून प्रांतीयच असतात याचा प्रत्यय येतो

कोणत्याहि पक्षाचें ऐक्य आणि सामर्थ्य, कॉंग्रेसचें नेहरूवर आहे, तसें एकाच व्यक्तीच्या लोकप्रियतेवर आणि व्यक्तिमत्त्वावर अवलंबून असेल तर त्या पक्षाची भविष्यकालीन सद्दी संपलीच म्हणायची. ह्या संदर्भात "नेहरूनंतर काय?" ह्या प्रश्नाला एक विशेष अर्थगांभीर्य येतं. प्रभावी व्यक्तिमत्त्व एकदा का प्रांगणातून दूर झालें तर मग कर्मठवादी आणि जातीयवादी शक्ति कदाचित् मोकाट सुटतील आणि देशातील इतर जातीयवादी पक्षांशीं हातमिळवणी करून स्वातंत्र्योत्तर काळांतील सारी कमाई उध्वस्त करून टाकतील यास्तव पक्षामध्यें सुधारणा घडवून आणण्याची, कार्यशील सभासदांतली विकृति घालविण्याची आणि सामान्य कॉंग्रेजजनांना शिस्त लावण्याची आवश्यकता आहे.

अशा प्रकारें कडक टीका करूनहि एका महत्त्वाच्या गोष्टीचा विसर पडू शकत नाहीं. ती ही कीं, आज देशामध्यें कॉंग्रेसची सुदृढता किंवा तिच्यासारखें नेतृत्व दुसऱ्या कोणत्याहि पक्षाकडे नाही. राष्ट्रीय ध्येयांना पक्षानें मान्यता दिली आहे त्यात बऱ्याच बाबतींत शिथिलता दिसून येत असली तरी व्यवहारात ती खरी करून दाखविण्यात आली. यावरून देशातील बहुतेक मतदार कॉंग्रेसला अनुकूल मतदान करण्याचा दाट संभव आहे. पण ज्यांना आपण मत देणार आहों ते उमेदवार निरपवाद प्रामाणिक असून कॉंग्रेसमध्यें सुधारणावादी प्रभावी शक्ति संचारित करण्यास आणि कॉंग्रेसला लोकसेवेला जुंपण्यास समर्थ आहेत कीं काय याविषयींची खबरदारी मतदारांनीं घेतली पाहिजे.

# ४

# समाजवादी पक्ष

भारतात समाजवाद राजकीय शक्ति म्हणून १९३४ मध्ये नावारूपास आला. त्यावेळीं यात मार्क्सवादावर आधारलेल्या रशियातील क्रांतिपासून प्रेरणा मिळालेल्या काहीं तरुण मंडळींचा एक लहानसा गट होता. ह्या गटाचे सभासद, त्यांची घटना आणि नियम जरी निराळे होते, आणि कामगार व शेतकरी वर्गामध्यें आपलें ट्रेड युनियनचें काम ते स्वतंत्रपणें चालवीत होते तरी राजकीय बाबतींत ते इंडियन नॅशनल कॉंग्रेसचाच एक भाग होते आणि कॉंग्रेस समाजवादी पक्ष या नांवानें ओळखले जात होते. यामुळें त्यांना काहीं अडचणी होत्या. त्यांना राजकीय बाबतींत निर्णय घेऊन ते अमलांत आणणें शक्य नव्हतें, कारण ते स्वतंत्र नव्हते. आपल्या निर्णयांना कॉंग्रेसची मान्यता मिळविणेंहि शक्य होत नव्हतें. त्यांचे बहुतेक निर्णय फेटाळूनच लावण्यात येत असत, कारण त्यांचे मार्ग कॉंग्रेसपेक्षा अधिक जहाल आणि गतिमान होते. असें होतें तरी कॉंग्रेसच्या विचारसरणीवर आणि कार्यावर आपली छाप पाडण्यात त्यांनीं बरेंच यश मिळविलें होतें. कॉंग्रेसमध्ये त्यांनीं केलेल्या कार्याचा आढावा घेऊन जयप्रकाश नारायण यांनी म्हटलें होतें कीं, “तडजोडीच्या राजकारणाला आम्ही अडसर घातला, चढाऊ यंत्रणा देऊन आम्ही संस्थेला खंबीरपणा आणला आणि कॉंग्रेसमध्ये समाजवादाचें वातावरण निर्माण करण्यात आम्हाला यश आलें. आणि आज प्रत्येक कॉंग्रेसजन आपणास समाजवादी म्हणवून घेण्यास उत्सुक दिसून येतो, मग तो वास्तविक समाजवादी असो वा नसो, यातच आमच्या पक्षाच्या कामगिरीचें श्रेय साठविलेलें आहे.”

एक दिवस आपण बहुसंख्य होऊं अशा आशेनें मन वळविण्याचा प्रयत्न करून व लोकशाही पद्धतीचा अवलंब करून बहुसंख्यांना विरोध करण्याचें

धोरण त्यांनी स्वीकारलें होतें. पण आपण कांहीं फार दिवस कॉंग्रेसचें शेपूट किंवा गौणांग होऊन राहू शकणार नाहीं याची त्यांना जाणीव होती. कॉंग्रेस समाजवादी पक्षाचा सभासद व्हायचें तर कॉंग्रेसचाहि सभासद व्हावें लागत असे. १९४६ च्या कानपूर अधिवेशनात "कॉंग्रेस" हा शब्द गाळण्यासंबधीं एक महत्त्वाचा निर्णय घेण्यांत आला. आता ते ' समाजवादी पक्ष" ह्या नावानें ओळखण्यात येऊ लागले.

## समाजवादी कांग्रेस सोडतात

१९४८ च्या नाशिक येथील परिषदेत समाजवाद्यांनीं कॉंग्रेस सोडण्याचा आणि एक स्वतंत्र पूर्णांगी राजकीय पक्ष बनविण्याचा निर्णय घेतला. ह्या ऐतिहासिक महत्त्वाच्या निर्णयाला जी कारणें झाली त्यातलीं कांहीं अशी

१. ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीनें १९४८ सालीं पक्षाची घटना स्वीकृत केली, तिच्याप्रमाणें कॉंग्रेस ही राष्ट्रीय आघाडी राहिली नव्हती, तर तिला पक्षरूप प्राप्त झालें होतें.

२. आता कॉंग्रेस पक्ष सत्ताधिष्ठ पक्ष झाला होता. तेव्हां घटनेनुसार पार्लमेंटरी पद्धतीची लोकशाही अमलात यावी म्हणून प्रभावी विरोधी पक्ष तांतडीनें अस्तित्वात येण्याची निकड समाजवादी पक्षानें ओळखली होती. सत्ताधिष्ठ पक्षावरचा जनतेचा विश्वास जर उडाला तर पर्याय सरकार बनवू शकेल असा विरोधी पक्ष असल्याशिवाय लोकशाही चालू शकत नाहीं आणि असा जो पक्ष असेल त्याला मूलभूत राष्ट्रीय ध्येयें मान्य असलीं पाहिजेत. समाजवादी पक्ष असा पक्ष होता. ह्या पातळीला पोहोंचू शकेल असा दुसरा कोणताहि पक्ष नव्हता.

गांधीजी सत्ताधिष्ठ पक्षावर एकसारखी टीकेची झोड उठवीत असत, तेव्हा गांधीजी म्हणजे नागरिक स्वातंत्र्य व जनतास्वातंत्र्य याची जणु काय हमीच होते. पण त्यांच्या मृत्यूनें हे नियंत्रण नाहींसें झालें. सत्तास्थाना आलेल्या बऱ्याच कॉंग्रेसजनांना लोकांच्या स्वातंत्र्याची बिलकुल पर्वा नव्हती. अधिकारदर्प आणि हुकूमशाही ही राज्यकारभारात दिसून येत होती. ह्या वृत्तींना आळा बसावा म्हणून राष्ट्राला एका विरोधी पक्षाची—ज्याची देशभक्ति आणि लोकशाहीवरील श्रद्धा अशंकित असतील अशा पक्षाची जरूरी होती.

४. समानता आणि न्याय याच्या पायावर समाजरचना करण्यासाठीं जहाल

आर्थिक आणि सामाजिक सुधारणा कॉंग्रेस पक्ष घडवून आणील असा विश्वास बाळगता येणार नाही अशी समाजवाद्यांना भीति होती. समानतेच्या तत्त्वावर समाजव्यवस्था लागल्याशिवाय भारतात लोकशाहीला खरेखुरें अस्तित्व आणि स्थैर्य लाभणार नाही अशी त्याची खात्री होऊन चुकली होती.

मोठ्या विषण्ण मनानें ते कॉंग्रेसमधून बाहेर पडले. याचा उल्लेख करून जयप्रकाश नारायण यांनी नाशिक अधिवेशनाच्या वेळीं असे उद्‍गार काढले "आपण कॉंग्रेस सोडून जाऊं तेव्हा आम्ही अनेक मित्रांना आणि स्नेह्यांना मागे ठेवून जाणार आहोत त्यांच्याशी असलेले आमचे खाजगी आणि वैचारिक संबंध कधींहि तुटणार नाहींत. बाहेर राहून कार्य करीत असताहि त्यांचे हात बळकट करण्याचा प्रयत्न आम्ही करूं आणि विरोधी भूमिकेवर कार्य करीत असताना आम्ही त्यांचे काम हलकें आणि त्याचा मार्ग सुकर करूं" यात कटुता अशी नव्हतीच. उच्च आदर्श आणि राष्ट्राचें अनीव कल्याण हीच याची कार्यकारक शक्ति होती. अशी मनोवृत्ति ठेवून त्यांनी स्वतंत्र राजकीय पक्ष म्हणून कार्य करण्यासाठीं, लोकशाहीला उपयुक्त व विश्वासार्ह विरोधीपक्ष म्हणून कार्य करण्या-साठीं प्रस्थान ठेवले.

पक्षानें १९५१–५२ च्या निवडणुकी लढविल्या त्या वेळीं त्यांनी जाहीर केलेला राजकीय कार्यक्रम असा होता

वैयक्तिक स्वातंत्र्य, आर्थिक समता आणि सामाजिक गमनशीलता हीं मूलभूत तत्त्वे म्हणून नमूद करण्यात आलीं होतीं. आजची समाजाची रचना अन्यायाची आणि स्थिर स्वरुपाची आहे हें मान्य करून तिच्या जागीं अधिकाधिक संधी आणि उत्पादन देणारी नवी समाजरचना निर्माण करणे, राज्यकारभारविषयक फेरबदल तोकडे आहेत, मूळ रचनेतच फेरबदल आवश्यक आहेत अशी जाणीव त्यांना होती. पक्षातील एक मुख्य प्रवक्ते अशोक मेहता यांनी म्हटले होते कीं, जनतेच्या कार्यशील शक्तींना पूर्ण वाव देण्यात यावा या संबंधींचाच विचार समाजवादी कार्यक्रमात झाला आहे असें नाहीं, तर उपक्रम आणि अमलबजावणी यांविषयींचे अधिकार जनतेला पुन्हा मिळवून देण्याचाहि विचार आला आहे. त्यांच्या कार्यक्रमात पंचायती, समाजकेंद्रें, सहकारी संस्था, ट्रेड युनियन्स, ग्राहक समित्या आणि सार्वजनिक संघीभूत संस्था—कॉर्पोरेशन्स—ठळकपणे नमूद करण्यात आल्या होत्या. ग्रामपंचायती ह्या कार्यकारी लोकशाहीचे प्रमुख

घटकावयव मानण्यात आल्या होत्या. जमिनीची फेरवाटणी आणि लहान लहान यंत्रविकास यांसारख्या सुधारणांचाहि विचार त्यात झाला होता. लहान यंत्राचा असा फायदा होणार आहे की, त्याने उत्पादनात वाढ तर होईलच, पण आपण कांहीं तरी विधायक कार्य करीत आहो असे समाधान मनुष्याला मिळणार आहे. अशा प्रकारे समाजवादी कार्यक्रमात सरकारी नियंत्रण आणि खाजगी उपक्रम, केंद्रीय देखरेख आणि विकेंद्रित कार्यव्यवहार याच्यामध्ये अवश्य तो समतोलपणा राखण्यात आला होता.

निवडणुकींत पक्षाला अपेक्षेप्रमाणे यश आले नाहीं. लोकसभेत त्याना फक्त १२ म्हणजे एकंदर जागाच्या २.४५ टक्के जागा मिळाल्या. पण आपण जेव्हा विश्लेषण करता तेव्हा आपणास दिसून येते कीं, मतबलाच्या दृष्टीनें राष्ट्रीय पक्षात समाजवादी पक्षाचा दुसरा क्रम लागतो. त्याला एकंदर १,११,२६,३४४ म्हणजे १०.५ टक्के मतें पडली. कॉंग्रेसला एकंदर ४,७७,११,१८५ मतें म्हणजे ४५-०१ टक्के मतें पडली. साम्यवाद्याना ५३,७०,३६१ म्हणजे ५.०६ टक्के मतें पडलीं. त्याना जागा मात्र २६ मिळाल्या.

## सामीलनामा

कॉंग्रेसचे एक मुरलेले पुढारी आचार्य कृपलानी याच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेस-मधल्या एका गटानें कॉंग्रेस सोडली; आणि सार्वजनिक निवडणुकीपूर्वी १९५१ च्या पाटणा अधिवेशनात कामगार मजदूर प्रजा पक्ष नावाचा आपला नवा पक्ष स्थापिला. ह्या घटनेविषयीं समाजवादी पुढाऱ्यांचे अनुकूल मत होतें. त्यांच्यामध्यें बऱ्याच मुद्यावर साम्य असल्याचे त्याना आढळून आलें. त्यातील कांही मुद्दे असे

१ दोन्हीहि पक्ष एकाकाळीं कॉंग्रेसचाच भाग होते. पण दिवसानुदिवस कॉंग्रेस अधिकाधिक कर्मठपणाकडे ओढली जात असल्यामुळें आणि आर्थिक आणि सामाजिक प्रगति साधण्यासाठीं निर्धारपूर्वक योजना करायचे सोडून स्थितिस्थापत्व राखण्याचीच आस्था तिला लागल्यामुळे त्यांनीं कॉंग्रेसचा त्याग केला.

२ समाजांत फेरबदल घडवून आणण्यासाठीं शांततेच्या साधनाचाच उपयोग करण्यांत आला पाहिजे या मताला दोन्हीहि पक्ष बांधलेले होते.

३ लोकशाहीवर दोहोंचाहि विश्वास होता आणि राजकीय स्वातन्त्र्याला सगळ्यात वरचें स्थान देण्याची आवश्यकता दोन्हीहि पक्षानी ओळखली होती.

४. जमीनविषयक सुधारणाविषयीं म्हणाल तर, नुकसान भरपायीशिवाय जमिनी काढून घेऊन त्यांची समान फेरवाटणी करून शेतीचें विकेंद्रीकरण करण्यात आलें पाहिजे अशी त्यांची श्रद्धा होती. कित्येक उद्योगधंद्यांचें विकेंद्रीकरण झालें पाहिजे पण ज्यांचें विकेंद्रीकरण करणें शक्य नसेल त्यांची रचना आणि नियंत्रण सामाजिक तत्त्वावर करण्यात यावें असें त्यांचें मत होतें. स्वतंत्र ट्रेड युनियनच्या चळवळीवर त्यांची श्रद्धा होती.

पण त्यांच्यात मतभिन्नताहि होती, आणि तिच्यातून कांहीं प्रश्न उद्‌भवणार होते. या बाबतींत आचार्य कृपलानी यांनीं म्हटलें कीं, ' ज्याच्यात सामाजिक, राजकीय आणि आर्थिक पिळणूक होणार नाहीं असा वर्गविहीन, जातिविहीन समाज आम्हां दोघानांहि हवा आहे. समाजवादी त्याला समाजवादी समाज म्हणतात, आम्ही त्याला सर्वोदय समाज म्हणतो."

हें दिसतें तितकें सोपें नाहीं. समाजात फेरबदल घडवून आणण्याचे सर्वोदयी मार्ग समाजवादी मार्गाहून निराळे आहेत. सर्व माणसें वरवर सारखींच दिसत असलीं तरी मूलतः एकसारखींच आणि अंतर्हृदयात चांगली आहेत या समजुतीवर सर्वोदयी मार्ग आधारलेला असल्यामुळें तो वैयक्तिक मार्ग आहे. सर्वोदय असेंहि धरून चालतो कीं, लोकांच्या सदसद्विवेकाला नुसतें आवाहन जरी केलें तरी "आपलें जे कांहीं असेल त्याचा आपल्या बंधुजनांबरोबर उपभोग घेण्यास लोक तयार होतील." येत्रज्ञशाहीप्रमाणें सर्वोदयहि, ज्याच्यात सरकार ह्या संस्थेचें अस्तित्वच उरणार नाहीं अशा सुराज्याच्या—युटोपियाच्या—विचारात दंग आहे. तेव्हां असा महत्त्वाचा प्रश्न उद्‌भवतो कीं, जमीनविषयक समस्या सर्वोदयाला योग्य आणि परिणामकारकतेनें सोडविता येणें शक्य होईल का?

भूदान चळवळीचे पुढारी आचार्य विनोबा भावे यांनीं भू-विप्लवसिद्धीसाठी पांच कोटी एकर जमीन १९५७ सालापर्यंत मिळविण्याचा संकल्प केला आहे. आतापर्यंत कार्यसिद्धि कोठवर झाली आहे? सहा वर्षें परिश्रम करून ४२ लक्ष एकर जमीन मिळालीं आहे. वास्तविक झाली ती कामगिरी कांहीं क्षुद्र नाहीं. तथापि हा प्रयत्न पुरेसा आहे कीं नाहीं याविषयीं पुष्कळांना शंका आहे. कारण, ह्या मार्गानें जमिनीचा प्रश्न सुटेल असें जरी धरून चाललें, तरी ह्या गतीनें पांच कोटी एकर जमण्यास अर्धशतकाचा किंबहुना, अधिक काळ लागणार आहे.

जयप्रकाश नारायणसारख्या कांहीं लोकाना वाटतें कीं, जमिनीचा प्रश्न सोडविण्यास सर्वोदय चळवळ पुरेशी आहे. पण राममनोहर लोहियासारख्या दुसऱ्या काहीं लोकाना वाटतें की, सर्वोदयानें माणसाचें हृदयपरिवर्तन आणि सरकारी यंत्रणेनें कायद्यात बदल ह्या दोन्ही एकाच नाण्याच्या दोन बाजू असून दोन्हीहि महत्त्वाच्या आहेत. निष्फळता टाळायची असेल तर या दोन्हींचा संगम एका विशिष्ट बिंदूवर झाला पाहिजे. अलीकडे अनेक क्रांत्या झाल्या आहेत, पण त्यानीं एका जुलमशाहीच्या जागीं दुसरी जुलमशाही सुरू केली आहे. जगानें प्रेमाच्या अनेक क्रांत्यांची मार्गप्रतीक्षा केली आहे, पण त्या मूर्त स्वरूपात आल्याच नाहीत. साम्यवाद हा द्वेषाचा सिद्धांत आहे तर सर्वोदय आजपर्यंत प्रेमाचा तोकडा सिद्धांत ठरला आहे. तेव्हा प्रेम आणि राग, सर्वांवर प्रेम आणि अन्यायाचा राग यांची क्रांतीच्याद्वारें संयुक्त अभिव्यक्ति होईल तेव्हाच मानवजातीला पुढचें पाऊल टाकणें शक्य होईल. देशातील बहुजन समाजाशीं हा प्रश्न निगडित असल्या कारणानें याचें महत्त्व दुसऱ्या कोणत्याहि प्रश्नापेक्षा अधिक आहे. तेव्हा अशा भव्य स्वरूपाचा आणि निकडीचा प्रश्न वास्तवतेचा अवलंब करून कोणत्याहि पक्षाला हातीं घ्यायचा असेल तर लोहियाच्या या विश्लेषणाचें महत्त्व फारच फार आहे. भारताच्या लोकसंख्येतील ६७ टक्के लोक शेती, जंगलखातें व मासेमारीचा उद्योग करणारे आहेत. यातील शेती व्यवसायात असलेल्या ४५ टक्के लोकांजवळ स्वतःची जमीन आहे. उरलेले ५५ टक्के लोक भूमिहीन मजूर आहेत. ह्या आकड्यांवरून हा प्रश्न किती मोठा आणि निकडीचा आहे हे दिसून येत

सामिलीकरणामुळें ग्रामीण विभागाचे प्रश्न सोडविण्याचा मार्ग म्हणून गांधीवाद किंवा सर्वोदय पुढें आला, त्यातूनच मतप्रणालीचा प्रश्न उद्‌भवला आहे. यामुळेंच पक्षामध्यें आपणास लढा चाललेला दिसून येतो. हा लढा मूलभूत स्वरूपाचा आहे. पक्षातला हा लढा मिटविण्यात यश न आल्यानें त्याचा भयंकर परिणाम झाला आहे. जयप्रकाश नारायण याना वनवास पतकरावा लागला तो याच कारणानें. लोहियाना प्रजा सोशालिस्ट पक्ष सोडावा लागला त्याचें हें निमित्तकारण किंवा प्रत्यक्षकारण जरी नसले तरी लोहियाच्या पक्षत्यागाशीं त्याचा संबंध आहे.

आणखी एक मुद्दा उल्लेख करण्यासारखा आहे. जमिनीची समान वाटणी झाली रे झाली कीं, शेतीउत्पादनात वाढ होईलच असें नाही. गणिती हिशोबानें

जमिनीची वाटणी केली तर जमिनीचे तुकडे तुकडे होऊन त्यावर शेती किफायतशीर न होण्याचा संभव आहे. शिवाय नव्या मालकाच्या हातीं भांडवल असल्याशिवाय त्याला जमिनीचा पूर्ण फायदा घेता येणार नाहीं. आणखी शेती उत्पादनात म्हणावी अशी वाढ व्हावयाची थोड्याबहुत प्रमाणात तिचें यंत्रीकरण होणेंहि अवश्य आहे. हे घडून यावयाचें तर भारतात सामुदायिक किंवा सहकारी शेतीपद्धति अमलांत येणें जरूरीचें आहे. मालकी वैयक्तिक राहून उत्पादन आणि विक्री सहकारी तत्त्वावर करण्यात येईल. हा मार्ग यशस्वी व्हावयाचा तर त्याला ग्रामीण विभागात भांडवली कर्ज मिळण्याची सोय झाली पाहिजे आणि सामाजिक दृष्टिकोनांत बदल झाला पाहिजे. ग्रामीण विभागाचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रजा समाजवादी पक्षानें समाजवादी मार्गाचें कंकण हातीं बांधलें आहे.

प्रजा सोशालिस्ट पक्षानें भूमिहीन मजुराची बाजू घेऊन सत्याग्रहाच्या मार्गानें बरेंच कार्य केलें आहे. मुंबई राज्यात ज्याला "पारडी लढा" म्हणतात तो समाजवादी मार्गाचें प्रतीकच होय. हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्याच लोकांच्या मालकीची आणि जिच्यात गवताशिवाय दुसरें कसलेंहि पीक काढलें जात नाहीं अशी ५६००० एकर जमीन पारडी तालुक्यात आहे. ही सगळी जमीन किंवा तिचा कांहीं भाग तरी पेरणीखालीं आणावा या उद्देशानें पारडी तालुक्यातील आदिवासी जनतेनें प्रजा सोशालिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालीं सत्याग्रह केला. या लढ्याचा मुख्य हेतु राजकीय नव्हता, तर जमिनीची तृष्णा, अन्नाचा तुटवडा व पारडी तालुक्यासारख्या दाट वस्तीच्या भागात असलेला बेकारीचा विशिष्ट प्रश्न यांची सोडवणूक करणें हा त्याचा उद्देश होता. नागरिक स्वातंत्र्य आणि लोकस्वातंत्र्य ह्यांच्या रक्षणाकरता प्रजा सोशालिस्ट पक्षानें स्पेशियल पावर्स ॲक्टच्या कुप्रसिद्ध कलमाविरुद्ध लढा दिला.

## पक्षाचा ऐक्यभंग

पक्षामध्यें फूट पडण्याचें कारण शोधून पाहता प्रजा सोशालिस्ट पक्षाची कॉंग्रेस विषयींची, पूर्वीच्या आपल्या सहकाऱ्यांविषयींची जी वृत्ति तिच्यात तें सांपडेल. ध्येयें आणि उद्दिष्टें यांच्या बाबतींत कॉंग्रेस आणि प्रजा सोशालिस्ट पक्ष यांच्यात इतकें साम्य आहे कीं जेव्हां जेव्हां एखादा राष्ट्रीय आणीबाणीचा प्रसंग उद्भवला तेव्हां तेव्हां कॉंग्रेसशीं मर्यादित सहकार्य करण्याची प्रवृत्तीच

त्याच्यामध्यें दिसून आली आहे. पण प्रजा समाजवादी पक्षात लोहियाचें नेतृत्व मानणारा जो एक डाव्यांचा गट आहे त्यानें आपल्याला कोणत्याहि बाबतींत. अगदीं स्पष्टपणें निश्चित करण्यात आलेल्या उद्दिष्टाच्या बाबतींतसुद्धा, कॉंग्रेसशी सहकार्य करतां येणार नाही अशी आपल्या मनाशीं अगदीं खूणगाठ बाधून ठेवली आहे.

ही फूट पडण्याचे एक विशिष्ट कारण म्हणजे १९५३ सालीं नेहरूंच्या विनती-वरून जयप्रकाश नेहरू बोलणीं झाली हें होय. सरकारी व बिनसरकारी पातळी-वरून राष्ट्रीय पुनर्रचनाविषयक प्रगतिपर धोरणाच्या मिश्र व सयुक्त प्रयत्नात प्रजा सोशालिस्ट पक्षानें सहकार्य करावें अशी मागणी पतप्रधानानीं केली होती. लोहियानीं या गोष्टीला विरोध केला तो इतका दुराग्रही होता कीं त्यानीं जयप्रकाश नारायण आणि इतर काहीं मडळी याच्या प्रमाणिकपणाबद्दलच शका उपस्थित केली. ह्याचा परिणाम असा झाला कीं, दोन्ही गटात अगदीं चुरशीचा खवचट वाद माजला. "कॉंग्रेसबरोबर सहकार्य" हे शब्द नुसते कानावर पडले तरी, लाल चिंधी पाहून बैल जसा चाल करून येतो, तसे लोहिया आणि मधु लिमये याच्या नेतृत्वाखालीं डाव्या गटाचे पुढारी अगावर तुटून पडू लागले. उजव्या गटाच्या पुढाऱ्याविषयीं सशयानें त्याना असें पछाडिलें होतें कीं, त्याना पहावें तेथें लालहि लाल दिसू लागलें.

१९५३ च्या डिसेंबरात अलाहाबाद येथें पक्षाची परिषद भरली होती तिच्यांत एक धोरणविषयक निवेदन लोहियाच्या सागण्यावरून समत करण्यात आलें. या धोरणानुसार ज्याला लोहिया "समानातर उपपत्ति" असें नाव देतात अशा धोरणाला प्रजा सोशालिस्ट पक्ष बाधला गेला. तत्वत' याचा अर्थ असा कीं, जसें साम्यवाद्यांशीं तसेंच कॉंग्रेसशींहि प्रजा सोशालिस्ट पक्षानें वागलें पाहिजे. साम्यवाद्याना त्याचा जितका कडवा व आग्रही विरोध आहे तितकाच कडवा व आग्रही विरोध ते कॉंग्रेसलाहि करणार हें निवेदन समत करून घेण्याची लोहियाच्या गटाला एवढी खत लागून राहिली होती त्याचें कारण हें कीं, पूर्वी जयप्रकाश—नेहरू बोलणीं चालू असता कॉंग्रेसशीं सहकार्याची भीति वाटत होती तसें सहकार्य करण्याचा नुसता विचारहि पुढे कधीं सुचू नये.

डिसेंबर १९५३ मध्यें अलाहाबाद येथें परिषद भरली आणि ऑगस्ट १९५४ मध्यें त्रावणकोर-कोचीनमध्यें झालेल्या गोळीबारावरून जें वादाचें रण माजलें

त्या दोन्हींच्या दरम्यान सांगण्यासारखा वाद निर्माण झाला नाहीं. पण या गोळीबाराच्या घटनेला इतकें गंभीर स्वरूप प्राप्त झालें कीं फुटीला तें निमित्त कारण झालें असें म्हणता येण्यासारखें आहे. लोहिया गटानें ह्या प्रश्नाला एवढें महत्त्व देण्याचें कारण असें होतें कीं, त्याचा पक्ष नागरिक स्वातन्त्र्य आणि लोकस्वातंत्र्य यांचा पाठीराखा आहे असा दावा ते करीत आले होते. नाशिकला त्यांनीं पक्षाची स्थापना केली त्यात हाहि एक उद्देश होता. नागरिक स्वातन्त्र्याची पायमल्ली केल्याबद्दल ते कॉंग्रेसवर नेहमींच टीकेची झोड उठवीत आले होते मग त्रावणकोर-कोचीनमध्यें त्याच्या पक्षानें तीच चूक केली असल्यामुळें त्या मन्त्रिमंडळाला पदच्युत करणें अगदीं रास्त होतें असें लोहिया गटाला वाटत होतें. पण ह्याबाबतींत लोहियांनीं स्वीकारलेलें धोरण चुकीचें होत.

येथून पुढें ह्या दोन्ही गटांचे संबंध अधिकाधिक बिघडत गेले आणि शेवटी मुंबईस मधु लिमये आणि यु. पीचे सगळेच कार्यकारी मंडळ यांना पक्षांतून काढून टाकण्यात आले. यु. पी. राज्य प्रजा समाजवादी पक्षाचें अधिवेशन मे १९५५ मध्यें गाझीपुरास भरलें होतें, त्याचें उद्घाटन करायला त्यांनीं ज्याचे सभासदत्व रद्द करण्यांत आले होतें अशा मधु लिमयांना पक्षाच्या राष्ट्र कार्यकारि-णीची सूचना धाब्यावर बसवून बोलाविले, ह्यामुळें यु. पी. कार्यकारिणीला काढून टाकण्यात आले. मधु लिमये आणि यु. पी. राज्य प्रजा समाजवादी पक्षाच्या ह्या बंडखोरीला लोहियांनीं प्रोत्साहन दिलें होतें. ह्याच वेळेला लोहियांनीं इतर प्रजा समाजवादी पक्षाच्या पुढाऱ्यांशीं असलेले आपले मतभेद उकरून काढले. लखनौच्या नॅशनल हेरल्ड पत्राच्या २६ मे, १९५५ च्या अंकात लोहियांनी केलेल्या एका निवेदनाचा वृत्तांत देण्यात आला होता, त्यात लोहियांनीं असे म्हटल्याचें नमूद करण्यात आलें होतें कीं, "प्रजा समाजवादी पक्ष हा एक सुधारणावादी पक्ष राहणार आहे कीं, चढाऊ समाजवादी पक्ष राहणार आहे ह्याची शहानिशा करण्याची वेळ आता आली आहे." प्रजा समाजवादी पक्षांतून फुटून बाहेर पडण्याची व आपला नवा पक्ष स्थापन करण्याची सूचना तो उघड उघड करू लागला होता. एक महिन्यानतर लोहियानें प्रजा समाजवादी पक्षावर हल्ला चढविला. पक्ष नेभळट व दुर्बळ झाला असून "त्याचें धोरण आणि कार्यक्रम पोचट बनविण्यात आला आहे आणि पक्षाला मधून मधून अंधोगवायूचे झटके येऊं लागले असून अन्याच पुढाऱ्यांनीं कॉंग्रेसचा धसका घेतला

आहे" अशा स्वरूपाचा आरोप त्यानें पक्षावर केला. लोहियानीं अशी अतिरेकी भूमिका घेतल्यामुळें प्रजा समाजवादी पक्षाच्या राष्ट्र कार्यकारिणीनें जयपूर येथें जुलै १९५५ मध्यें भरलेल्या सात दिवसाच्या शिबिराच्या वेळीं लोहियाना पक्षामधून काढून टाकलें.

## प्र. स पक्षाचें धोरणविषयक निवेदन

प्रजासमाजवादी पक्षाच्या परिषदेनें त्याचें एक धोरणविषयक निवेदन स्वीकृत केलें आहे. त्यात भारताच्या आजच्या हलाखीचें कारण असें दाखविण्यात आलें आहे कीं, भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळालें पण त्यासोबत आर्थिक स्वातंत्र्य न आल्यामुळे खऱ्याखुऱ्या लोकशाहीचा आविष्कार झाला नाहीं. यास्तव आर्थिक स्वातंत्र्य मिळवून समाजवादी लोकशाहीकडे पाऊल टाकणें आवश्यक आहे. पण खऱ्याखुऱ्या लोकशाहीसाठीं नीतिमत्ता आणि संस्कृति यांचेंहि रूपांतर झालें पाहिजे.

आजच्या सरकारच्या हुकुमशाही पद्धतींचा या निवेदनात निषेध केला आहे. ह्या अनिष्टाला मूठमाती देणें असेल तर त्यासाठीं सत्तेचें विकेंद्रीकरण होणें जरूर आहे. "सार्वजनिक कार्यांत जनतेला अधिक भाग घ्यावयास लावील आणि हुकुमशाहीच्या अनिष्टापासून समाजाला मुक्त करील असे जर कांहीं असेल तर तें विकेंद्रित लोकशाहीच होय" असें त्या निवेदनात पुढें म्हटलें आहे.

कॉंग्रेसनें ज्या मिश्र अर्थकारणाचें धोरण अवलंबिलें आहे त्याच्यावर या निवेदनात सडकून टीका केली असून लोकशाहीप्रधान नियोजित अर्थकारणाचा पुरस्कार केला आहे. कोळसा, लोखंड व पोलाद यांचें राष्ट्रीयीकरण तावडतोब करण्याची शिफारस केली आहे. त्यांत पुढें म्हटलें आहे कीं, "मानवी सुख, प्रगति व प्रतिष्ठा यांच्या संदर्भातच आर्थिक प्रगति किती साधली आहे हें पडताळून पाहतां येणें शक्य आहे. तेव्हा अशी प्रगति ज्यामध्यें शक्य होईल अशी आर्थिक रचना निर्माण करण्यासाठीं नियोजित अर्थव्यवस्था आणि उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण अवश्य आहे." इस्टेटीचा ताबा घेण्याचा व तिची व्यवस्था व विल्हेवाट लावण्याचा अधिकार सरकाराला असला पाहिजे आणि या बाबतींत नुकसानभरपाई काय द्यायची हें ठरविण्याचा अधिकार विधानसभेच्या हातीं राहिला पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे.

म. प्रं. लं. ठाणे, वाचनालय शाखा.
प्रा. क. ६३९८ नों दि ..........
वि. ..........

पंचवार्षिक योजनाविषयाहि त्यानीं टीका केली आहे कीं, या योजना उत्पादनाचा विचार करतात पण वांटपाचा नाहीं. दुटवड्याची अर्थव्यवस्था फायद्यात वाढ करील आणि ग्रामीण व औद्योगिक किमतींमधील तफावत वाढवील. पण लहान उत्पादका-वर याचा अनिष्ट परिणाम होईल. बेकारीचा प्रश्न या योजनामध्यें योग्य तऱ्हेने हाताळला नसल्या कारणानें पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत बेकारी वाढलीच आहे, कॉंग्रेसला कुटिरोद्योगाविषयीं मुळीं आस्थाच नाहीं असें त्याचें म्हणणें आहे.

खराखुरा लोकशाहीप्रधान समाज अस्तित्वात यावा म्हणून विरोधी पक्षाचें बळ वाढण्याची आवश्यकता या निवेदनांत प्रतिपादण्यात आली आहे.

## अखिल भारतीय समाजवादी पक्ष

यानंतर राममनोहर लोहिया अध्यक्ष असलेल्या अखिल भारतीय समाजवादी पक्ष नांवाच्या एका नव्या पक्षाची स्थापना करण्यात आली.

ह्या नव्या पक्षाची मूळ परिषद १९५५ च्या डिसेंबरात हैदराबाद मुक्कामी भरली होती. त्यावेळी सबंध भारतांतून १००० वर प्रतिनिधि उपस्थित होते. ह्या परिषदेत सोशलिस्ट रिपब्लिकन पार्टीनें-समाजवादी प्रजासत्ताक पक्षानें-अखिल भारतीय समाजवादी पक्षाला सामील होण्याचा आपला निर्णय जाहीर केला. समाजवादी प्रजासत्ताक पक्षाच्या सभासदांची संख्या २५००० असून पश्चिम बंगाल, आसाम व संयुक्त प्रांत येथें ते पसरले आहेत.

ह्या परिषदेत काय ठरलें याला महत्त्व आहे. कारण, पक्षाचें भावी धोरण व कार्यक्रम त्यावरच आधारण्यात येणार असून या मतप्रणालीवरच हा पक्ष पुढें निवडणुका लढविणार आहे

१ "समाजवादी मनाची एक मजबूत यंत्रणा" उभी करण्याची त्यांना उत्कटा लागून राहिली आहे.

२ भूमिहीन मजूर, हस्तव्यवसाय करणारे आणि स्त्रिया याच्यातच ते आपले कार्य केंद्रित करणार आहेत.

३ "सात वर्षांत सत्ता काबीज" करण्याचा एक कार्यक्रम त्यानीं स्वीकृत केला आहे. पहिल्या वर्षी पांच लक्ष, दुसऱ्या वर्षी दहा लक्ष अशा क्रमानें ३०,००० मतदारसंघ कमिट्यामध्यें वाटलेले तीस लक्ष सभासदांचें लक्ष्य १९६१-६२ मध्यें गांठण्याचा संकल्प पक्षानें केला आहे.

४ आंतरराष्ट्रीय बाबींत, "एकंदर जगात मानसिक एकात्मता" या तत्त्वावर उभारलेली आणि जगातील राष्ट्रांचे परस्परातील ऐक्याचे संबंधहि केव्हा केव्हा बाधित करतील अशा काहीं सामान्य तत्त्वांना "उच्चलून धरील" अशी एक "मानवी संस्कृति" अस्तित्वात आणण्याचे ते योजीत आहेत. "दलालीचें प्रमाण ठरविणारें धोरण" म्हणून कॉंग्रेसच्या परराष्ट्रीय धोरणावर ते टीका करतात.

नेहरूंचें परराष्ट्रीय धोरण समाजवाद्यांना बऱ्याच बाबतींत संमत आहे. मतभेद आहेत ते असे: (१) ब्रिटन अजूनहि एक वसाहतवादी राष्ट्र असल्यामुळें भारतानें राष्ट्रकुटुंबसत्र सोडला पाहिजे असें त्यांना वाटते. राष्ट्रकुटुंबांत राहिल्या मुळें ब्रिटनच्या वसाहतवादावर परिणामकारक टीका करणें दुरापास्त होतें शिवाय राष्ट्रकुटुंबमध्यें वंशभेदाला अनुसरून धोरणें ठरविणारीं दक्षिण आफ्रिकेसारखी राष्ट्रें आहेत त्या कारणानें राष्ट्रकुटुंब जागतिक लोकशाहीला अनुकूल आहे याविषयीं शंका निर्माण होते. (२) प्रभावी तटस्थता पुरी नाहीं असें त्यांचें मत असून जागतिक राजकारणात एक "तिसरा गट" असावा असें त्यांना वाटतें. भारतानें असा "तिसरा गट" स्थापण्यात पुढाकार घ्यावा. लोहिया तर आग्रह पूर्वक प्रतिपादन करतात कीं, "वर्धिष्णु सामर्थ्यसंपन्न तिसरी यंत्रणा निर्माण झाल्याशिवाय कोणत्याहि दोन युद्धप्रवण यंत्रणांना आजपर्यंत शांततेनें नांदता आलेलें नाहीं. युरोपमध्यें कॅथोलिक आणि प्रॉटेस्टंट पंथांना दुर्लक्षित करून आपला मार्ग चोखाळणारा बलवान् निधर्मीवाद अधिकाधिक बलशाली होऊं लागला तेव्हां कोठें त्या दोन पंथाच्या अनुयायांना शांततेनें एकत्र नांदण्याचा धडा मिळाला." आजच्या जगात एक तिसरा गट निर्माण झाला पाहिजे आणि त्यानें अमेरिका आणि रशिया यांच्या दरम्यान प्रभावी भूमिका घेऊन तशा-प्रकारची परिस्थिति घडवून आणली पाहिजे. यावरून लोहियाचें धोरण नेहरूंच्या सहजीवनाच्या धोरणापेक्षां अधिक करुणात्मक स्वरूपाचें आहे.

समाजवाद्यांना असे वाटतें कीं, एक त्यांचा पक्ष खेरीज करून आज अस्तित्वात असलेला दुसरा कोणताहि पक्ष, यांत साम्यवादी आणि प्रजासमाजवादी पक्षहि आले प्रभावी विरोधी पक्षाची जागा घेण्यास समर्थ नाही, आणि असा कणखर "चढाऊ वृत्तीचा विरोधी पक्ष" होण्याचा त्यांचा कृतसंकल्प आहे

समाजवाद्यांमध्यें फूट पडून त्यांचे दोन गट झाले ही दुर्दैवाची गोष्ट आहे

पण कदाचित् समाजवादी विचारसरणी आणि कार्यपद्धति याच्या संक्रमणाची ती एक आवश्यक पायरी असण्याचा संभव आहे. अ-कॉंग्रेसवादी आणि अ-साम्यवादी छापाचे समाजवादी यांना राष्ट्राच्या जीवनात काहीं विशिष्ट स्थान आहे. घटनात्मक पार्लमेंटरी पद्धतीची लोकशाही भारतात यशस्वी व्हावयाची असेल तर सत्ताधारी पक्षाला विरोध करायला प्रभावी लोकशाहीप्रधान पक्षाची आपणास जरुरी आहे. आणि सत्ताधारी पक्षावरचा जनतेचा विश्वास जर उडाला तर आमच्या राष्ट्रीय उद्दिष्टांच्या चौकटीत बसेल असे सरकार स्थापन करू शकणारा एक प्रभावी पक्ष असणें अगत्याचें आहे. अशा पक्षाला जनतेच्या नागरिक स्वातंत्र्याचें रक्षण करता आले पाहिजे आणि त्याने सत्तेचा उपयोग जबाबदारपणें केला पाहिजे. विशेष म्हणजे असें कीं, जो नुसता सुधारणावादी होऊन राहणार नाहीं, तर सर्वांना मानवी प्रतिष्ठा पूर्ववत् मिळवून देणारी समाजक्रांति घडवून आणण्यासारखे मूलभूत रचनात्मक फेरबदल सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात करून पुढें पाऊल टाकील अशा पक्षाची आपणास गरज आहे.

जेव्हां मतदान करण्याची वेळ येईल तेव्हा मत कोणाला द्यावें असा प्रश्न आपल्यापुढें उभा राहील. स्थूल मानानें पाहिले तर तीन 'प्रकारचे' राजकीय पक्ष आहेत; निधर्मी प्रजासत्ताक पक्ष, ईश्वरसत्ताक–थियोक्रॅटिक पक्ष, फॅसिस्टशाहीशी सोयरसंबंध असलेले जातीयवादी पक्ष आणि देशाबाहेरील जगाशी एकनिष्ठ असणारा आणि लोकशाहीचा आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा शत्रु असा साम्यवादी पक्ष. कॉंग्रेस आणि समाजवादी पक्ष हे पहिल्या प्रकारांत मोडतात. शुद्ध लोकशाहीवादी हे साम्यवादी आणि जातीयवादी पक्षांचा अव्हेरच करतील. कॉंग्रेसला मत देणें आपल्याला शक्य नाही असें ज्यांना वाटतें असेहि काहीं लोकशाहीवादी निघण्याचा संभव आहे. घटनात्मक पार्लमेंटरी पद्धतीची लोकशाही सुरळीत चालावी म्हणून लोकशाहीप्रधान विरोधी पक्षाची विशेष गरज आहे असें कदाचित् त्यांना वाटणें शक्य आहे. मग अशांची मतें प्रजा समाजवादी पक्ष किंवा अखिल भारतीय समाजवादी पक्ष यापैकीच कोणाला तरी पडली पाहिजेत पण एक गोष्ट ध्यानात ठेविली पाहिजे कीं, हे समाजवादी पक्ष सध्यातरी मजबूत नाहींत. त्यांचा पडावा तितका प्रभाव पडत नसून त्यांचे पुढारीहि दुर्बल आहेत. तात्कालिक फायद्यासाठीं लोकशाहीविरोधी पक्षाशीं सोयरिक जमविण्यासाठी चुळबुळी करण्याच्या त्यांच्या उलाढाली पाहिल्या म्हणजे त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल

मशय आणि भारताच्या लोकशाहीला त्यांचा धोकाहि वाटू लागतो. तेव्हा त्यांना पाठिंबा देणाऱ्यांनीं डोळे उघडे ठेवून तो द्यावा. विरोधी पक्षाचें अस्तित्व ही मूलभूत गरज लक्षात घेऊन किंवा यातील एखाद्या पक्षाची वाढ होत होत त्यातून लोकशाही समाजवादाला उपकारक ठरेल असा प्रभावी पक्ष अस्तित्वांत येण्याची शक्यता वाटत असल्यामुळें जर ते समाजवाद्यांना मतें देणार असतील तर तें समर्थनीय म्हणता येईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम
दि.
क्रमांक
नों. दि.

# ५

# जमातवादी पक्ष

चालू शतकाचे आरंभीं भारतात जो एक झुंआर, राष्ट्रीय बाणा निर्माण झाला त्यांत जमातवाद पुरेपूर होता. स्वराज्य हें राष्ट्राचें ध्येय! परतु तें जवळ करण्याचे कार्मीं, सनदशीर मार्ग अयशस्वी ठरले होते. ह्या विफलतेमुळें जनतेच्या डोळ्यावरील पटल दूर झाल्यासारखें होऊन तिचा कल ह्या नव्या हिंदु राष्ट्रीयतेकडे वळला, कारण हिंदु समाजास, त्याचें पूर्वींचें वैभव प्राप्त करून देऊ आणि परकीय सत्तेच्या जोखडातून त्याची मुक्तता करू हें तिचें आश्वासन होते. ह्याच धोरणानें, जनतेच्या राष्ट्रीय आकांक्षांचा आविष्कार म्हणून, तसेंच राष्ट्रीय वृत्तीचा प्रसार व्हावा म्हणून बाळ गगाधर टिळकांनीं गणपतीचा उत्सव, शिवजयंतीचा उत्सव हे सुरु केले. बंगाल्यातले कालिमातेचे उत्सव म्हणजे तरी ह्या राष्ट्रीयत्वाच्या स्फुल्लिंगाचाच आविष्कार होता. ह्या उत्सवाला निमित्त झालेले तात्कालिक कारण म्हणजे बंगभंगाची चळवळ होय! 'भारत ही आपली माता होय' ही भावना फोफावत होती आणि वंदेमातरम् गीत राष्ट्रगीत म्हणून मान्यता व लोकप्रियता पावलें होतें, ह्या दोन घटनांमुळें अनेक भारतीय, स्वराज्यप्राप्तीच्या तळमळीनें पेटून उठले होते. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, आणि मी तो मिळविणारच' ही टिळकांची घोषणा देशाच्या कानाकोपऱ्यातून दुमदुमली होती आणि त्यामुळें राष्ट्रात जणो विद्युत्संचार झाला होता.

हिंदु पथाचें पुनरुज्जीवन झाले होतें व 'राष्ट्रीयत्व तें हेंच' असें वाटण्याइतपत त्याची राष्ट्रीयत्वाशीं बेमालूम, एकजीव अशी सांगड जमली होती, तसेंच ह्या प्रकारात, पूर्वेतिहासाचा अभिमान जागृत करून भावनोत्कट आवाहन केलें गेले होते. छत्रपति शिवाजी आणि गुरुसिंग, तसेंच त्याचे अनुयायी मर्दगडी ह्याच्या कथांचे पोवाडे गाइले जात होते. मायदेशाच्या

स्वातंत्र्यप्रीत्यर्थ त्यानीं रक्ताचा थेंब न् थेंब कसा खर्ची घातला, "त्याच्या दुर्दम्य, अजिंक्य अशा वंशाभिमानानें त्यांना कसें आवाहन केलें आणि हिंदुत्वाच्या निशाणाखालीं एकत्र येऊन, विरोधी शक्तींचा त्यानीं कसा निःपात केला" ह्याचें वर्णन करणारे ते पोवाडे असत. ह्या व असल्याच इतर कथानीं पंजाबी, बंगाली व महाराष्ट्रीय तरुणांत चेतना उत्पन्न केली. दहशतवादी हालचाली चळवळी सुरू झाल्या आणि परिणामीं, जित व जेते ह्या उभय पक्षातील किती तरी प्राणाच्या ह्यात आहुति पडल्या.

दहशतवादी युगाची समाप्ति गांधींच्या आगमनानें केली. प्रबळातल्या प्रबळ भौतिक सत्ताशीं झगडतानाहि साधनाच्या शुचित्वावर त्यानी करडा कटाक्ष राखला होता. राष्ट्रीय चळवळीला त्यानीं एक नवेंच वळण दिलें आणि तिचा प्रचंड प्रमाणात विस्तार होत गेला. त्या चळवळीचा सत्य, न्याय, अहिंसा व असल्याच सर्वमान्य, मानवतावादी जीवितमूल्यांशीं संबध जडला. गांधींनींहि आवाहन केलें ते धर्मभावनेसच, परंतु ही धर्मभावना सनातनी कर्मकांडाची व जातीयतावादी नव्हती, तर ती नव्या संस्काराचे पैलू पाडलेल्या हिंदुधर्माशीं अधिक निगडित झालेली होती. ह्यामुळें, गांधींच्या नेतृत्वाखाली जो महत्त्वाचा राष्ट्रीय झगडा झाला, त्याच्या काळात हिंदु जमातवादास माघार घेऊन गप्प बसावें लागलें.

जमातवादाच्या वाढींत ब्रिटिश सत्तेचाहि हात होताच. जातीजातींत, जमाती-जमातींत फूट पाडण्याचा व राष्ट्रीयत्वाच्या वाहत्या ओघाविरुद्ध उठण्यास जमातींना फूस देण्याचा, हेतुपुरस्सर प्रयत्न सरकार करीत होतें. मुसलमानास पक्षपात दाखविण्याचें पाताळयंत्री धोरण त्यानें अमलात आणिलें. "दोघी बायकात मुसलमान ही आवडती!" हें धोरण अगदीं थेटपर्यंत कायम राहिलें आणि त्याचे भयंकर परिणाम राष्ट्रास भोगावे लागले. असल्या धोरणामुळे, 'ऑल इंडिया मुस्लिम लीग'ची उभारणी साहजिकपणें जमातवादाच्याच पायावर झाली. परिणामीं तिनें द्विराष्ट्रवादाचें पिल्लू सोडून दिलें आणि पाकिस्तानची 'हक्काची मागणी' केली. इकडे हिंदु जमातवादासहि उत्तेजन दिलें जात होतें ह्याचें फळ म्हणजे उभय जमातींत माजलेले बखेडे! आर. एस. एस. सारख्या आक्रमक स्वरूपाच्या जमातवाद्यासहि सरकार उत्तेजनच देई "फोडा आणि झोडा" ह्या बाण्यास साजेसेंच धोरण हे होतें.

१९४० चें पुढें आक्रमक धोरणाच्या हिंदु जमातवाद्यांनीं मुसलमान जमातवाद्यांशीं झगडा चालू ठेवला होता. आपल्या कार्यक्रमातील आक्रमक धोरणहि त्यांनीं कसोशीनें पाळलें होतें. एका हिंदुत्वनिष्ठाकडून गांधीजींची हत्या झाली तोंपर्यंत हा प्रकार चालूच होता. गांधीजींच्या हत्येमुळें मात्र सारें राष्ट्रचें राष्ट्रच त्यांचेवर घसरलें. सरकारनें बंदी घातल्यामुळें आर. एस. एस ला भूमिगत होणें भाग पडलें. हिंदुराष्ट्राची जोरदार मागणी करणाऱ्या हिंदुमहासभेसहि दोन वर्षांचा काळ राजकारणास हात धुवावे लागले. परंतु १९४९ च्या सुमारापासून ह्या दोघांहि पक्षांनीं देशाच्या राजकारणाच्या आखाड्यात उतरून आपले पेच पवित्रे सुरू केले होते. आणखीहि दोन जमातवादी पक्ष आता ह्या आखाड्यात उतरले असून त्याचें ध्येय व त्यांची उद्दिष्टें बव्हंशीं असलीच होतीं.

अखंड भारत ह्या धर्मसत्ताक राज्याची स्थापना हें ह्या पक्षाचें राजकीय उद्दिष्ट आहे. कॉंग्रेसचें ध्येय, जें निधर्मी प्रजासत्ताक राज्य, त्याच्या बरोबर उलट स्वरूप असलेल्या ह्या ध्येयाची घोषणा त्यांनीं केली आहे. कॉंग्रेसचें धोरण म्हणजे निवळ परदेशाहून आयात केलेला माल असून तो भारताच्या थोरवीशीं व मनोधारणेशीं सर्वस्वी विसंगत आहे. हिंदु समाजाच्या हितसंबंधास मारक आहे, असें त्यांचें मत आहे. भारताच्या दृष्टीनें, चालू काळ हा राष्ट्राची उभारणी करण्याचा काळ आहे ह्या संधीस हिंदु 'राष्ट्र'नें मागेमागें न राहाता आपली उभारणी भक्कम हिंदुत्वाच्या पायावर केली पाहिजे. सरहद्दीवरून होणाऱ्या पाकिस्तानी आव्हानास हेंच योग्य उत्तर होय. त्यांची अशीहि भावना आहे, कीं नेहरूंच्या नेतृत्वाखालील कॉंग्रेस; हिंदूंच्या पुरातन व दिव्य परंपरात बिघाड करून हिंदु समाजरचनेचा नाश करीत आहे. निधर्मी लोकशाही राज्य स्थापन करण्याचें कल्पनातरंग म्हणजे निवळ मृगजळ आहे. कॉंग्रेसच्या छायेखालीं असलेला भारतदेश ह्या मृगजळामागें धाव घेताना हिंदुराष्ट्रीयत्वाच्या भावनेकडे कानाडोळा करीत आहे.

एकंदर, जमातवाद्यांनीं आपला कार्यक्रम स्पष्ट करून ठेवला आहे. निवडणुकांच्या दंगलींत सामील व्हायचें आणि आपलें उद्दिष्ट व आपला कार्यक्रम ह्यांना अनुसरून निवडणुका लढवायच्या हें त्यांनीं नक्की केलें आहे. मतदारसंघ आपल्या बाजूस वळवून घेऊन आधीं सत्ता काबूंत आणायची. एकदा ती हातीं आली कीं मग, अन्य मार्गांनीं ती हातातच राखून ठेवायची कशी हें ते खूप समजून आहेत.

# हिंदु जमातवादी पक्ष

## हिंदुमहासभा

सर्व हिंदुजमातवादी पक्षांत हिंदुमहासभा ही सर्वांत जुनी होय. हिंदुमहासभेची स्थापना तीस वर्षांपूर्वी झालेली असली तरी तिच्यात नवजीवनाचा संचार केला वीर सावरकरांनीं ! हिंदुराष्ट्र ह्या भावनेच्या नव्या पायावर, त्यांनीच तिची पुन्हां उभारणी करून दिली. सभेचीं उद्दिष्टे थोडक्यांत पुढील प्रमाणें सांगता येतील.

### १ अखंड भारत

सभेच्या घटनेंत 'हिंदु' शब्दाची व्याख्या केलेली आहे. तिच्या अनुसार "ह्या भूमीस जो आपली धर्मभूमि मानतो—म्हणजेच कोणत्याहि भारतीय धर्मांचा जो अनुयायी आहे, तो हिंदु. मग वैदिक, सनातनी, बौद्ध, शीख, आर्यसमाज, ब्राह्मो समाज ह्या साऱ्यांचे अनुयायी ह्यांत आले." ह्या व्याख्येंत दोन गोष्टी ठळकपणें दिसून येतात. पहिली, हिंदु राष्ट्राची भौगोलिक दृष्ट्या एकता; दुसरी धार्मिक व सांस्कृतिक एकता.

भारताच्या भौगोलिक एकतेची स्थापना—अखंड भारत—हें हिंदुसभेचें पहिलें उद्दिष्ट आहे. "अखंड भारत हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे. आणि आम्ही तो मिळवणारच !" ह्यामुळें, पाकिस्तान ह्या स्वतंत्र व सार्वभौम राज्यास भारतानें दिलेल्या मान्यतेस हिंदुसभेचा विरोध आहे. फाळलें गेलेलें क्षेत्र भारताचें भारतास मिळून, त्याचा अंगभूत भाग ह्या नात्यानें त्यास पुनश्च जोडलें जावें, परंतु जोंवर हीं क्षेत्रें वेगळीं राहतील तोंवर हिंदुसभा पाकिस्तानशीं "शठं प्रतिशाठ्य"चें कट्टर धोरणच स्वीकारणार. "देशांतरिताच्या संख्येचें समत्व कायम राखण्यासाठीं" जरूर तर ती भारतातील मुसलमानांपैकीं कांहींना "पाकिस्तानांत निघून जाणें भाग पाडण्यासहि कचरणार नाहीं."

भारताचा एकंदर दृष्टिकोन हिंदूच आहे तेव्हां हिंद्वेतर धर्मानुयायी हे भारतास परकेच होत. "धर्मांत बदल होणें म्हणजेच राष्ट्रीयतेतहि बदलच होणें होय असें हिंदुसभेचें म्हणणें आहे. मह्‌रहू तत्त्वांतून निदान तीन आनुषंगिक मुद्दे निघतात. पहिला, हिंदुधर्मांचा ज्यांनीं त्याग केला आहे त्यास परत हिंदुधर्मांत आणणें—म्हणूनच धर्मांतरिताचें पुनर्धर्मांतर करून घेण्यावर सभा विशेष जोर देते. दुसरा,

सर्व मिशनसंस्थांवर बंदी घातली पाहिजे तसेंच, अन्यधर्मीयास ह्या देशाचे नाग रिक म्हणून देशांत कायदेशीर वास्तव्य स्थान मिळतें तेंहि बंद केलें पाहिजे. (असे नागरिकत्व म्हटले म्हणजे त्यात प्रत्यक्ष पुनर्धर्मांतर जरी नाहीं तरी—एक प्रकारचें हिंदूकरण हें यायलाच हवें.) तिसरा, ह्या तत्त्वज्ञानाचा, हिंदु—अहिंदु भेदभावास पाठिंबा आहे. परंतु त्यावर एक नुसता शाब्दिक असा झिरझिरीत पडदा टाकून हा भेद झाकून टाकण्याचा, हिंदुसभेचा प्रयत्न असतो. हिंदुराष्ट्र अस्तित्वांत आलें तर त्यात आपला दर्जा काय राहाणार ही भीति अल्पसंख्याकास वाटते ती दूर करण्यासाठीं हिंदुसभेनें १९५० सालीं एक ठराव केला व "आमचा ठरलेला कार्यक्रम कायदेमंडळातून पार पाडतेवेळीं संसदेच्या कारभारात सर्व अहिंदु अल्पसंख्याकास तेथें मुक्तद्वार राहील असें जाहीर केलें.

भारताच्या सामाजिक व सांस्कृतिक एकतेबाबतचें हिंदुसभेचें ध्येय बारकाईनें मांडलेलें आहे. परकीय संस्कृति व तिचा भारतावर असत चाललेला पगडा हीं अमान्य केलीं जातील, ह्या दृष्टीनें भारताच्या घटनेत फेरफार करून तिला ह्या भूमीच्या संस्कृतीशीं व परंपरेशीं सुसंगत "असे वळण दिलें जाईल" गोरक्षण व गोवधबंदी हीं पुरस्कारिलीं जातील; "आर्यस्त्रीत्वाचीं दिव्य ध्येयें" पुनरुज्जीवित केलीं जातील व परंपरागत समाजरचनेचें संरक्षण केलें जाईल. संस्कृत हा "अभ्यासक्रमातील आवश्यक विषय" केला जाईल. हिंदुराष्ट्राची सर्वसामान्य भाषा हिंदी राहील व राज्यकारभारात सर्वत्र विक्रमसंवत् ही कालगणना सुरू केली जाईल. राष्ट्रीय, धार्मिक उत्सवात सरकार सक्रिय भाग घेईल; सामान्य जनतेची नैतिक व सांस्कृतिक जागृति करीत असलेल्या धार्मिक व आध्यात्मिक नेत्यांचें जास्तींत जास्त सहकार्य मिळविण्याचा जास्तींत जास्त प्रयत्न केला जाईल.

## २ हिंदुराज्य

राज्य हें राष्ट्राच्या हातातलें एक साधन होय, आणि भारताची भौगोलिक, धार्मिक व सांस्कृतिक दृष्टींनीं एकता साधील असलेंच हिंदुराज्य स्थापन करण्याचा हिंदुसभेचा प्रयत्न आहे. सैनिकीकरणाबाबत हिंदुसभेचें मत निश्चित आहे व संपूर्ण हिंदुत्वास बनविण्याचा प्रयत्न करणें हें तिचें एक ध्येय आहे. ह्या दृष्टींनी हिंदुसभेच्या कार्यक्रमात पुढील गोष्टींचा अंतर्भाव होतो मित्रराष्ट्राच्या साहाय्यानें "हिंदु युवकां"स अद्ययावत युद्धकलेचें शिक्षण देणें, "देशाचीं धोरणं

ठरविण्या"चें कामीं "योग्य तितकीं मतें" लष्करी अधिकाऱ्यांचींहि घेणें व सरसेनापतीला मन्त्रिमंडळात पदसिद्ध जागा (एक्स ऑफिशिओ कॅबिनेट मेंबरशिप) देणें. हिंदुसभा, १८ ते २५ वयाच्या तरुणास सक्तीचें लष्करी शिक्षण देईल, हत्यारबंदी कायद्याची कडक बंधनें ढिलीं करील आणि सरहद्दीवरील नागरिकास हत्याराचे परवाने सढळ हातानें देईल.

असें असले तरीहि "हिंदुस्थानात खरेंखुरें लोकसत्ताक राज्य स्थापणें" अशीच हिंदुसभा आपल्या उद्दिष्टाची व्याख्या करीत आहे. भारत हें सर्व जगां-तील हिंदूंचें "राष्ट्रीय माहेरघर" होणार असून, ह्या दृष्टिकोनाचाच हिंदुसभेच्या परराष्ट्रीय धोरणावर प्रभाव पडलेला आहे आणि हल्लीच्या गटापासून सर्वस्वी स्वतंत्र अशी अखिल हिंदु गटाची संघटना हे तिचें ध्येय राहाणार आहे.

हिंदुसभेची राज्यसंस्थेबाबतची कल्पना, तसेंच अखिल हिंदुत्ववादी गटाच्या संघटनेची कल्पना ह्याचें युद्धपूर्व फॅसिझमशीं फारच साम्य दिसतें. अगदीं उघड उघड दिसून येणारें असेंच हें साधर्म्य आहे.

## २. आर्थिक धोरण

भारतास वेढा घालून बसलेल्या सरंजामशाहीच्या हितसंबंधास पाठिंबा देणें हें हिंदुसभेचें आर्थिक धोरण आहे परंतु हिंदुसभेनें जाहीर केलेल्या आर्थिक कार्य-क्रमात प्रतिगामी सूचना व आमूलाग्र बदलाबाबतच्या सूचना ह्यांचा तीव्र संघर्ष दिसून येतो. खाजगी संपत्तीस धक्का लागू न देण्याच्या धोरणास तिची मान्यता आहे. बॅंकासारख्या अत्यंत महत्त्वाच्या धंद्यावर सरकारी नियंत्रण ठेवण्याच्या धोर-णाचा पुरस्कार हिंदुसभेनें केला असला तरीहि "खाजगी मत्तेचें पावित्र्य व तिची वंशपरंपरागत मालकी मूळ मालकाकडेच राहणें" ह्या गोष्टी अबाधित राहतील असें तिचें आश्वासन आहे. "असेंच आर्थिक धोरण आखू कीं, ज्याचे उत्तम परिणाम झाल्यावाचून राहणार नाहींत — मग तें कम्युनिस्टाचें असो, समाजवाद्याचें असो, भांडवलशाहीचें असो कीं ह्या सर्वांचें मिश्रण असो" असें हिंदुसभेचें आश्वासन आहे. वर्गयुद्ध हिंदुसभेस अमान्य आहे तसेंच वर्गहीन समाजरचनेची कल्पनाहि अमान्यच आहे.

आज हिंदुमहासभा, आपल्या पटावर एकूण दोन लक्ष पंचवीस हजार सभासद असल्याचें सांगत आहे. गेल्या निवडणुकात संसदेच्या ३१ जागांपैकीं ४ जागा व

राज्यविधिमंडळामधील १ जागा हिंदुसभेनें पटकावल्या. एकुण ग्राह्य मतापैकीं ०·९१ टक्के मतें हिंदुसभेनें मिळविलीं. वेगवेगळ्या राज्यविधानसभामधील एकूण ३,२८० पैकीं २११ जागा हिंदुसभेनें लढविल्या आणि त्यापैकीं २० जागा मिळविल्या. ( २.२४७ जागा कॉंग्रेसनें मिळविल्या. ) एकूण मतापैकीं ० ८३ टक्के मतें तिच्या बाजूस पडलीं (कॉंग्रेसला ४२ २६ टक्के पडली होतीं. ) मध्यभारत विधानसभेंत हिंदुमहासभेच्या जागा १२ असून ती तेथील प्रमुख विरोधी पक्ष समजली जाते. लोकसभेच्या १९५२ पासूनच्या निवडणुकात हिंदुमहासभा व जनसंघ, रामराज्य परिषद् असले तिचे मित्रपक्ष ह्यांनी मिळून २५ पैकीं १ जागा पटकावली. ह्यावेळीं एकूण मतापैकी १·९ टक्के मतं हा तिचा उच्चांक होता. (कॉंग्रेसनें ५०·४ टक्के मतें मिळविली होतीं. राज्यविधानसभेच्या पोटनिवडणुकात त्यानीं ४ ६ टक्के मतें मिळविलीं.)

## भारतीय जनसंघ

प. वा श्यामाप्रसाद मुकर्जीनीं १९५१ सालीं जनसंघाची स्थापना केली असून त्याचा दृष्टिकोन हिंदुमहासभेसारखाच आहे, मात्र त्यानें आपण सुचविलेल्या आर्थिक कार्यक्रमावर अधिक जोर दिला आहे. सदरहू कार्यक्रम हा ग्रामतंत्रावर— म्हणजे आर्थिक बाबी व शासनसंस्था ह्याच्या विकेंद्रीकरणावर आधारलेला आहे. जनसंघाच्या मूलभूत तत्त्वाचा येथें थोडक्यात उल्लेख करावयास हरकत नाहीं.

### १ अखंड भारत

"अखंड भारत ही पक्षाची मूलभूत प्रतिज्ञा आहे" असें श्यामाप्रसाद मुकर्जींनीं, जनसंघाच्या पहिल्या बैठकीच्या वेळीं आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हटलें होतें. "संघाच्या दृष्टीनें, उत्तरेस हिमालयापासून दक्षिणेस कन्याकुमारी-पर्यंतचा भारत हा भौगोलिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्ट्या अखंड, अविभाज्य व स्वयपूर्ण असा आहे."

जनसंघ हा, आपल्या जाहीरनाम्यास अनुसरून "ह्या भूमीच्या प्रत्येक कणास" भजतो, ही भारमाताच असें मानून त्यास पूजतो. पाकिस्तान व तेथील हिंदु अल्पसंख्याकाचा प्रश्न ह्यांबद्दल जनसंघाचा सारखा विचार चाललेला असतो; जनसंघाचें हें एक खास वैशिष्ट्य आहे. "फाळणी ही दुर्दशेस कारणीभूत

झालेली अशी एक घोडचूक होय" असें त्याचें मत असून भारताचें परत एकीकरण करण्याचा त्याचा प्रयत्न आहे. "पाकिस्तानी राज्यशासनास विटलेला असा एखादा पाकिस्तानचाच विभाग आमच्या शांतिमय जीवनाकडे आकृष्ट झाला व भारतवर्षाशीं संबंध जोडण्यास प्रवृत्त झाला तर जनसंघ ह्या हालचालीचें स्वागतच करील."

"भारतीय संस्कृति ही भारताप्रमाणेंच स्वयंपूर्ण व अविभेद्य आहे. तिचा ओघ वेदकालापासून अप्रतिहतपणें वाहात आलेला आहे" हें जनसंघाचें म्हणणें आहे. संमिश्र संस्कृति असूं शकत नाहीं, संमिश्र संस्कृतीची कल्पना केवळ तर्कदुष्टच नव्हे तर राष्ट्रीय ऐक्यास विघातकहि आहे. "भारतीय संस्कृति व मर्यादा ह्यांच्या बैठकीवर भारताची पुन्हा मांडणी करणें" हें जनसंघाचें सांस्कृतिक ध्येय आहे. राष्ट्राच्या एकीकरणासाठीं, करता येतील तेवढे सारे प्रयत्न केले जातील आणि जे अराष्ट्रीय बनले आहेत अगर 'स्वार्थी हेतूनें प्रेरित होऊन, ह्या भूमीबाहेरील भूमीशीं निष्ठा ठेवणारे आहेत त्यांचा योग्य बंदोबस्त केला जाईल.

"सर्वसामान्य राष्ट्रभाषा म्हणून हिंदी तावडतोब" सुरू करावी अशी जनसंघानें शिफारस केली आहे. जनसंघ इंग्रजी अगर उर्दू ह्या भाषांना भारतीय भाषा म्हणून मान्यता देणार नाहीं. शिक्षणाचा आत्मा, स्वरूप व शिक्षणाचे विषय ह्या दृष्टींनीं शिक्षणाची उभारणी भारतीय संस्कृतीच्या बैठकीवरच केली जाईल. आयुर्वेद हें भारताचें राष्ट्रीय वैद्यक असून, त्याचा "आधुनिक शास्त्रीय दृष्टिकोनानीं" विकास केला जाईल. गाय हें आपल्या संस्कृतीचें अनादिकालापासूनचें प्रतीक असल्यानें गोवधबंदी जारी केली जाईल मागासलेल्या जमातींचें दौर्बल्य व वर्णव्यवस्थेतील विषमता दूर करण्याचें कार्य हातीं घेणें हें जनसंघाचें सामाजिक धोरण आहे. ह्या बाबतींत संघाचा दृष्टिकोन प्रागतिक आहे.

## २ धर्मराज्य

भारतीय राज्य हें धर्मराज्य, म्हणजे **अभ्युदय**, व **निःश्रेयस** हीं साध्य करून घेण्याच्या दिशेनें वाटचाल करीत राहाणारें राज्य असणार. आजच्या भारतीय राज्याचा निधर्मीपणा म्हणजे मुस्लिमांस शांत करण्याच्या धोरणाचेंच बुरखाधारी रूप होय असें जनसंघ मानतो. मुखर्जींनीं म्हटलें आहे कीं, देशांत मला जमातवाद कोठेंच आढळला नाहीं. "मुसलमानांस शांत ठेवण्याच्या धोरणांत

आहे तेवढाच ! हें नवें धोरण नेहरूंनीं व त्यांच्या सहकाऱ्यांनीं चालू केलें आहे. जमातवाद जमातवाद म्हणून नेहरूंनीं आरड चालवली आहे ती, देशापुढें टाकलेल्या खऱ्या प्रश्नास बगल देण्यासाठींच चालवली आहे." जनसंघाचें धोरण नेहरूंच्या उलट राहणार. जनसंघ एक नवीन, प्रागतिक व लष्करी दृष्टींनीं भक्कम असें राज्य उभारणार आहे. अखंड भारत व त्याची अनाद्यनंद संस्कृति ह्यावर अव्यभिचारी निष्ठा ठेवणारी अस्सल भारतीय राष्ट्रीयता तसेंच खरी भारतीय संस्कृति ह्या दोहोंच्या आधारावर ह्या राज्याची उभारणी व्हायची आहे. देशाची एकता व सुसंघटितपणा कायम टिकण्यासाठीं अनेकावयवी राज्यपद्धती पेक्षा एकावयवी राज्यपद्धति ही अधिक योग्य आहे असें जनसंघ मानतो. जनसंघाच्या हिंदुराज्याच्या कल्पनेची व पाकिस्तानच्या इस्लामी लोकराज्याची नेहरूंनीं तुलना केली असून जनसंघ हा मुस्लिम लीगचेंच जुळें भावंड आहे, तिचेंच तो हुबेहूब प्रतिबिंब, पडछाया आहे असें ह्याबाबत म्हटलं आहे

लोकसभेच्या एकूण ९३ जागा लढवल्या गेल्या होत्या, जनसंघास त्यापैकीं ३ व राज्यसभेत १ अशा जागा पटकावणें शक्य झालें. लोकसभेच्या निवडणुकींत एकूण ग्राह्य मतें जेवढीं होतीं तेवढ्यापैकी ३.०५ टक्के मतें संघानें मिळविलीं. पश्चिम बंगाल, राजस्थान, दिल्ली, मध्यभारत वगैरे ठिकठिकाणच्या राज्य विधानसभामध्यें, जनसंघाच्या एकूण ३३ जागा आहेत. जनसंघानें ७४२ जागा लढविल्या होत्या. राज्य विधानसभांच्या निवडणुकांत २.८१ टक्के ग्राह्य मतें जनसंघास पडलीं. दिल्ली राज्य विधानसभेच्या निवडणुकींत जनसंघानें २० टक्के मतें पटकावली. दिल्ली राज्यविधानसभेच्या मागाहून झालेल्या पोट-निवडणुकीमध्यें जनसंघास अधिक यश मिळालें. ह्या कामीं आर. एस. एस. च्या शिकवून तयार केलेल्या प्रचारकसंघाकडून केलेल्या मतप्रचाराचा उपयोग जनसंघास झाला व जमातवादाचे बाबतींत विशेष जागृत असलेल्या हिंदूंचीं मतें त्यास मिळालीं. पंजाबातील हिंदु व पश्चिम बंगाल्यातले हिंदु निर्वासित ह्यामध्यें जनसंघाच्या अनुयायांची संख्या भरपूर असल्याचें दिसतें. काश्मीरच्या खवळलेल्या जनतामध्यें जनसंघ पुन्हा पुन्हा व नेटानें आपला गळ टाकीत आहे परंतु निवडणुकांचे निकाल मात्र त्याच्या बाजूनें झालेले नाहींत.

१९५४ सालीं, एक नेतृत्वाखेरीज जनसंघ ह्या संघटनेचीं सारींच्या सारीं अंगें आर. एस. एस. च्या हातीं गेलीं असें म्हटलें जातें. बहुतेक सर्व आर. एस.

एस. नेत्याचा जनसंघाशीं निकट संबंध आहे. जनसंघाच्या पटावर आज ४००,००० सभासद दाखल आहेत.

## रामराज्य परिषद्

रामराज्य परिषद् ही एक विशिष्ट उच्चवर्णीय व पुराणमतवादी हिंदुवर्गानें चालविलेली अशी आणखी एक संघटना असून ती विशेषतः राजस्थान व उत्तर हिंदुस्थानांतील कांहीं थोडे भाग ह्यांत आहे.

इतर जमातवादी हिंदु पक्षाप्रमाणेंच हिचेंहि आद्य उद्दिष्ट अखंड हिंदुस्थान हेंच आहे. रामायणकाळच्या पौराणिक सुवर्णयुगाचें, रामराज्याचें मोहक चित्र रेखाटून ते आपलें उद्दिष्ट म्हणून परिषद् मतदारसंघापुढें ठेवीत असते. वैदिक परंपरा हें परिषदेचें स्फूर्तिस्थान आहे. राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक क्षेत्रांस जें पाश्चात्य वळण लागत आहे त्याला तिचा कट्टा विरोध आहे.

मंदिरप्रवेशास मान्यता देणारा कायदा रद्द करायला हवा, असा परिषदेचा आग्रह आहे कारण त्यामुळें, "धार्मिक दृष्ट्या पवित्र अशा स्थानाचें प्रदर्शनाच्या वस्तुसंग्रहालयांत रूपांतर होण्याचा संभव" आहे. "गाई, वानरें, मासे, अगर टोळ" ह्यांची हत्या करणें हें "स्वतःसिद्ध असें पातक होय" असें परिषद् मानते. 'निधर्मीपणाच्या, व शास्त्रदुष्ट अशा हिंदुकोडबिला'च्या ती विरुद्ध आहे. कारण "मातृत्व हा निसर्गदत्त अधिकार आहे." अविभक्त कुटुंबपद्धति अभंग राखून, तिला महत्त्वाचें स्थान द्यावें असें परिषद् आवर्जून सांगत आहे. वर्णव्यवस्थेस चिकटून राहाण्याचें तिचें धोरण आहे. वर्गीकृत जमातींतील लोकांस "सरकारच्या आरोग्य व स्वच्छता ह्या खात्यांच्या कारभारांत उच्च दर्जाच्या जागा देणें" आणि "चामड्याचे धंदे व मृगाजिनासारख्या कातड्याचे धंदे आणि इतर तत्सम धंदे" त्यांच्या हातीं सोंपविणें हें धोरण परिषदेनें जाहीर केलें आहे, परिषद् वर्णव्यवस्थेस चिकटून राहात आहे हें ह्यावरून उघड दिसून येतें. वर्गहीन समाजव्यवस्थेसहि तिचा विरोधच आहे. कारण "वर्ण हे समाजाच्या विविध अवयवासारखे आहेत." प्रत्येकास "संपत्ति मिळविण्याचा व इस्टेट करण्याचा हक्क" असायला पाहिजे. इस्टेटीवाल्यांच्या इस्टेटी, त्यांना पूर्ण भरपाई दिल्यावाचून काढून घेता कामा नये, आणि सात प्रकारच्या इस्टेटी ह्या सरकारजमा करतांच येत नाहींत. वडिलोपार्जित इस्टेट; बेवारशी संपत्ति, विक्रीचें उत्पन्न, खंडणी, कर्जांवर

कायदेशीर रीत्या मिळविलेलें व्याज, व्यापार व शेती यावर मिळविलेलें उत्पन्न आणि धर्मसमत असें दान. नियंत्रण, वाटपपद्धति व व्यापारधंद्याचें राष्ट्रीयीकरण ह्या गोष्टींस परिषदेचा विरोध आहे. चलनी नाण्याचा वापर न करता एकदम मालाचीच देवाणघेवाण करणें परिषदेस अधिक पसंत आहे व त्यासाठीं कायदेशीर सावकारी व्यवहारावर नियंत्रण घालण्यात यावें अशी परिषदेची शिफारस आहे.

परिषदेचीं, बहुतेक बाबतींतील धोरणें इतर हिंदु जमातवादी पक्षाच्या धोरणांसारखींच आहेत एवढेंच कीं, परिषदेचें वळण अधिक सनातनी व प्रतिक्रियात्मक असें आहे. जसे थे धोरणाचा, यत्किंचितहि बदल नको असलेला असा हा एक कट्टर पक्ष आहे. लोकसभेच्या निवडणुकीत परिषदेस राजस्थानमध्ये ३ जागा मिळाल्या. एकूण ६२ जागा लढविल्या गेल्या होत्या. एकूण ग्राह्य मतांपैकीं १ ९८ टक्के मतें परिषदेस मिळालीं. वेगवेगळ्या ठिकाणच्या विधानसभातील ३२८० जागापैकीं, परिषदेनें ३२ मिळविल्या तिनें एकूण ३४२ जागा लढविल्या होत्या. विधानसभाच्या निवडणुकात एकूण जी मतें दिलीं गेलीं होतीं त्यापैकीं १·२१ टक्के मतें परिषदेस मिळालीं.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

नागपूरच्या हेडगेवारानीं १९२४ सालीं आर. एस. एस. ची स्थापना केली. महाराष्ट्राचे ब्राह्मण राज्यकर्ते जे पेशवे, त्यानीं १८ व्या शतकात जवळ जवळ सबंध भारतात प्राप्त करून घेतलेली सत्ता व वैभव हीं त्याचीं स्फूर्तिस्थानें होतीं. त्याच धर्तीवर त्यानीं गुप्त संघटना म्हणून ही चळवळ सुरू केली. हिंदु बहुजनसमाजास सुसंघटित करावें व तद्द्वारा भारतीय राजकारणात महाराष्ट्रीय ब्राह्मणाचें वर्चस्व प्रस्थापित करावें हे त्याचें उद्दिष्ट होते.

जमातवादीपणा ही ब्रिटिशाच्या धोरणाशीं जुळणारी गोष्ट असल्यामुळें असेल कदाचित्, परंतु हेडगेवाराच्या हाताखालील आर. एस. एस चें ब्रिटिशाशीं कधीच खटकलें नाहीं. १९४० सालीं आर एस. एस. याच्या नेतृत्वाचीं वस्त्रें गोळवलकरास–ज्याना त्याचे अनुयायी 'अजिंक्य गुरुजी' म्हणतात–देण्यात आलीं. १९४० पर्यंत संघ महाराष्ट्र, वऱ्हाड, मध्यप्रदेश व पंजाब येथें आढळून येत होता, ह्या सालापासून तो सर्व प्रांतापर्यंत पसरत गेला.

जर्मनींत हिटलरच्या नाझी पक्षाचा जो लढाऊ वाण्याचा ध्येयवाद होता त्याचा

छाप आर. एस. एस. वर पडली असून त्यानें हिंदु राष्ट्रीयत्वाची एक विशेषच कल्पना जोपासली होती. नाझींप्रमाणेच आर. एस. एस. नेंहि तरुणाची व कुमार-वयाच्या युवकाची निष्ठा आपल्या कार्यासाठीं संघटन करून घेण्याचा प्रयत्न चालविला होता. शारीरिक व मानसिक दृष्टीनीं एक विशेष प्रकारचें शिक्षण देऊन तयार करण्यासाठीं व बाल स्वयंसेवक व शिशु स्वयंसेवक ह्याचीहि भरती त्यात होऊ लागली.

गांधीजींच्या हत्येनंतर सरकारनें संघ बेकायदा ठरविला सरकार व गोळवलकर ह्याच्यात झालेल्या पत्रव्यवहारावरून आर. एस एस च्या स्वरूपाची कल्पना होऊ शकते. "आर एस. एस. वर ठेवल्या गेलेल्या आरोपाचा इत्यर्थ असा कीं आर. एस. एस. चीं कामें गुप्तपणें चालत संघटकाच्या प्रतिज्ञा कांहींहि असल्या तरी धर्मद्वेषाच्या तत्त्वावरच ते जनमनात स्फूर्ति उत्पन्न करीत होते, खुद्द राज्यापेक्षा एका जमातवादी पक्षाचें महत्त्व ते अधिक मानीत होते, प्रत्यक्षात पाहिलें तर आर. एस एस. चे अनुयायी पद्धतशीरपणें हिंसक स्वरूपाच्याच गोष्टी करीत होते आर. एस. एस. नें स्वीकारलेल्या कार्यपद्धति शांततामय व सनदशीर स्वरूपाच्या अजिबात नसल्याची, आणि हिंदु धर्म व संस्कृति ह्याचा पुरस्कार करता करता हिंद्वेतरांशीं हिंसक तऱ्हांनीं वागणें हें स्वरूप त्यास येऊन असल्याचीं उदाहरणें सर्वच प्रांतात व कित्येक राज्यात घडून आलीं आहेत." सरकारनें लिहिलें होते कीं आर. एस. एस. व तिचे सभासद पद्धतशीरपणें हिंसक कृत्यें करीत असल्याचे भरपूर पुरावे आमचेपाशीं आहेत. संघाची घटना अलिखितच होती तरीहि सरकारच्या मतें, "आर. एस. एस. च्या सर्व दर्जाच्या विविध समितींमध्ये असले लोक—तेहि भरपूर प्रमाणात—दिसून येतात कीं जे वास्तविक वरून नेमले गेलेले असावे. संघटनेचें अशा स्वरूपाचें तत्त्व अत्यंत धोक्याचें असतें. त्यातल्या त्यात, सरसंघचालकाची कामें काय ह्याची निश्चित व्याख्या अशी केलेलीच नाही लोकशाहीच्या हितरक्षणाचे दृष्टीनें पाहिलें तर अधिकाऱ्याच्या एक एक नेमक्या कामाची निश्चित स्वरूपाची यादी अवश्य करायला पाहिजे आणि अशा रीतीनें संभाव्य हुकूमशाहीचा ठावठिकाणाहि नष्ट करून टाकायला पाहिजे. आपला वारस कोण, हें सरसंघचालक स्वत च ठरवीत असतात ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. खरें म्हणजे आर. एस एस. ची वृत्ति हुकुमशाही तत्त्वज्ञानास चिकटून राहाण्याची आहे ह्यात संशय नाहीं. ह्या आरोपांमुळें आर. एस. एस चा नेता

तिळमात्र दबून गेला नाहीं, उलट आर. एस. एस. संघटनेतील व तिच्या कार्यातील जे दोष देशहितास एवढे अपायकारक त्यास हट्टानें चिकटून राहिला." सरकार म्हणते, ' ही निष्ठा तुम्हीं अशा थराला नेली आहे कीं, आज प्रत्येक प्रांतात तुमच्या संघटनेंतल्या महत्त्वाच्या अशा सर्व हुद्द्यावर तुम्ही एका विशिष्ट जमातींतले व एका विशिष्ट क्षेत्रातले असेच लोक नेमले आहेत; आणि ही गोष्ट तुमच्या संघटनेंत जणु ठरून गेल्यासारखी झाली असूनहि तुम्हीं तिकडे साफ कानाडोळाच करणें चालविलें आहे." आर. एस. एस.च्या सभासदत्वाच्या प्रतिज्ञेत "सभासदत्वाच्या कामीं स्वतःस आजन्म वाहून घेणें" हें कलम आहे. "उघडपणें चालणाऱ्या कार्यापेक्षा गुप्तमंडळाच्या कार्याशींच ही शपथ अधिक मिळतीजुळती आहे," ह्या आक्षेपास आर. एस. एस. नेत्याचें उत्तर असें: "आर. एस. एस. चें कार्य हें हिंदु संस्कृतीवर आधारलेलें आहे. हिंदु संस्कृतीत शपथ ही नेहमी आजीव पाळण्याचीच गोष्ट असते, तो काहीं तात्पुरता करारनामा नसतो. आजन्म निष्ठेची शपथ हें जर गुप्तमंडळाचेंच वैशिष्ट्य असेल व जर अशी शपथ म्हणजे प्रतिगामित्व असेल तर, सरकारच्या दृष्टीनें, हिंदु समाजच गुप्तमंडळाशीं मिळताजुळता आहे व हिंदु संस्कृति हीहि जात्या प्रतिगामी आहे असें झालें म्हणावयाचें!"

संघ राजकारणात भाग घेणार नाहीं व संघाची घटना लिहून काढण्यात आली होती तिजबरहुकूम, कायदेशीर मार्गांनीं आपलें कार्य करील असें गोळवलकरानीं आश्वासन दिल्यानंतर, १२ जुलै १९४९ रोजीं संघावरील बंदी उठविण्यात आली. गोळवलकरांच्या मुक्ततेनंतर सर्वभर त्यांचा प्रचंड सत्कार व स्वागतें करण्यात आलीं. दिल्ली येथील स्वागताबाबत अमृतबझार पत्रिकेनें म्हटलें आहे, "ते आले, त्यानीं पाहिलें व ते जिंकणार अशी सर्व चिन्हें दिसून आली."

एप्रिल १९५६ मध्यें सरसंघचालकाचा ५१ वा वाढदिवस साजरा करण्यात आला, दिल्लींत ३,२१,५५१ रुपयांची व पुण्यात २,८१,००१ रुपयांची अशा थैल्या त्याना अर्पण करण्यात आल्या. एकूण भारतात जमा झालेली रक्कम संघाच्या प्रतिनिधि सभेनें त्याना अर्पण केली तिचा आकडा २०,७५,००० पर्यंत गेला होता. गोळवलकराना जे २५ लक्ष रुपये हवे आहेत त्याच्या अगदीं जवळ जवळ ही रक्कम जाऊन पोहोचली होती. गोळवलकराना हव्या असलेल्या ह्या रकमेचा विनियोग, पुनरुज्जीवनाची देशव्यापी मोहीम सुरू करण्यासाठीं

व्हावयाचा आहे. कदाचित् आगामी निवडणुका त्याच्या मनापुढें असाव्या.

गोळवलकर हे सन्यास व योग ह्याच्या करड्या तालमींत तयार झालेले आहेत तेव्हा सुशिक्षित सवर्ण हिंदु तरुणावर त्याच्या प्रभावशाली व आकर्षक व्यक्तिमत्त्वाची मोहिनी पडावी ह्यात नवल नाहीं. तरुणाच्या मनातील अगदीं खोल, तळाशीं दडलेल्या साहसभावनेस ते सहजच आवाहन करितात. आजच्या तरुणामध्यें आशा-आकाक्षाचा चक्काचूर होऊन गेल्याची, वैफल्याची भावना पसरली आहे अशा परिस्थितींत त्यांची ती खाजगी सैन्याची आठवण करुन देणारी लढाऊ बाण्याची सघटना, तिचें तें सर्वभर पसरलेलें मजबूत जाळें, तिच्या त्या प्रतिज्ञा हीं सारींच आज असलेल्या निराश तरुणाना काहीं अर्थपूर्ण व हेतुपूर्ण कार्य करण्यास, पराक्रमाचें क्षेत्र मिळवून देत आहेत. संघाच्या पटावर आज ५,००,००० प्रत्यक्ष कार्य करणारे सभासद आहेत.

काहीं वर्षामागे त्यानीं लिहिलेल्या पुढील शब्दात त्याचें तत्त्वज्ञान थोडक्यात आलें आहे. "हिंदुस्थानातील अहिंदूनीं एक तर हिंदु सस्कृति व भाषा ह्याचा अगीकार केला पाहिजे, हिंदु धर्मास मान द्यायला, त्याच्या विषयी आदर बाळगायला शिकलें पाहिजे हिंदु वश व संस्कृति ह्याच्या गौरवाखेरीज इतर कल्पना सोडून देऊन हीच एक कल्पना कवटाळली पाहिजे; नाहींतर हिंदुराष्ट्राचे सर्वस्वी ताबेदार तरी होऊन राहिले पाहिजे. अशी ताबेदारी पत्करली असता त्याना कशावरच अधिकार असा सांगता यायचा नाहीं, कसल्याहि खास सवलतींसहि ते अपात्र असतील. मग जास्त पक्षपाती सवलतींची वागणूक मिळणे दूरच—नागरिकत्वाचे हक्कहि त्याना राहावयाचे नाहींत. त्याना ह्यापरता अन्य मार्गच नाहीं-निदान असायला तरी नको." "ह्या देशात हिंदूच काय ते राष्ट्रीय आहेत आणि मुसलमान व इतर अहिंदु अगदीं राष्ट्रीयताविरोधी नसले तरी निदान राष्ट्राबाहेरचेच होत" "आम्हा हिंदवासीयाना आमच्या राष्ट्र-जीवनातून धर्म वेगळा करणें अशक्य आहे कारण त्याचाच अर्थ असा होईल कीं आमच्या वशाभिमानाशीं, ज्या एका ध्येयासाठीं व कार्यासाठीं आम्ही युगा-नुयुग जगत आलो आहों त्याच्याशीं आम्ही बेइमान झालो." "ह्या हिंददेशात हिंदु वश, त्याचा हिंदु धर्म, हिंदु सस्कृति व हिंदु भाषा (संस्कृत व तज्जन्य भाषा ह्याचा निसर्गसिद्ध गोतवळा) एवढ्यानीं राष्ट्र ह्या कल्पनेची परिपूर्ति होते." "हिंदु वश व हिंदु राष्ट्र ह्यांच्या गौरवाच्या आकाक्षा उराशी कवटाळून

धरून कार्य करण्यास जे उद्युक्त झाले आहेत, हें ध्येय साध्य करण्यासाठीं जे झटत आहेत तेच फक्त राष्ट्रीय देशभक्त होत ! वाकीचे देशभक्तीचा बरपागी आव आणणारे आणि हिंदुराष्ट्रास अती विघातक ठरणाऱ्या कार्यमार्गाचा बुद्धयाच अवलंब करणारे सारेजण देशद्रोही व राष्ट्रकार्याचे शत्रु होत." प्रत्येक हिंदु हा आर्यच आहे, आणि परकीयाच्या आक्रमणाच्या आधी ८ किंवा १० हजारहि वर्षांपासून "हिंदु म्हणजेच आर्यवंश" हा ह्याच देशाचा रहिवासी आहे हे सिद्ध करण्याचा त्याचा प्रयत्न आहे. हा प्रयत्न करताना तसेंच 'आर्यवंशाचें मूलस्थान उत्तरध्रुव होय' ह्या टिळकाच्या उपपत्तीशीं तडजोड करण्यासाठीं म्हणून गोळवलकरानीं असा सिद्धान्त मांडला आहे कीं, हें ध्रुवीय वसतिस्थान आधी हिंदुस्थानातच होतें. "वेदातले ध्रुवीय वसतिस्थान आधीं हिंदुस्थानातच होतें हें खास. आणि हिंदु तें सोडून आले असें नसून ध्रुव कटिबंधच हिंदूना हिंदुस्थानात सोडून त्या स्थानीं गेला."

भारतात भाषावार प्रांतरचना व्हावी ह्या तत्त्वास गोळवलकराचा विरोध आहे. देशास जास्तींत जास्त केंद्रित स्वरूपाची शासनसंस्था हवी अशी त्याची शिफारस आहे. संघाच्या प्रतिनिधिसभेनें, हिंदपाकिस्तान झगड्यावावत जो अगदीं नवा ठराव पास केला आहे व त्यात पाकिस्तानाबाबत ताठर धोरण स्वीकारण्याची जी शिफारस केली आहे त्या वरून स्पष्ट दिसून येतें कीं प्रत्यक्ष कार्याच्या राजकारणात नक्की भाग घेण्याचा, संघाचा मनसुबा असावा.

निर्मळ आद्य आर्यवंशाचें संघाचें तत्त्वज्ञान आहे, काहीं नक्की उद्दिष्ट असलेलें कार्य करण्यास संधि देतो असें संघाचें आश्वासन आहे: ह्यामुळें संघ हा सवर्ण हिंदु तरुणाच्या हृदयातील खोल व भावनामय प्रवृत्तींना एक प्रभावी आवाहन ठरला आहे. राज्याच्या दृष्टीनें विचार केला तर डी. एफ. कराका ह्यानीं म्हटलें आहे ते योग्यच आहे. ते म्हणतात "हा कृष्णजटाधारी माणूस अगदीं निरुपद्रवी दिसतो खरा परंतु नेहरूंना सर्वांत मोठा धोका त्याच्याच पासून आहे कारण नेहरूंच्या निधर्मी राज्याच्या कल्पनेच्या मूळें कुठारः चालवायला त्यानें कंबर कसली आहे."

शेवटल्या सार्वत्रिक निवडणुकावरून हे स्पष्ट दिसून आलें कीं मतदार संघास आकर्षून घेणें हिंदु जमातवादी पक्षास जमलेलें नाहीं. उत्तरेकडील, पक्के सरंजामशाही वळणाचे असे काही प्रदेश कदाचित् ह्याला अपवाद ठरतील

तेवढेच! त्याना परिषदेनें 'जैसे थे'चें आश्वासन दिलें होतें. जमीनदारशाही व सरंजामशाहीची इतर अंगें क्रमाक्रमानें कमी होत गेलीं, तसेंच योजनाबद्ध आर्थिक विकासाचें प्रमाण वाढत गेलें म्हणजे जमातवादी पक्षाचा जोर आणखीहि कमी होत जाण्याची शक्यता आहे. तरीपण आज हिंद-पाक तेढ वाढत्या प्रमाणात आहे व देशातल्या प्रतिक्रियात्मक शक्ति चिवटपणें टिकाव धरून आहेत ह्यामुळें आगामी निवडणुकात जमातवादी पक्षाचा फासा जोरदार दान टाकण्याचा प्रयत्न करील अशीहि शक्यता आहे. ह्या चळवळींना जोर देणाऱ्या आर. एस एस. चें वजनहि चांगलेंच वाढलेलें आहे, जमातवाद तसेंच अद्याप देशात पक्कें मूळ धरून असलेल्या इतर परंपरा ह्यांचाहि सांस्कृतिक पाठिंबा आहे तेव्हा उथळ आशावादास जागाच नाही.

## हिंदु जमातवादास जमातवादाचाच विरोध

धार्मिक, सांस्कृतिक, भाषिक दृष्टींनीं ज्या अल्पसंख्याक जमाती आहेत त्यांचे मनांत, हिंदुजमातवादाची प्रतिक्रिया म्हणून साहजिकपणेंच भय उत्पन्न झालें आहे. आणि भयभावनेंतूनच आत्मसंरक्षणाची प्रवृत्ति उत्पन्न होत असते. ह्यामुळें अल्पसंख्याक जमाती ह्या, जमातवादाला जमातवादानेंच प्रत्युत्तर देण्यास प्रवृत्त होत असतात. अशा रीतीनें आज हिंदुस्थानात, हिंदुजमातवादास जमातवादानेंच उत्तर द्यायला निघालेले अनेक जमातवादी पक्ष दिसून येत आहेत. ऑल इंडिया मुस्लिम लीग, मद्रास, शीखांचें अकाली दल, दक्षिणेंतील द्रवीड काझगम हीं ह्यांचींच उदाहरणें होत.

न्याय व सनदशीर मार्गांनीं आत्मसंरक्षण हा असल्या अल्पसंख्याक जमातवादी संघटनांचा आद्य हेतु असू शकेलहि. परंतु फारच थोड्या कालावधींत त्या चढाऊ धोरणाच्या व विकृत वळणाच्या बनल्या. जमातवादी संघटना म्हटली कीं ही विकृति तिच्यात जायाचच असते, मग ती संघटना अल्पसंख्याकाची असो कीं बहुसंख्याकाची असो. असल्या संघटना राष्ट्रातील शांततेचा व ऐक्याचा नाश करून, राष्ट्रविकासाचा जोरहि कमी करून टाकतात. शिवाय अनेक जमातींनी मिळून एरवी जो सर्वांच्या भल्यास हातभार लावला असता तो लावण्यास त्यांना असल्या संघटना असमर्थ करतात.

## ऑल इंडिया मुस्लिम लीग, मद्रास

मूळच्या ऑल इंडिया मुस्लीम लीगचा हा हिंदुस्थानांत राहिलेला अवशिष्ट भाग आहे. १९०६ साली डाक्का येथें मुस्लीम लीगची कायदेशीर दृष्टींनी स्थापना झाली. तिचें मुख्य उद्दिष्ट हें होतें "भारतातील मुसलमानाच्या राजकीय हक्कांचें व हितसंबंधांचें संरक्षण करून त्याचा पुरस्कार तसेंच मुसलमानाच्या गरजा व आकांक्षा सरकारपुढें मांडावयाच्या हें कार्य राजकीय हक्काच्या दृष्टीनें करणें; आणि मुसलमानाच्या मनात येऊं लागलेल्या इतर जमातींबद्दलच्या वैरभावनेस आळा घालावयाचा हें कार्य त्याच्या हितसंबंधरक्षणाचे दृष्टीनें करणें." १९०९ मध्यें जमातवादी निराळा आणि जमातवादी दृष्टीनें सभासद निवडण्याचा हक्क ह्या तत्त्वास सरकारकडून मान्यता मिळविण्याचे कामीं लीगला यश आले. १९१३ साली लीगनें नवी घटना बनवली. "मुस्लिमांच्या हक्काचें संरक्षण करणें व ह्या हेतूस बाध येऊं न देतां, भारतास योग्य अशा स्वराज्याच्या पद्धतीची प्राप्ति करून घेणें." "मुस्लिमांची जमातावशिष्ट स्वतंत्रता भक्कम हवी, तसेंच भारताच्या साऱ्या उत्क्रांतीच्या ओघात, घटनेच्या दृष्टीनें जे फेरबदल केले जातील, त्याचा ह्या स्वतंत्रतेस धक्का पोहोंचता कामा नये" ही स्वतंत्रता कायम राखण्याच्या तत्त्वावरच प्रस्तुत संघटनेची उभारणी झाली आहे ह्या घटनेवर जिन्हांनी विशेष जोर दिला होता.

कॉंग्रेस व लीग ह्यांनीं कांहीं काळ, परस्पराबद्दल आदर ठेवून एकोप्यानें काढिला. त्यानंतर मात्र लीग व कॉंग्रेस ह्यांचे मार्ग सर्वस्वी भिन्न व अनेकदा परस्परविरोधी असे बनले. देशातील दोन मुख्य भावनाचें—राष्ट्रीयता व जमातवाद ह्यांचे—ते प्रतीक बनले. राष्ट्रीयतेचा संघटनात्मक आविष्कार कॉंग्रेस करीत होती व जमातवादाचा अतिशय जबरदस्त आविष्कार लीगद्वारा कॉंग्रेसचा मुस्लिमातर्फे बोलण्याचा अधिकार लीगनें अमान्य केला. १९४० मध्यें लीगनें द्विराष्ट्रवादाचें सूत्र उचलून केलें आणि १९४६ च्या निवडणुकांतून राष्ट्रीय बाण्याच्या मुस्लिमांना उखडून टाकलें. १९४७ मध्यें पाकिस्तानच्या निर्मितीबरोबर मुस्लीम लीगचे पाकिस्तान लीग व भारतीय मुस्लिम लीग असे दोन खंड झाले आज भारतात असलेली लीग हा अगदींच लहानसा राजकीय पक्ष असून त्याच्या हालचाली मद्रासपुरत्याच मर्यादित आहेत. ह्या लीगला पाठिंबा देणाऱ्यांपैकी

बहुतेकजण कॉंग्रेसला मिळाले आहेत, किंवा त्यांनी प्रत्यक्ष राजकारणातून अंग तरी काढून घेतलें आहे. लोकसभेत त्यांचा मद्रासचा प्रतिनिधि एकच आहे व मद्रास राज्य विधानसभेत ५ आहेत. संयुक्त मतदार संघाच्या अनुरोधानें पाहतां लीगला ह्यापुढे भारतात कांहीं स्थान राहीलसें दिसत नाहीं. परंतु भारतातील मुस्लिम अल्पसंख्यांकाचें प्रतिनिधित्व कायम राखण्यासाठी लीग अस्तित्वात असावी, अशी लीगचे अध्यक्ष मोहमद इस्माइल ह्यांची इच्छा आहे. मलबार-मध्यें लीगचें पुनरुज्जीवन झालें असून, तेथल्या स्थानिक निवडणुकांत तिला काहीं थोडें यशहि प्राप्त झालें आहे म्हणूनच बहुधा हा प्रकार होऊं शकला असावा.

अधिक व्यापक दृष्टीनें विचार करता असें दिसतें की ज्या उद्देशाचा पाठपुरावा हा जमातवादी पक्ष करू पाहात आहे त्या उद्देशाचाच नाश ह्यामुळें होणार आहे.

मुस्लिमांच्या इतर लहान लहान राजकीय संघटना उदा. शिया पोलिटिकल कॉन्फरन्स, मोमीन अमर कॉन्फरन्स, ऑल इंडिया मुस्लिम मजलिस ह्या सर्व कॉंग्रेसच्या राजकीय कार्यक्रमास जोरदार पाठिंबा देणाऱ्या आहेत. परंतु ह्या राजकीय संघटना, त्यांचा दृष्टिकोन राष्ट्रीय बाण्याचा असूनहि, चालू राहण्यात कितपत औचित्य आहे हा प्रश्नच आहे

## शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन

वर्गीकृत जमातीच्या हिंदूंची संख्या भारतात बरीच आहे. त्यांची अखिल भारतीय स्वरूपाची राजकीय संघटना बनविणें हे फेडरेशनचें उद्दिष्ट आहे. भारतांतील जुन्यापैकीं पक्षात तिची गणना होते. तिचे कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम् समर्थ नेते आंबेडकर हे आहेत अगदीं भलत्याच थराला जाणारे दावे सांगणें व तसल्याच मागण्या करणें हे प्रकार फेडरेशन ब्रिटिशांच्या काळात करीत असे. आज फेडरेशनचें उद्दिष्ट हें आहे कीं वर्गीकृत जमातींना जीवनाच्या सर्व क्षेत्रात सवर्ण हिंदूंच्या बरोबरीचा दर्जा प्राप्त व्हावा. खेरीज, सवर्ण हिंदूंकडून वर्गीकृत जातींवर गाजवल्या जाणाऱ्या सुलतानशाहीचीं व दडपशाहीचीं जीं उदाहरणें असतील त्यांची नोंद ठेवण्याचाहि त्यांचा प्रयत्न आहे. आंबेडकर हे गाढे विद्वान् असून घटनेच्या कानूबाबत त्यांचा शब्द प्रमाणभूत मानला जातो. अनेकदा ते आपल्या मनांत दाटलेल्या वैफल्यभावनेमुळे उघडउघडपणे बोलून वाट करून देत असतात, "सवर्ण-हिंदु-कॉंग्रेस"वर जबरदस्त हल्ले चढवितात व

आपल्या सर्व अनुयायास घेऊन हिंदु धर्म सोडून देण्याच्या धमक्याहि देतात. फेडरेशनच्या उद्घोषित तत्त्वापैकीं कांहीं पुढें दिलीं आहेत. माणसात सामाजिक दृष्ट्या समत्व, व्यक्ति ही मुख्य गोष्ट असून राज्य हें तिच्या उन्नतीचें एक साधन असावें, लोकप्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धतीस अधिक पसती. ह्या पक्षाचें सामान्य उद्दिष्ट म्हणजे सामाजिक लोकशाहीच्या दृष्टीनें ज्याला लोकसत्ताक म्हणता येईल अशा समाजाची स्थापना करणें आणि प्रत्येक नागरिकाच्या मनात आत्म-प्रतिष्ठेची व स्वाभिमानाची भावना जागृत करणें. हें काम शांततामय मार्गांनीं करावयाचें आहे. मागासलेल्या जातींच्या भवितव्याचा दर्जा, हा सामाजिक, आर्थिक व राजकीय दृष्टींनीं अधिक उच्च पातळीस नेला पाहिजे. दारिद्र्याचीं पाळेंमुळें खणून काढायला पाहिजेत. लोकसंख्येच्या वाढीस आळा घालून, जमातीच्या आर्थिक आवर्तीत शक्य तो काटकसर करून हें कार्य करावयाचें आहे. त्यात आधीं विचार नियोजनाचा करायला हवा.

लोकसभेसाठीं लढविलेल्या ३४ जागापैकीं २ जागा, आणि राज्यविधिमंडळा-मध्यें २ जागा ह्या पक्षानें मिळविल्या आहेत. पक्षास एकूण जेवढीं ग्राह्य मतें पडलीं त्यात उच्चांक २·३ टक्के मताचा होता. वेगवेगळ्या राज्यविधानसभामध्यें मिळून ह्या पक्षाच्या एकूण १२ जागा आहेत. त्यापैकीं ५ जागा हैद्राबाद विधान सभेत आहेत. एकूण २४१ जागा ह्या पक्षानें लढविल्या होत्या. राज्यविधान-सभाच्या निवडणुकात एकूण जेवढें ग्राह्य मतदान झालें त्यात ह्या पक्षास एकूण १·७४ टक्के मतें पडलीं होतीं. आंध्र विधानसभेच्या १९५४ च्या निवडणुकात फेडरेशननें २ जागा पटकावल्या. निवडणुकांचे हे निकाल पाहिले असतां दिसून येतें कीं १९४६ च्या निवडणुकापासून आजवरच्या काळात फेडरेशननें काहीं प्रगति नक्की केली आहे.

परंतु नव्या परिस्थितीशी जुळतें घेऊन स्वतःचा विकास करून घेण्याचे कामीं मात्र फेडरेशनला यश आलेलें नाहीं असें म्हटल्यास तें न्याय्यच ठरेल. मागा-सलेल्या वर्गाच्या, उच्चवर्णीयाविरुद्धच्या तक्रारी हा पाया घेऊन त्यावर ही संघटना उभारण्यात आली आहे. तिचें तत्त्वज्ञान आणि प्रत्यक्ष कामाचा कार्यक्रम ह्यात विधायक व ठाम स्वरूपाचें असें काहीच नाहीं. अशी परिस्थिति असताना, राष्ट्राच्या नव्या राजकीय स्वरूपात त्याला पुढें काही स्थान राहाणार नाहींहि. परंतु दीर्घकाळापासून वर्गीकृत जातींच्या हितास अत्यंत अपायकारक ठरलेल्या

ज्ञानीयतेशीं झगडा करण्याचें काम शे. का. फे. ला करता येईल, आणि अशा रीतीनें सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रांत चाललेल्या कार्यास निश्चित स्वरूपाचा हातभार ती लावू शकेल.

## द्राविड काजगम व द्राविड मुनेत्र काजगम्

गेल्या कित्येक वर्षांपासून द्राविडीस्तान चळवळ, दक्षिण हिंदुस्थानी जीवनाचें आसन गदगदा हालवीत आहे. चळवळीचा जोर तामीळनाडमध्यें विशेष आहे. तिचे पुढारी ई. व्ही. रामस्वामी नाइकर हे असून त्यानाच त्याचे निष्ठावत अनुयायी 'पेरियर' ह्या नावानें ओळखतात. द्राविड काजगम हें द्राविडीस्तान चळवळीचें मुख्य आघाडीचें केंद्र आहे. द्राविडी संस्कृति ही पुरातन, वैभवशाली व आर्यसंस्कृतीहून भिन्न अशी आहे. तिचा अभिमान जे बाळगतात अशा द्राविडभाषिकांसाठीं, केंद्रीय सरकारपासून वेगळें असे स्वतंत्र सार्वभौम राज्य उभें करणें हा ह्या चळवळीचा हेतु आहे. स्वतंत्र सार्वभौम राज्याच्या मागणीचें बाबतीत कसलीहि तडजोड करायला ही चळवळ तयार नाहीं ही एक गोष्ट, तसेंच तिची हिंदीविरोधी चळवळ आणि आगगाड्याचे मार्ग रोखून धरण्यासारख्या हिंसात्मक निदर्शनाचा कार्यक्रम, ह्यामुळें प्रस्तुत चळवळींत खरेंखुरें, भरीव स्वरूपाचें असें कांहीच शिल्लक राहिलें नसून तिला एक नाटकी स्वरूप तेवढें येऊन बसलें आहे.

दक्षिणेंतल्या ब्राह्मणांनीं आपली जात वेगळीच काढली असून ब्राह्मणेतरांशीं ते कमींत कमी संबंध ठेवतात, आपली जात ही त्यांनीं सत्ताधाऱ्यांची जात बनवून ठेवली आहे १९२० मध्यें ब्राह्मणाविरुद्ध बंड पुकारणाऱ्या दोन चळवळी मद्रास प्रांतात सुरू झाल्या. एकीचें नाव 'जस्टिस पार्टी' (न्यायासाठी झगडणारा पक्ष) असून ती श्रीमान् व वजनदार अशा ब्राह्मणेतरांनीं चालविली होती, दुसरीस 'सेल्फ रिस्पेक्ट मूव्हमेंट' (स्वाभिमान संवर्धक चळवळ) म्हणत, कारण खालच्या जातींच्या, तसेंच जातिबाह्य झालेल्यांच्या ठिकाणीं स्वाभिमान जागृत करणें हा तिचा हेतु होता. 'सेल्फ-रिस्पेक्ट चळवळी'ची स्थापना ई. व्ही. रामस्वामी नाइकर ह्यांनीं केली होती.

ह्या दोन पक्षांनीं खांद्यास खांदा भिडवून कार्य चालविलें. 'जस्टिस पार्टी' सत्तारूढ होती आणि राजकीय सत्ता ब्राह्मणेतरांच्या हातीं राखून धरण्याच्या

कामाकडे तिचें अधिक लक्ष होतें, तर जनतेच्या धार्मिक, सामाजिक व नागरिक जीवनात आमूलाग्र सुधारणा घडवून आणण्याची मोहीम 'सेल्फ रिस्पेक्ट पार्टी'नें चालविली होती. ही चळवळ धर्मविरोधी असून कोणत्याहि गोष्टीचा निर्णय घेताना तर्कशुद्ध बुद्धिवाद हाच निकष तिनें ठरविला होता. सामाजिक समता स्थापन करण्यासाठीं व जातिसंस्था नामशेष करण्यासाठीं तिनें मोहीम चालविली होती.

मजुरांच्या हितसंबंधाचाहि प्रस्तुत चळवळीनें कैवार घेतला असून व्याख्यानें व विविध वृत्तपत्रें ह्या दोन्ही मार्गांनीं हें कार्य चाललें होतें. १९३५ पासून, दक्षिण हिंदुस्थानी संस्थानामधील कॉंग्रेसचें नेतृत्व हस्तगत करण्याचें कामीं, ह्या चळवळींनीं ब्राम्हणेतरास खूपच साहाय्य केलें असें म्हणायला हरकत नाहीं.

द्राविड मुनेत्र काजगमची स्थापना १९४९ सालीं झाली. 'ई. व्ही. आर.' ह्याचे निकटवर्ति शिष्य जे आनंदमूर्ति त्यांनी तिची स्थापना केली होती. परंतु ह्या दोन शाखांच्या कार्यक्रमात भेद असा फारच थोडा होता. द्राविड मुनेत्र काजगमच्या आज ६५० शाखा असून, सभासद संख्या ६०,००० आहे.

१९५२ च्या निवडणुकात पार्टीनें एकहि उमेदवार उभा केला नाहीं; परंतु द्राविडीस्तानच्या ध्येयसिद्धीसाठीं कार्य करावयास जो कोणी उमेदवार पुढें होईल त्याला पाठिंबा देण्याचें आश्वासन दिलें. अनेक पक्षांना हा पाठिंबा मिळविण्यात व म्हणूनच निवडणुकांच्या कामातहि यश मिळालें. जमातवादाच्या भावनोत्कट ऊर्मीस काजगमनें एक सुसंघटित वळण दिलें होतें व त्याचा फायदा कम्युनिस्टांनींहि घेतला. दक्षिण हिंदुस्थानातली ही चळवळ म्हणजे कांहीं क्षुल्लक, उपेक्षणीय बाब नव्हे. जमातवादामधूनच अधिकच तीव्र, अधिक जहाल अशा दुसऱ्या जमातवादाची उपज होत असते. आर. एस. एस. सारख्या जहाल धर्मजागृतिवादी चळवळींपुढें, त्यांचेंच जुळें भावंड, त्यांचेंच उलट प्रतिबिंब, द्राविडीस्तान चळवळीच्या रूपानें प्रकट झालें आहे. मुनेत्र काजगम ही द्राविडीस्तानच्या मुद्यावर सार्वत्रिक निवडणुका लढविणार आहे असें समजतें.

## शीख पक्ष

शिखांमध्यें तीन प्रमुख पक्ष असून त्यातील प्रमुख पक्ष जें शिरोमणी अकाली दल, त्याचे नेते मास्टर तारासिंग असून तेच त्याचे अध्यक्षहि आहेत. अकाली दला

अनुक्रम ३०४७६ / ०५४४ / ४-४-६१

खेरीज खालसा दल हा एक पक्ष आहे. कॉंग्रेसचे अनुयायी असलेल्या, अगर तिच्या धोरणाशीं सहमत असलेल्या शिखांचा एक मोठा गट आहे तोच हा पक्ष होय! ह्या दोन गटाची नक्की सभासद संख्या अजमावता येत नाहीं. कारण जसजसें पंजाबचें भवितव्य बदलेल तसतसा बदल ह्या पक्षाच्या सभासदसंख्येंतहि होत असतो. ह्या दोन पक्षाच्या मध्यें 'चीफ खालसा दिवाण' पक्ष आहे. सदरहू पक्ष त्या दोन पक्षाहून जुना असून त्यात राष्ट्रीयवृत्तीच्या शिखांचा भरणा आहे. ह्या तीन पक्षानीं पूर्व पंजाब व पेप्सू भाग हें आपलें कार्यक्षेत्र ठरवून टाकलें आहे. पंजाबबाहेर पाहिले तर 'सेंट्रल शीख फेडरेशन' हें दिल्लीहून आपल्या कार्याचीं सूत्रें हलविताना दिसतें. शीख जमातीचें स्वतंत्र अस्तित्व अबाधित राखण्यासाठीं अकाली दलाचें कार्य चाललें आहे. शिखांना शिखिस्तान ही स्वतंत्र भूमि देण्यात यावी, तींत सरकारी कामकाजाची भाषा पंजाबी असावी—थोडक्यात पंजाबी सुभा मिळावा म्हणून अकाली दलानें खूपच गोंगाट करून मागणी केली होती. गुरुद्वार निवडणुकात शिरोमणि अकाली दलाने भराभर मते काबीज केली व शीख बहुजनसमाजावरील आपली निरपवाद पकड असल्याचें प्रत्ययास आणून दिलें.

भारत सरकारनें, पंजाब व पेप्सू ह्याच्या पुनर्रचनेबाबत योजना आखली असून ती रचना प्रांतिक दृष्टीनें व द्विभाषिकतेच्या दृष्टीनें व्हायची आहे. भारत सरकार व अकाली दल ह्यामध्यें दीर्घकाल खल होऊन त्यातून ही योजना अवतीर्ण झाली आहे. शिरोमणि अकाली दल, कॉंग्रेस, राष्ट्रीय वृत्तीचे शीख, 'चीफ खालसा दिवाण' आणि खालसा दल ह्या सर्वांनी आता तिला मान्यता दिली आहे. केवल-हिंदुत्ववादी अशा पक्षांनी सदर योजनेस तीव्र नापसंती दर्शविली असून तिला विरोध करण्याचा आपला विचार जाहीर केला आहे.

सेंट्रल अकाली दलानें, पंजाबमधून २ व पेप्सूमधून २ अशा ४ जागा लोकसभेमध्यें पटकावल्या आहेत. १९५२ च्या निवडणुकात, पेप्सू राज्य विधानसभेमध्यें, अकाली दलानें १९ जागा काबीज केल्या होत्या. नंतर १९५४ मध्यें हा आकडा १९ वरून १२ वर घसरला. पूर्व पंजाब विधानसभेमध्येंहि अकाली दलाच्या १३ जागा होत्या. बहुजनसमाजावर अकाली दलाचें चांगलेंच वजन—त्यातल्या त्यांत, त्या क्षेत्रांत हिंदु जमातवादी पक्षाचें जें कार्य चाललें होतें तें लक्षात घेतां—आहे, असें म्हणावें लागते. ती बाजू सरहद्दीची! तेथें वास्तविक हिंदु-शीख

संघटना चांगली मजबूत असायला हवी. तसें नसेल तर पंजाबांत नेहमींच कारस्थानें चालत राहातील, तग परिस्थिति तेथें सदांचच ठाणें देऊन बसेल आणि अशा रीतीनें, एकूण साखळींतला पंजाब हा दुवा खिळखिळा होऊन जाईल. सरकारनें जी योजना सुचविली आहे तिच्या अनुसार, शिखांना एक विशिष्ट बहुसंख्याक क्षेत्र प्राप्त होत असून तेहि तूर्त त्यावर संतुष्ट आहेत भावी काळात ह्या क्षेत्राचे कपाळीं काय काय लिहून ठेवलें असेल हे आज सांगणें कठीण आहे; कारण असे कीं भारताच्या भावी मांडणीसाठी, भारतसरकारनें जी प्रादेशिक स्थायी समितीची योजना सुचविली आहे ती महापंजाब आघाडीनें अमान्य केली आहे. सदरहू आघाडी हिंदु जमातवादी गटाची असून, 'प्रस्तुत योजनेनें जमातवादी विरोधास ऊत येईल व जमातभेदाचा प्रश्न चिघळला जाईल' हें कारण आपल्या विरोधाच्या समर्थनार्थ दिलें आहे जमातवादाच्या पायावर आधारलेल्या प्रदेशाची कल्पनाच मुळीं त्यांना अमान्य आहे.

शिखिस्तानच्या मागणीबराबरच्या, शीख जमातवादी पक्षाच्या ह्यानंतरच्या मागण्या पुढीलप्रमाणें आहेत—

१. अँग्लो इंडियनप्रमाणेंच शिखांनाहि भारतीय संसदेत पुरेसें वजन असायला पाहिजे.

२. उत्तर प्रदेश आणि दिल्ली येथें जीं स्थलान्तरें झालीं तीं विचारात घ्यायला हवीं. उत्तर प्रदेशामध्ये ५,००,००० व दिल्लींत सुमारें १,००,००० शीख आहेत.

३. जीं गुरुद्वारें पाकिस्तानात राहिलीं त्यांचा प्रश्न विचारात घेऊन भारत-सरकारनें पाकिस्तानाशीं विचारविनिमय. पाकिस्तानातल्या नानकसाहेब गुरुद्वाराचें व्हॅटिकन राजवाड्याप्रमाणें स्वतंत्र शहर बनविण्यांत आलें पाहिजे, तसेंच पाकिस्तानातील इतर गुरुद्वारांचा कारभार नानकसाहेब गुरुद्वार येथील धर्माधिकाऱ्याच्या विद्यमानें चालला पाहिजे.

४. सर्व शीख निर्वासितांची पंजाबात राहाण्याची सोय झाली पाहिजे. (शीखांच्या मतें त्यांच्या एकंदर संख्येपैकीं ४७ टक्के शीख, निर्वासित आहेत ) ह्यामुळें शिखांना भारतांत स्वतंत्र शीखभूमि प्राप्त होईल.

अलीकडेच एक मोठा मनोरंजक प्रकार घडून आला असून ह्या प्रकारामुळें जमातवादी पक्षाच्या कार्यपद्धतीवर चांगला प्रकाश पडत आहे. अकाली दलानें

भारत सरकारकडे एक मागणी केल्याचें उजेडांत आलें आहे. ती मागणी अशी कीं संरक्षण दलांतील शीख अधिकाऱ्यास कोणतीहि बढतीची जागा देताना आधीं ग्रंथीचा (शीख धर्मगुरूचा) विचार घेण्यात यावा आणि सदरहू शीख अधिकारी आपलीं नित्यनैमित्तिक धार्मिक कर्में करतात ह्याची आधी खात्री करून घ्यावी. ह्यावर, निधर्मी सरकारला जसें सक्तीचें धर्मांतर घडवून आणतां येत नाहीं, तद्वतच कोणत्याहि नागरिकास तू शीख धर्मांतच राहिलें पाहिजेस अशी सक्तीहि करतां येत नाहीं हें कारण दाखवून सरकारनें ही मागणी फेटाळली.

सरकारनें जीं लोकशाहीचीं व निधर्मी स्वरूपाचीं मूल्यें अंगीकारिलीं आहेत त्याच्यात जमातवादानें उलटापालट होऊन जात असते. मग तो जमातवाद हिंदु, शीख अगर आणखी एखादी जमात ह्यापैकीं कोणत्याहि जमातींतून निघालेला असो, सरकारनें जी लोकशाहीचीं व निधर्मी स्वरूपाचीं मूल्यें अंगीकारलीं आहेत त्याची त्यामुळें उलटापालट होऊन जात असते.

## नागा चळवळ

नागा चळवळ ही आज भारतीय राजनीतींतली आणखी एक चिघळलेली बाब होऊन बसली आहे. भारत व ब्रह्मदेश ह्या दोहोंमध्यें एक भलें मोठें मैदान पसरलें असून त्यात नागा राहतात. नागाच्या एकूण सुमारें तीस पोटजमाती किंवा वंश असून त्याच्या बोली, धार्मिक विधि व चालीरीती हीं भिन्न भिन्न आहेत. परंतु सर्वांमध्यें कांहींतरी एकत्वहि आहे व त्यामुळें त्यांनीं आपल्या आकांक्षाना कांहीं निश्चित असें वळण दिलेलें आहे. नागांच्या डोंगराळ मुलुखात ब्रिटिशाचा अमल बसल्यावर ख्रिस्ती मिशनरींनींहि तेथें कार्य सुरू केलें. तेथें झालेल्या ह्या परकीयाच्या वस्तीचा तद्देशीय समाजाच्या संस्कृतीवर व जीवनपद्धतीवर विविध प्रकारचा परिणाम होऊ लागला. ब्रिटिशाच्या काळातहि लोकाच्या असंतोषाचा परिणाम म्हणून नागाची उठावणी होत होतीच. ह्या उठावाचा रोख परकीय-सत्तेवर आहे.

सायमन कमिशन भारतांत आलें त्यावेळीं स्वतंत्र नागाभूमि राज्याची भाषा सुरू झाली. दुसऱ्या महायुद्धाचे वेळीं नागा लोक व त्याचे पुढारी झेपू फिझो ह्यानीं सुभाषचंद्राच्या आझाद हिंद सेनेस साह्य केलें आणि परकीय सत्तेच्या जोखडातून मुक्त होणें हें सर्व भारताचें जें उद्दिष्ट होतें त्याहून आपलेंहि ध्येय कांहीं भिन्न नाहीं

हें त्यानीं दाखवून दिलें. आझाद हिंद सेनेच्या उदाहरणावरून त्यास प्रचंड स्फूर्ति मिळाली. पाकिस्तानच्या जन्मानें त्याच्या आकांक्षास अधिक जोर चढला व हिंदुस्थान, ब्रह्मदेश व चीन ह्यांच्या सरहद्दीवरील सार्वभौम व स्वतंत्र नागाभूमि स्थापन करावी ही त्यास ईर्षा चढली. सरकारनें स्थापलेलीं २५ च्या ७५ वन्य जमात-मंडळें नागा नॅशनल कौन्सिलनें कबजात घेतलीं आणि अशा रीतीनें राज्ययंत्राचा एक बराच मोठा हिस्सा त्यानीं आपल्या नियंत्रणाखालीं आणिला. सत्तान्तर होऊन भारताच्या हातीं सत्ता आली तेव्हां भारत सरकार व यूनो ह्यांनीं नागाभूमीच्या सार्वभौम स्वातंत्र्यास मान्यता द्यावी अशी मागणी करण्यास नागा उद्युक्त झाले. १९५२ मध्यें विधिमंडळाच्या व आसाम कायदेमंडळाच्या निवडणुकांवर नागा नॅशनल कौन्सिलनें बहिष्कार घातला. नागा गिरिजनापैकीं एकानेंहि उमेदवारीचा अर्ज भरून दिला नाहीं.

नागांच्या स्वायत्ततेच्या प्राथमिक हक्क मान्य करण्यास आणि भारतीय संघराज्यात राहून, स्वतःच्या हवा तेवढा विकास साधून घेण्याची संधी त्यांना देण्यास भारत सरकार तयार होतेंच; भारत व ब्रह्मदेश ह्या दोन देशांच्या पंतप्रधानांनीं दोन देशांतील लगतच्या प्रदेशात जो दौरा काढला होता त्याचाहि हितावह परिणाम झाल्याशिवाय राहिला नव्हता. परंतु तो क्षणिकच! पुन्हा नागा जमात चळवळीस प्रवृत्त झाली आहे. संघराज्यापासून विभक्त असें स्वातंत्र्य थाटून राहाण्याची कल्पना म्हणजे निव्वळ मृगजळ आहे व त्याच्यामागें धावणें ही चूक आहे हें काहीं थोड्या नागांना कळून चुकलें आहे व तेव्हापासून नागा नॅशनल कौन्सिलचा रोख बदलल्यासारखा झाला आहे. परंतु ह्या नागांपैकीं काहींना देहान्त शासन देण्यात आलें. कौन्सिलच्या जहाल गटाच्या नागानीं ज्या लोकन्यायसभा उभारल्या होत्या त्याच्या विद्यमानें हें काम झालें.

जेथें कायदा व सुव्यवस्था हीं धोक्यांत आलीं आहेत तेथील भाग हा दंगलीचें क्षेत्र असल्याचें जाहीर करण्यात आलें असून तेथील कारभार लष्कर व पोलिस ह्यांनीं संयुक्तपणें हातीं घेतला आहे. ह्या कामांत त्यांना थोडेंफार यशहि येत आहे. नागांच्या मागण्यांचा सूर कांहीं नवा नाहीं. मुस्लिम लीगप्रभृति अल्पसंख्याक जमातवाद्या-सारख्याच त्यांच्या मागण्या आहेत. समाजातल्या कोणत्याहि गटानें उठावें व केवळ धर्म अगर संस्कृति एवढाच आधार घेऊन त्यावर राजकीय संघटना उभी करावी हा प्रकार अखेर स्वतःचेंच वेव्हारे माजवीत असणार आणि परिणामीं,

संबंध राष्ट्राच्या ऐक्यावर व एकसंधपणावर आघात करणार! राष्ट्रीयतेच्या व मानवतेच्या दृष्टीनें काहीं निष्ठा पाळावयाच्या असतात, त्याचें महत्त्व सर्वांत अधिक असतें. तसेंच, सर्वांना वाव देणारे असे काहीं हितसंबंध असतात परंतु असल्या जमातवादी संघटनांचा आरंभ आपल्या न्याय्य हक्कांचे संरक्षण व स्वतःचें संरक्षण ह्या हेतूनीं होत असला तरी अखेरीस त्या उपरिनिर्दिष्ट निष्ठा व हितसंबंध ह्यांची सपशेल गळेचेपी करीत नेतात.

## इंडियन ख्रिश्चन असोसिएशन्स

आपल्या जमातीसाठीं काहीं खास सवलती किंवा खास हक्क मागून घेऊन ते घटनेमध्यें पक्के रुजवून टाकण्याचा प्रकार करावयास भारतीय ख्रिश्चनांनीं नकार दिला; ह्यात त्यांनीं राजकीय दृष्ट्या मोठाच समजूतदारपणा दाखवला आहे. तसें पाहिलें तर, ख्रिस्ती समाज आणि इतर धर्मांचेहि अल्पसंख्याक, ह्यांना 'अल्प-संख्याक जमाती' ह्या नात्यानें, काहीं खास राजकीय सवलती देण्याची व्यवस्था, घटनेच्या कच्च्या मसुद्यात होतीहि. परंतु हिंदी ख्रिस्ती पुढाऱ्यांना आपल्या समाजासाठीं खास संरक्षण नकोच होतें ह्या बाबतींत त्यांनी पुढाकार घेतला व त्याचेंच अनुकरण इतर कांही जमातींनीं केलें. 'बहुसंख्याक जमातींच्या भलाई-वर व समंजसपणावर पूर्ण भरवसा टाकणें व धर्मनिरपेक्ष लोकशाही स्वरूपाच्या राजकीय पक्षाच्या खांद्यास खांदा भिडवून एकदिलानें कार्य करीत राहाणें हेंच अल्पसंख्याकांच्या भवितव्याच्या दृष्टीनें इष्ट आहे', हें सत्य सर्वश्रेष्ठ होय आणि तें ध्यानात घेऊन, त्यास ख्रिस्ती समाजानें मान्यता दिली हें ठीकच केलें.

मात्र, आजच्या हिंदी ख्रिस्ती समाजकारणात एक दुःखदायक घटना दिसून येत आहे. ब्रिटिशांच्या काळांत इंडियन ख्रिश्चन असोसिएशन्स ह्या नावाच्या संघटना होत्या. ह्यांच्या स्थापनेमागील मुख्य हेतु असा होता कीं जमातीची राजकीयदृष्ट्या जागृति करावी आणि ह्या चळवळी राष्ट्रीय चळवळीच्या शेजारी नेऊन उभ्या कराव्या. त्या काळीं जमातवादी दृष्टिकोन ठेवून आपले उमेदवार उभे करण्याचें तत्त्व सर्वमान्य होतें. परंतु अशाहि काळात त्यांनी ह्या तत्त्वाशीं झगडाच केला आणि ख्रिस्ती उमेदवारांच्या निवडणुकात राष्ट्रीय वृत्ति बाणविण्याचे कामीं साह्य केलें. त्या झगड्याच्या काळात राष्ट्रीय पुढारीहि ह्या असोसिएशन्सची पाठ थोपटल्यावाचून राहिले नाहींत.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ह्या असोसिएशन्सच्या अस्तित्वाची आवश्यकताच उरली नाहीं कारण आता जमातीचा खास मतदारसंघच अस्तित्वात नव्हता. सध्या ह्या असोसिएशन्सचें कार्य वस्तुतः स्थगितच झालेलें आहे. अलीकडे आर. एस. एस.सारख्या इतर जमातवादी पक्षाचें आव्हान, कॉंग्रेसमध्यें असलेलें हिंदूचें प्रचंड बहुसंख्यत्व आणि आजकाल चालू असलेला ख्रिस्तीमिशनविरोधी प्रचार ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं, इंडियन ख्रिश्चन असोसिएशन्सचें पुनरुज्जीवन करावें आणि ख्रिस्ती समाजाच्या राजकीय व धार्मिक हक्काच्या संरक्षणार्थ चळवळी करून त्यास पुढाकार घेण्याचें कार्य त्याजकडून करून घ्यावें असें ख्रिश्चन नेत्यांपैकीं काहींना वाटू लागलें आहे. जरा व्यापक दृष्टिकोनातून जर पाहिलें, तसेंच, खुद्द ख्रिस्ती समाजाच्या खऱ्या हिताच्या दृष्टीनेहि जर विचार केला तर ह्या हालचालींस विरोध करणेंच इष्ट होय असें दिसून येईल. ह्या जमातवादी संघटनाची पुनर्जागृति केल्यानें ख्रिस्ती समाजाच्या हितास बाधच येणार आहे. नागरिकाची जात, पंथ, वंश ही कोणतीहि असोत, आधी त्याच्या मूलभूत हक्कांचें संरक्षण व्हायला हवें ! तें करायचें असेल तर त्यास सर्वोत्तम मार्ग हाच कीं असेंच मत असलेल्या निधर्मी पक्षाच्या कार्याशीं आकांक्षाशीं एकजीव होऊन जावें; ह्या मार्गात येणाऱ्या अडथळ्यातून आणि प्राथमिक अडचणींतून वाट काढताना कितीहि कष्ट पडले तरी त्यास जुमानू नये. ख्रिश्चन समाजाची श्रद्धा वास्तविक पहाता ही अशी आहे. तेव्हा वर सांगितल्याप्रमाणें जमातवादाचें पुनरुज्जीवन करणें म्हणजे ह्या श्रद्धेशीं बेईमान होणें नव्हे काय ? वास्तविक पाहता, ख्रिस्ती समाजानें ह्या जो भरवसा आपल्या बांधवावर टाकला तो अस्थानीं नव्हता. संसदेत आलेल्या 'इंडियन कॉन्व्हर्ट बिल'चें स्वागत ज्या प्रकारें झालें त्यावरून ही गोष्ट चांगली प्रत्ययास येत आहे.

त्रावणकोर-कोचीनच्या ख्रिश्चन लोकांतील काहीं गटांच्या विचारसरणींत एक विशिष्ट दृष्टि आढळून येते तेथील लोकसंख्येपैकीं ⅓ लोकसंख्या ख्रिश्चनाची असून हे लोक चांगलेच सुधारलेले व राजकीय दृष्ट्या जागरूक असे आहेत. राज्यातील धर्मनिरपेक्ष राजकीय पक्षास त्यांनीं पाठिंबा दिला आहे खरा; परंतु तो काहीं धोरणें सांभाळूनच ! तेथील ख्रिश्चन समाजाच्या, 'केवळ सांस्कृतिक कार्य करणाऱ्या' आणि 'राजकारणापासून अलिप्त' असे स्वतःस म्हणविणाऱ्या काहीं संघटना आहेत त्यांना समाजाचे प्रतिनिधि म्हणता येईल. त्यांपैकीं कित्येक

निवडणुकांच्या आधी कॉंग्रेसशी व इतर पक्षांशी राजकीय सख्य करून टाकतात व ह्या पक्षांनीं अधिकृत उमेदवार म्हणून आपल्याच उमेदवाराची निवड करावी असा आग्रह धरतात. अर्थात् असले प्रकार केवळ ख्रिश्चन समाजानेंच केले आहेत असे मुळींच नाहीं, तरीपण परिणामीं, देशातील राष्ट्रीय संघटनाच्या शुद्धतेस ह्या प्रकारानी बराचसा बाध आणला आहे हें मात्र खरें ! राज्याला आज कुप्रसिद्ध अशी जी डळमळीत अवस्था प्राप्त झाली आहे तिचें मूळ कारण, कदाचित्, राजकीय पक्षानीं जमातवादी संघटनांशीं केलेल्या सगनमतामध्येंहि सापडू शकेल.

आजच्या राजकारणाच्या संदर्भात तसेंच आपलें धार्मिक स्वातंत्र्य आणि नागरिकत्वाचे हक्क ह्याबाबत अल्पसंख्याकास विशेष भय पडलें असता नागरिकत्व संरक्षण-संघटनाची (सिव्हिल लिबर्टी यूनियन्सची) आवश्यकता असते. घटनेनें नागरिकाना ज्या मूलभूत हक्काबाबत आश्वासन दिलें आहे त्याचें संरक्षण सिव्हिल लिबर्टी यूनियनने करावें अशी अपेक्षा असते. जागृत झालेल्या ख्रिश्चनांनीं आपल्या इतर बंधूंच्या बरोबरीनें ह्या कार्यांत पुढाकार घ्यायला पाहिजे अल्पसंख्याकांनीं, मूलभूत मानवी हक्कापलीकडल्या हक्काची मागणी करूं नये, त्यांची प्राप्ति, संरक्षण हीं करण्याच्या कामीं धर्मनिरपेक्ष अशा शक्ति हींच सर्वोत्तम साधनें होत असें ख्रिस्ती पुढाऱ्यांनीं नेहमींच आवर्जून सांगितले आहे. राजकारणाकडे पाहाण्याचा हा दृष्टिकोन यथायोग्य असाच असून आताच तो सोडून देण्याचें अजिबात कारण नाहीं.

## मूल्यमापन

जमातवादी पक्ष व त्याचे कार्यक्रम ह्याची चर्चा केल्यावर जे चित्र पुढें येतें त्यात एका दृष्टीनें परस्परविरोधित्व दिसतें आणि त्यामुळें मनुष्य बुचकळ्यांत पडतो. एका बाजूस निधर्मी राज्याच्या बरोबर विरोधी स्वरूपाचा असा उच्चवर्णीय-हिंदुपक्ष हिंदुराष्ट्रवादाचे दृष्टीनें जास्तींत जास्त मागण्या करताना आढळतो, तर त्याच वेळीं दुसरीकडे सवर्ण हिंदु बहुसंख्याकाचें पारडें जड होईल असें उघड उघड भय वाटत असलेल्या शीख संघटना व द्रविड काजगम स्वतःसाठीं खास स्वतंत्र भूमीची स्थापना करण्याच्या प्रयत्नात असलेल्या दिसतात. वर्गीकृत जमातींना जातीयतेचें व जातिश्रेष्ठत्वाचें जें सदैव भय वाटत असतें त्यांतूनच मुख्यत्वें,

डो. का. फे. अवतीर्ण झाली. कोणत्याहि जातीय पक्षाचा विकास अखेर कोणत्या वळणावर जातो हें मुस्लिम लीगवरून दिसून येतें. "इतर जमातींबाबतच्या वैरभावनेस" "आळा घालण्याकरिता" मुळात मुस्लिम लीगचा जन्म झाला पण आज हीच बाब तिचें आधारभूत तत्त्व होऊन बसली आहे मुस्लिम लीगचा अवशिष्ट भाग, त्याचा जोर कमी झाला असला तरी अद्यापहि मुस्लिम जमातींसाठी खास, वेगळ्या हक्काचा दावा सांगण्यासाठीं व जमातीच्या हक्कसंरक्षणासाठीं जरा कमी जोमानें का होईना पण चळवळही करताना दिसतो आहेच. ह्या जमातवादी व पंथवादी पक्षाच्या हातात जर देशाचीं सूत्रें गेलीं तर त्याची कळाच पालटून जाईल. परस्परास दूर दूर राखणाऱ्या, परस्पराशीं अधिकाधिक संशयी वृत्तीनें वागून झगडत राहाणाऱ्या वेगवेगळ्या समाजाची, तो भट्टीच बनून जाईल; आणि ह्या बनावात, एवढ्या कष्टानें साध्य झालेली गोष्ट जी देशाची एकता, ती भारत देश गमावून बसेल. कसेंही करून जिचे अस्तित्व टिकवलेंच पाहिजे अशी सर्वात मोलवान् गोष्ट देशात आज घटकेस कोणती असेल, तर ती राष्ट्राची एकता, त्याचा एकसंघपणा, त्याचा एकजिनसीपणा हीच होय! परंतु ज्या मनोवृत्तीमुळें एके काळी देशास रसातळास नेण्याची पाळी आणली होती त्याच गोष्टीचें पुनरुज्जीवन आज हिंदु जमातवादी संस्था करीत आहेत आणि त्यांचेवर झगझगीत टीका करताना, नेहरूंनीं ह्याच कारणास्तव त्यास दोष दिला होता. आर्थिक दृष्टया भारताची पुन्हा उभारणी करावयाची आहें. त्यासाठीं भारतात सर्वात मोठी गरज आज ऐक्याची आहे व म्हणून जातीयता व जमातवाद ह्याचा धिक्कारच केला पाहिजे. स्वतःलाच सर्वश्रेष्ठ मानणाऱ्या जातीपोटजातींत हिंदु समाज विभागला गेलेला आहे, तशात त्यात बराचसा मोठा असा अस्पृश्य समाज आहे. अशा परिस्थितींत हिंदुराष्ट्राची गर्जना करण्यांत काय हशील? ह्या गर्जनामुळें हिंदु समाजातील वेगवेगळ्या थरात अधिक भेद माजण्याचाच काय तो संभव आहे. ह्या गर्जनामुळें देशात पुनश्च "बखेडे, हालअपेष्टा व विस्कळितपणा" माजण्यापलीकडे काही कार्य व्हायचे नाही.

राष्ट्रांत ८० टक्के लोकसंख्या हिंदु समाजाची आहे, देशाच्या भवितव्यास वळण लावण्याचें कार्मी, ह्याच समाजास, महत्त्वाचा वाटा उचलावा लागणार आहे. हा वाटा उचलण्याचें हें कार्य थोर आहे तसेंच इतिहासाच्या परंपरेस

धरून आहे. "आज हिंदु समाज म्हणजे एक विस्कळित ढीग होऊन पडला आहे. सामाजिकदृष्ट्या त्यात अनेक गट असले तरी अमुक गटाचें अमुक वैशिष्ट्य, ह्याप्रमाणें गटवार वैशिष्ट्यें ठामपणें सांगणें केवळ अशक्य आहे. वर सांगितलेलें कार्य करावयाचें हिंदु समाजानें आधीं आपला कायापालट घडवून आणला पाहिजे." "पाश्चात्य विचारप्रणालीशी आलेला संबंध, गांधीजींचें नेतृत्व, धर्मनिरपेक्ष शिक्षण आणि अनेक अंधश्रद्धांचा बीमोड ह्यामुळें हिंदु समाजात नव्या गरजा, नव्या क्षुधा निर्माण झाल्या आहेत. अशा संधीस, समाजाची दु:स्थिति दूर करण्यासाठीं आवश्यक ते सुधारणापर असे कार्यक्षम कायदे करणें जरूर आहे. सारें जगच झपाट्यानें बदलत चाललें असतांना एकट्या हिंदु समाजानेंच पूर्वकालीन सुवर्णयुगाच्या चित्रामध्यें मशगूल होऊन, परिणामीं स्थाणु बनून कसें चालेल? बहुजनसमाज आज जागृत झाला आहे त्याला अगदीं नव्या क्रांतिकारक वळणाचे नवसमाजरचनेचे कायदे आवश्यक आहेत, परंतु ह्याच गोष्टीस हिंदु जमातवादी पक्षाचा विरोध आहे त्यांचा कार्यक्रम अर्धसरंजामशाही कल्पनांवर व खाजगी भांडवली धंद्यास सरकारी नियंत्रणाचा पायबंद न घालण्याच्या कल्पनांवर आधारलेला आहे. त्यामुळें, राष्ट्राचा विश्वास संपादन करण्याचा हक्क ते पक्ष गमावून बसले आहेत. भारताची घटना तसेंच त्याची धर्मनिरपेक्ष राज्याची कल्पना ह्यांना ह्या पक्षांचा विरोध आहे, ह्या विरोधामुळें, तसेंच ह्यातून ओघानेंच निघणाऱ्या इतर गोष्टींमुळें, जमातवादी पक्षाकडून देशाच्या अधिक मोलवान् परंपरेस हरताळ फासला जात आहे असेंच म्हटलें पाहिजे, कारण घटना ही मानवी पावित्र्याच्या कल्पनेवर आधारलेली आहे; आणि ही कल्पनाहि युगानुयुगें भारतीय विचार-प्रणालींत पक्की रुजलेली आहे. पाकिस्तानविरोधी जबरदस्त उपाययोजना करून देशाला पहिल्या प्रतीची लष्करी सत्ता बनविण्याच्या धोरणाची त्यांनीं घोषणा केलेली आहे, परंतु भारतानें हिंदी राष्ट्राच्या संस्कृतीस साजेसें जें परराष्ट्रीय धोरण आखलें आहे, जगातील सर्व शांतिप्रिय राष्ट्रं ज्या धोरणाची आज वाहवा करीत आहेत त्या धोरणालाच, वरील घोषणा धाब्यावर बसवीत आहे. खेरीज त्यांनीं पुरस्कृत केलेल्या जमातवादामुळें, देशातली अद्याप बाल्यावस्थेत असलेली लोकशाही, आणि देशाचें आर्थिक धोरण ह्यांचा विकास होणें दुर्घट होईल.

जमातवाद्यांनीं देशावर ओढवून घेतलेल्या अनर्थांबाबत बोलतांना, पंतप्रधान

नेहरूनीं नुकतेच पुढील उद्गार काढले आहेत : "ही युक्ति धोक्याची आहे. हिचा अवलंब करणें, आपणांत बेकी माजवणें आणि एवढ्या कष्टानें मिळविलेलें स्वातंत्र्य पुन्हा गमावून बसणें होय. आपण ह्या युक्तीच्या वापरापासून दूरच राहू या. भारतीयानें ही सावधगिरीची सूचनाच मानायला हवी." आम्हीहि ह्या शब्दास दुजोराच देतों. जनतेनें राष्ट्राच्या राजकीय जीवनांत जमातवादी पक्षास थारा देण्याचें साफ नाकारायला हवें

# ६

# साम्यवादि कम्युनिस्ट पक्ष

## ऐतिहासिक पार्श्वभूमि

आजच्या अनेक प्रमुख पक्षाप्रमाणें साम्यवादीहि आरंभींचीं कांहीं वर्षे कॉंग्रेसशीं निगडित झालेले होते. राष्ट्रीय चळवळींत, तरुण व अधिक बंडखोर वृत्तीचा एक गट होता. रशियांतील मजूर वर्गानें केलेल्या क्रांतीच्या यशाची छाप पडून अनेक जण मार्क्सवादी बनले. ह्याच गटांतून समाजवादी व साम्यवादी पक्ष निघाले आणि त्यांच्या वजनामुळेंच १९३१ च्या कॉंग्रेसनें आपल्या उद्दिष्टांमध्यें आर्थिक लोकशाहीचें तत्त्व अंतर्भूत केलें.

भारतीय साम्यवादी पक्ष उदयास आला तेव्हापासून, आंतरराष्ट्रीय साम्यवादाच्या विकासाच्या अनुरोधानेंच त्यांचीं धोरणें ठरत गेलीं आहेत. १९३९ मध्ये महायुद्ध सुरू झालें तेव्हा साऱ्या जगातल्या साम्यवादी पक्षांनीं त्याचेंवर साम्राज्यशाही युद्ध असा शेरा मारला तेव्हां भारतीय साम्यवाद्यांनींहि त्याची री ओढली हे ह्याचेंच निदर्शक आहे. १९३६ पासून त्यांनीं समाजवाद्यांचे बरोबर संयुक्त आघाडी बनविली होती. ती सोडून ते ह्याच काळीं वेगळे झाले आणि जाता जातां दक्षिणेकडील साराच्या सारा समाजवादी गट आपणाबरोबर घेऊन गेले.

१९४१ मध्यें रशियानें महायुद्धात प्रवेश केल्यावर तेंच युद्ध आतां लोकयुद्ध ठरलें आणि ज्या काळात कॉंग्रेस युद्धविषयक प्रयत्नांना विरोध करण्याच्या मार्गावर होती त्याच काळात साम्यवादी गट त्यांना जोरदार पाठिंबा देण्यास पुढें झाला होता. ह्याच काळात सरकारनें चळवळींत साम्यवादी पक्षावरील बंदी उठविली. १९४२ च्या चलेजाव चळवळींत, कॉंग्रेसचे नेते अटकेंत असतांना, जनमनावर कॉंग्रेसचा जो प्रभाव होता त्याला शह म्हणून सरकारनें साम्यवाद्यांच्या कार्यास प्रोत्साहन देण्यास आरंभ केला. युद्धकाळातहि साम्यवादी पक्ष हा एकच

मोठा असा पक्ष होता कीं ज्याचा एकहि पुढारी तेव्हा अटकेंत नसेल. साम्यवाद्यांनींहि ह्या संधीचा भरपूर फायदा घेतला. जुलै १९४२ मध्यें ह्या पक्षाची सभासदसंख्या ४००० होती ती १९४६ च्या उन्हाळ्यापर्यंत ५५,००० वर गेली.

१९४५ मध्यें मुक्त झाल्यावर कॉंग्रेसनेते, कम्युनिस्टांवर देशद्रोही असा शिक्का मारून, त्यांना कॉंग्रेसमधून काढून टाकण्याच्या प्रयत्नास लागले. मात्र प्रत्यक्ष काढून दिले जाण्याच्या आधीं ते स्वतःच राजीनामे देऊन मोकळे झाले. साम्यवादी पक्षानें १९४६ च्या निवडणुका लढविल्या, परंतु त्यात त्यांना फारसे यश आलें नाहीं.

आता कम्युनिस्ट पक्षात ध्येयाबाबत झगडे सुरू झाले. पक्षाच्या क्रांतिवादी कार्यक्रम पुढें आणण्यास जोशी गट विरोध करीत होता. कारण त्यांच्या मतें भारताची अद्याप समाजवाद स्वीकारण्याइतपत तयारी झालेली नव्हती. रणदिवे व त्यांचे अनुयायी ह्यांस हें अमान्य असून, हिंसात्मक चळवळीचें लढाऊ धोरण स्वीकारलें पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. देशाची फाळणी व स्वातंत्र्यप्राप्ति ह्यामुळें जोशींच्या धोरणाचा कांहीं काळ स्वीकार केला गेलाहि. इकडे शेतकरी व मजूर ह्या वर्गांवर साम्यवादी पक्षाचें वजन वाढत होतेंच साम्यवादी पक्ष 'ऑल इंडिया ट्रेड युनियन' चीं सूत्रें हलवीत होताच आणि अशा रीतीनें पक्षाच्या धोरणाबाबतचा प्रश्न पुन्हा पुढें येऊन ठाकला. त्याहूनहि महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्व जगाचेच दोन परस्परविरोधी गट पडले आहेत हा सोविएतचा आग्रहाचा दावा! अमेरिका व ब्रिटन ह्यांचा साम्राज्यवाद, हें एक आणि सोवियत संघाची 'लोकशाही' हें दुसरें, अशीं हीं ह्या दोन गटांचीं दोन शिबिरें! बरीचशी चर्चा व विचारविनिमय झाल्यानंतर, १९४८ त भरलेल्या दुसऱ्या कम्युनिस्ट कॉंग्रेसनें जोशी व त्यांचें मवाळ धोरण ह्यावर ठपका ठेवला. रणदिवे हे पक्षाचे चिटणीस बनले आणि जोशींना केंद्रीय समितींतहि स्थान राहिलें नाहीं.

जुलै १९४८ मध्यें प्रसिद्ध झालेल्या राजकीय प्रबंधात कम्युनिस्ट पक्षाचें धोरण बारकाईनें मांडलेलें आहे. साम्यवादी पक्षाच्या नेतृत्वाखाली नवी लोकशाही वळणाची आघाडी उभी करावी अशी त्यात शिफारस केली होती. ह्या आघाडीनें जनतेत तातडतीव्र क्रांति करण्यासाठीं सर्व प्रकारचे प्रयत्न करावयाचे होते. ह्याच दृष्टीनें, विशेषतः तेलंगण व हैदराबाद येथें दहशतवादाचें युग सुरु झालें होतें. ह्या दांडग्या वृत्तीस उत्तरहि तसल्याच तऱ्हेनें मिळालें केंद्रीय सरकारने

अनेक पुढाऱ्यांस अटक केली व अनेक राज्यामधून साम्यवादी पक्षावर बंदी घालण्यात आली. तेलंगणात करण्यात आलेल्या लष्करी कारवाईमुळें साम्यवाद्यांनीं जंगलाचा आश्रय केला. जनमनाची सहानुभूति साम्यवादी पक्ष गमावून बसला. कॉंग्रेसनें सुरू केलेल्या इंडियन नॅशनल ट्रेड कॉंग्रेस 'मुळें आणि समाजवाद्यांच्या हिंद मजदूर सभेमुळें, साम्यवाद्यांची मजूर संघटनांवरील पकड बरीचशी ढिली पडली.

साम्यवादी पक्षाचें ग्रहमान असे खालावलें असतां चीनमधून नवीन आशेचा किरण आला. तेथें साम्यवाद्यांच्या विजयामुळें लोकराज्याची स्थापना झाली होती. चीनचें भारताशीं बऱ्याच दृष्टींनीं साम्य आहे; दोन्ही देशांत जमिनीचे मालक व कसणारीं कुळें ह्यांच्या अन्योन्यसंबंधावर आधारलेली शेतकीपद्धति असून, दोहोंतहि औद्योगीकरण होण्याचीं पूर्वचिन्हें दिसत होतीं.

बऱ्याच भारतीय साम्यवाद्यांच्या विचारसरणीवर चीनमधील घटनांचा खूप परिणाम झाला होता आणि म्हणून, साम्यवादी पक्षाच्या आंध्र सचिवालयानें भारतीय परिस्थितीचें विश्लेषण प्रसिद्ध केलें होतें त्यांत मजूर गटास रोखठोक सवाल केला होता कीं, किसानांवर झोटिंगशाही गाजविण्याचा—त्यातल्या त्यांत ह्या क्रांतीच्या आरंभकाळांत हे प्रकार करण्याचा—तुम्हाला काय अधिकार? चीनमध्यें आलेल्या अनुभवाचा दाखला देऊन त्यांनीं अशी शिफारस केली होती कीं, सशस्त्र झगड्याचें रूप बदलणारें धोरण आखावें; सरजामशाही व मोठाले उद्योगधंदे ह्यांच्याशीं झगडा करताना सुखवस्तु किसान आणि मध्यम बूर्ज्वा वर्ग ह्यांचेशीं सहकार्य करण्याची मुभा असावी. 'पोलिट ब्यूरो'नें मात्र 'हा अगदीं नागडाउघडा व रासवट स्वरूपाचा मार्ग झाला' असा शिक्का मारून ही सूचना फेटाळून लावली. परंतु हा प्रकार म्हणजे अखेरचा शब्द ठरणार नव्हता. १९५० च्या जानेवारींत कॉमिन्फार्मनें भारतास चीनच्या मार्गाची शिफारस केली, आणि रणदिव्यांनीहि हा नवीन मार्ग चोखाळण्याची पराकाष्ठा केली. परंतु रणदिव्यांनीं राजीनामा दिलाच पाहिजे असा हट्ट धरला जाऊन, त्यांच्या जागेवर आंध्रचे राजेश्वर राव आले. परंतु रावांनाहि ऑक्टोबर १९५१ मध्यें दूर करण्यात आलें आणि अजय घोष ह्यांना सरचिटणिशीचीं वस्त्रें देण्यात आलीं.

नंतर साम्यवादी पक्षानें १९५१–५२ च्या निवडणुकांची तयारी आरंभिली. ह्या मतदानांत कॉंग्रेसची पाळेमुळें खणून काढायचीं हा विचार आरंभापासून

त्यानें उघड करून ठेवला होता. उदाहरणार्थ, निवडणुकीच्या जाहीरनाम्याचे शेवटीं पुढील घोषणा दिलेली होती—

—कॉंग्रेसचा धुव्वा उडवायला,

—जनतेच्या उमेद्वारास विजय मिळवून द्यायला,

—जनतेचे राज्य स्थापन करायला

—मतदान केंद्राकडे चला !

निवडणुकाच्या वेळचीं प्रत्यक्ष आश्वासनें तसेंच पुढील कार्यक्रम ह्यांना काहीं-एक महत्व नव्हतें. जनतेस हितावह ठरणारा कोणताहि कार्यक्रम एवढ्यांतच, पक्षाच्या निवडणूक-जाहीरनाम्याचें सार येऊन गेलें होतें.

कॉंग्रेस सरकारचा पराभव एवढें एकच उद्दिष्ट पुढें ठेवून, साम्यवादी पक्ष ह्या 'लोकहिता'च्या कार्यक्रमास सहकारी हुडकून काढण्यासाठीं हिंडूं लागला. हे सहकारी मिळवण्यांतहि त्यानी काहीं निश्चित धोरण असें ठेवलेंच नव्हतें आपल्या स्वतःच्या कार्यक्रमातील बाबींनाहि ह्यासाठीं थोडीफार मुरड घालायची त्याची तयारी होती. वेगवेगळ्या पक्षांशीं हातमिळवणी करतांना, वर सांगितलेल्या हेतूखेरीज, दुसरें कोणतेंहि ठाम स्वरूपाचें असें धोरण समोर ठेवलेलें नव्हतें. 'किसान-मजदूर पार्टी', सारख्या गांधीवादी पक्षापासून तहत 'फॉरवर्ड ब्लॉक'सारख्या कट्टर मार्क्सवाद्यापर्यंत, आणि द्राविड काझगमसारख्या जमातवादी पक्षापासून थेट 'केरळ-सोशालिस्ट पार्टी'सारख्या स्थानिक पक्षापर्यंत, भेटेल त्या पक्षाशीं साम्यवाद्यांनीं हातमिळवणी केली होती. निवडणुकाच्या काळात व त्यानंतरहि, संयुक्त आघाडीच्या कल्पना हेंच साम्यवादी पक्षाचें मुख्य धोरण होतें

निवडणुकामध्यें साम्यवाद्यानीं लोकसभेच्या ४८९ जागापैकीं २६ जागा पटकावल्या व राज्याच्या ३,२८० पैकीं १७३ पटकावल्या; त्यामुळें संसदेंत आणि मद्रास, हैदराबाद, पश्चिम बंगाल व त्रावणकोर-कोचीन ह्या राज्यात साम्यवाद्यांचा, मुख्य विरोधी पक्ष ह्या नात्यानें अवतार घडला. परंतु एकूण मतदानाची शेकडेवारी पाहाता साम्यवाद्यांना समाजवाद्यांपेक्षा कमी व 'किसान मजदूर पार्टी'च्या साधारणतः बरोबरीनें मतें पडल्याचें दिसून येतें.

## १९५१-५२ च्या निवडणुका

निवडणुकाचे वेळीं साम्यवाद्यानीं असा सिद्धान्त मांडला कीं कॉंग्रेस उलथून

पाडणें ही एक राष्ट्रीय गरज आहे व त्यासाठीं सर्व लोकशाहीवाद्यांनीं एक झालें पाहिजे. ह्याच आधारावर संयुक्त लोकशाही आघाडीची (UDF ची) उभारणी झाली होती. साम्यवाद्यांनीं एक कमींत कमी कलमांचा कार्यक्रम आखला असून, कोणत्याहि प्रगतिशील पक्षास तो पटलाच पाहिजे असा त्यांचा दावा होता. तो कार्यक्रम जवळ ठेवून साम्यवादी पक्षानें इतर पक्षांशीं बोलणीं सुरू केली. निवडणुकींत तिरंगी लढे होऊं नयेत म्हणून सदरहू कार्यक्रमाच्या आधारावर सहकार्याचे तहनामे करण्यात आले. कॉंग्रेसविरुद्ध नकारी हाच ज्याचा मुख्य मुद्दा आहे—ह्याचें उत्तम उदाहरण म्हणजे किसान-मजदूर-पार्टी (KMP)—असे अनेक पक्ष असून त्याचेमुळेच साम्यवादी पक्षास जागजागीं कॉंग्रेसविरुद्ध आघाड्या उभारतां आल्या. ज्या राज्यामध्यें कॉंग्रेसला संपूर्णपणे बहुमत मिळविणें अशक्य झालें आणि डाव्या गटांशीं एकोपा करून सरकार हातात घेण्याची शक्यता दिसली त्या त्या राज्यात, सरकारें बनविण्याच्या प्रयत्नात, साम्यवादी पक्षानें हेंच तंत्र अवलंबिलें. मद्रास हें ह्या धोरणाचें उत्तम उदाहरण होय. मद्रासेंत एकूण ३७५ पैकीं १५२ जागा कॉंग्रेसने पटकावल्या. साम्यवाद्यांना ६२ जागा मिळाल्या; व किसान मजदूर-पार्टीस ३५ आणि रंगाच्या कृषिकर लोक पार्टीस १५ अशा जागा मिळाल्या. ह्याखेरीज आणखीं एकदोन स्थानिक जमातवादी पक्षाच्या थोड्याशा जागा असून, ६० स्वतंत्र उमेदवार होते. साम्यवाद्याच्या तोंडच्या स्तुतीस व त्यांनीं दिलेल्या आश्वासनांना बळी पडून टी. प्रकाशम् ह्यांनीं त्यांना पाठबळ दिलें होतें; त्याच्या जोरावर "प्रतिगामी कॉंग्रेसची जागा घेण्यासाठीं, प्रगतिशील आमदारांची एकजूट" बनविण्याचा साम्यवाद्यांनीं प्रयत्न केला होता. अशा रीतीनें सत्ता हातीं घेण्यासाठीं कोणत्याहि थरास जाण्याची साम्यवाद्यांची तयारी होती. "राज्याच्या मंत्रिमंडळातील कांहीं जागा—मुख्य मंत्रिपदहि नव्हे—हव्या," एवढीच साम्यवाद्याची मागणी होती. आणि सदरहू संयुक्त लोकशाही आघाडी सत्तारूढ होण्याचा रंगहि दिसत होता. परंतु आणिकहि कांहीं डावपेचामुळें हें अशक्य झालें. ह्या पेचपवित्र्याचें येथें गुणदोषविवेचन करीत बसण्याचें कारण नाहीं; ह्या व असल्या आघाड्यांचें पुढें काय झालें हा प्रश्न तेवढा महत्त्वाचा आहे.

मद्रासेंत ही आघाडी फक्त कांहीं महिन्यापुरतीच टिकली. संयुक्त-कॉंग्रेस-विरोधी पक्ष ही भूमिका बटविणें तिला जमले नाहीं. मुख्य मंत्री राजाजी ह्यांनीं संयुक्त-कॉंग्रेस विरोधी आघाडीकडे साफ दुर्लक्ष करून, साम्यवाद्यानाच आपले कट्टे

शत्रु म्हणून वेगळें काढलें होतें आणि त्याच्यावर हल्ले चढविले होते. त्यांनीं स्वीकारलेल्या धोरणामुळेच बहुधा वरील प्रकार घडला असावा. परंतु लौकरच साम्यवाद्यांची हुकुमशाही आणि त्याच्या कावेबाज धोरणाचें स्वरूप टी. प्रकाशम आणि टी. विश्वनाथन् ह्यांच्या ध्यानांत येऊन चुकलें आणि प्रस्तुत आघाडी अकालीं खरी, परंतु स्वाभाविकपणेंच नामशेष होऊन गेली.

त्रावणकोर–कोचीनमध्यें साम्यवादी, क्रांतिवादी समाजवादी, आणि केरळ समाजवादी ह्यांची संयुक्त डावी आघाडी निवडणुकींआधीं उभारण्यात आली. निवडणुकीनंतर ह्या आघाडीनें समाजवाद्यांच्या साहाय्यानें डावें मंत्रिमंडळ बनविण्याचा प्रयत्न केला, परंतु तो फसला. केरळ समाजवादी पक्षाच्या चिटणिसानें साम्यवाद्यांवर उघड आरोप केला कीं, तुम्ही आपल्या आघाडीचा सर्वाधिकार स्वतःच बळकावून बसण्याचा प्रयत्न करीत आहां. मंत्रिमंडळ बनविण्यासाठीं साम्यवाद्यांनीं जे अखेरचे प्रयत्न केले त्यांतच ते उजव्या गटांतल्या व्यक्तींना व प्रतिक्रियावादी गटांना आपणाकडे वळविण्याचे कारभारहि करीत होते; व ह्याच कारणास्तव, समाजवादी पक्षाच्या चिटणिसापाठोपाठ RSP चे नेते श्रीकांत नायर ह्यांनीहि साम्यवाद्यांचा धिक्कार केला. खुद्द आघाडीचा कमींत कमी कलमांचा कार्यक्रमसुद्धा, कॉंग्रेसच्या कार्यक्रमाच्या मानानें, फारच कमी प्रगतिशील असल्याचेंहि त्यांनीं दाखवून दिलें.

हैदराबादेत जनता लोकशाहीवादी आघाडी उभारण्याचे कामीं साम्यवाद्यांना यश आलें. परंतु एका वर्षाच्या आंतच, तिचे नेते एन. एम. जयसूर्य ह्यांनीं, "स्वतःच्या पक्षाच्या ध्येयाचा पाठपुरावा करण्यासाठीं तुम्ही ही आघाडी राबवून घेत आहां," असा साम्यवाद्यांवर आरोप केला.

भिन्न भिन्न पक्षाच्या मिळून संयुक्त आघाड्या उभारण्याचा प्रयोग अशा रीतीनें संपुष्टात आला. अलीकडेच, लोकशाहीवादी आघाडी ह्या रूपानें त्याचा पुन्हा अवतार झाला आहे. ह्या आघाडीचा विचार ह्या प्रकरणात पुढें करण्यात येईलच.

## साम्यवादी पक्षाचीं धोरणें

आतां साम्यवादी पक्षाच्या विविध क्षेत्राबाबतच्या धोरणाकडे वळलें पाहिजे

(१) किसान वर्ग—समाजवाद्यांच्या कार्यारंभाच्या ज्या परंपरागत पद्धति आहेत त्यास अनुसरून, साम्यवाद्यांनीं आधींआधीं किसानवर्गाकडे दुर्लक्षच

केलें होतें. परंतु चीनमधील घडामोडींनी ही परिस्थिति पालटली आणि किसानांचें वर्गयुद्ध हें त्यांच्या हातचें मुख्य शस्त्र होऊन नसलें. ह्या धोरणाच्या प्रभावानेंच तेलंगणातल्या किसानांना जमीनदार व सरकार ह्यांचेवर शस्त्र धरण्याची चेतवणी दिली गेली. परंतु नोव्हेंबर १९५१ च्या धोरणाच्या जाहीरनाम्यानें असें सांगितलें कीं, चिनी क्रांतीचें मर्म नीटसें आकलन करून घेतां, चुकीच्या समजुतीवरच हें कृत्य आधारलें गेलें आहे. चीन व हिंदुस्थान येथील परिस्थितीमधला भेदहि ह्या जाहीरनाम्यानें दाखवून दिला चिनी साम्यवाद्यांच्या "पाठीशीं प्रचंड सोविएत युनियनची दोस्ती" होती, ह्या गोष्टीवर जोर देऊन, जाहीरनाम्यानें पुढें, चिनी लोकांच्या हातांशीं असलेल्या मुक्तिसैन्याचाहि उल्लेख केला होता. प्रस्तुत प्रश्नाचा तोलूनमापून, सूक्ष्म विचार केल्यानंतर साम्यवादी पक्षानें हा निष्कर्ष काढला कीं, कामगार-वर्ग व किसान-वर्ग ह्यांचें साम्यवादी नेतृत्वाखाली एकीकरण करणें आणि इतिहासानें शिकविलेल्या सर्व धड्यांचा, आपला झगडा चालू ठेवण्यासाठीं उपयोग करून घेणें हाच आपल्यापुढील मार्ग आहे. भारतातल्या परिस्थितीशीं जुळवून घेतलेल्या लेनिनप्रणीत तत्त्वज्ञानाचा मार्ग तो हाच असा दावा सांगितला जात होता. जमिनी किसानांचे हातीं सोपविणें व संयुक्त किसान-संघटना उभारणें हें साम्यवादी पक्षाचें जमिनीबाबतचें धोरण होतें.

(२) **कामगार वर्ग :** आरंभापासून साम्यवादी पक्षानें मजूर वर्गाकडे लक्ष पुरविलें होतें. ह्या वर्गानें किसान वर्गावर पूर्ण विसंबून त्यांचें, तसेंच आमजनतेचेंहि, साह्य घ्यायचें आहे, आणि शहरांतून व कांहीं ग्रामीण विभागांतूनहि, स्वातंत्र्य, जमीन व भाकरी हीं मिळविण्यासाठीं, स्वतःच्या नेतृत्वाखालीं लढे द्यावयाचे आहेत. कामगारांच्या राहणीच्या मानांत आमूलाग्र सुधारणा घडवून आणण्यासाठीं ट्रेड युनियनच्या द्वारें सामुदायिक देवाणघेवाण सुरू करून आणि संप घडवून आणून लढा देणें हें साम्यवाद्यांचें उद्घोषित धोरण असून तसें त्यांनीं जाहीरहि केलें आहे. सत्याग्रहामुळें बहुजनसमाजानें लढ्यांत भाग घेणें अशक्य होऊन त्यांचेकडे केवळ प्रेक्षकाचें काम येऊन बसतें त्या कारणास्तव सत्याग्रहास मान्यता दिली गेलेली नाहीं.

साम्यवाद्यांच्या, ट्रेड युनियन संघटनांबाबतच्या धोरणांत नेहमीं धरसोड दिसून आली आहे. प्रथम त्यांची TUC होती; नंतर संयुक्त आघाडीच्या काळात त्यांनीं AITUC शीं स्वतःस संलग्न करून घेतलें होतें. रणदिव्यांच्या नेतृत्वाखालीं

त्यानीं पुनश्च आपले पक्षीय मजूर संघटनेचें धोरण सुरू केले. ह्याचा परिणाम असा झाला कीं काँग्रेस व समाजवादी ह्यांच्या कामगार संघटनांनी अनुक्रमे INTUC आणि हिंद मजदूर सभा हीं रूपें धारण केलीं. सांप्रत त्यांची संयुक्त संघटनेच्या दिशेनें पुनश्च वाटचाल सुरू आहे. साम्यवाद्यांच्या हिशेबं, राजकीय डावपेचाचें एक साधन ह्यापलीकडे स्वतंत्र असें अस्तित्व ट्रेड युनियनला नाहीं हे उघड आहे.

(३) भाषा - भाषावार प्रांतरचनेमुळें लोक राज्यकारभारात भरपूर भाग घेऊं शकतील, शिवाय भाषावारीनें केलेल्या राज्यामुळें संस्कृति फोफावते, बहरते ही गोष्टहि लोकशाहीस आवश्यक अशीच आहे, ह्या कारणास्तव देशाची भाषावार प्रांतरचना होण्यास साम्यवाद्यांनी नेहमी पाठिंबा दिलेला आहे. तरी पण "आज भारतातल्या, सर्व राष्ट्रीयत्वाच्या, कष्टभाराक्रांत आलेल्या बहुजनसमाजाची संघटना ही भारतातील सर्वांत महत्त्वाची गोष्ट होय," असें मदुरा येथे भरलेल्या साम्यवादी काँग्रेसच्या बैठकींत आवर्जून सांगितलें गेलें. राष्ट्राचा एकसंधपणा राखण्यापेक्षा एका विशिष्ट वर्गाचा एकसंधपणा कायम राखण्यास साम्यवादी अधिक महत्त्व देतात. भाषावार प्रांतरचनेस पाठिंबा देण्याचें त्यांचें धोरण म्हणजे तरी त्यांच्या वर्ग राजकारणाचें एक साधन होय, हें ह्यावरून उघड दिसतें.

(४) **काँग्रेस सरकारबाबतचा दृष्टिकोन** सरकार व काँग्रेस पक्ष ह्यांबाबतच्या साम्यवादी दृष्टिकोनात स्वातंत्र्यप्राप्तीपासून एवढा बदल होत गेला आहे की तो चटदिशीं भरल्याशिवाय राहात नाहीं, त्या काळापासून काँग्रेस पक्षाच्या जेवढ्या हालचाली झाल्या त्या सर्वांचा धिक्कार करणें साम्यवाद्यांना शक्य झालें आहे हेच ह्याचें कारण होय ! स्वातंत्र्य मिळताक्षणीं "साम्राज्यवादी, जमीनदार व संस्थापक ह्यांचा एक Reactionary Policy स्वरूपाचा गट" ह्या दृष्टिकोनातून साम्यवादी काँग्रेसकडे पाहूं लागले. तरी पण साम्यवादी काँग्रेसच्या मदुरा बैठकींत (डिसेंबर १९५३–जानेवारी १९५४) त्यांना हें कबूल करावेंच लागलें कीं "नेहरू सरकारबद्दल पुष्कळदा आम्हीं सारग्राही वृत्ति ठेवली आहे. ज्या गोष्टी जनतेस हितावह आहेत त्यास आम्ही पाठिंबा देतो व ज्या जनतेस अहितकारक आहेत त्यास विरोध करतो, हें आम्हीं सांगितलेंच आहे." अशा रीतीनें नेहरू सरकारातहि काहीं चांगलें आहे हे ते आडवळणानें कबूल करीत आहेत हें उघड होतें

काँग्रेसबाबत कोणता दृष्टिकोन स्वीकारावा ह्या मुद्द्यावर मदुरा अधिवेशनांत,

साम्यवादी पक्षास नक्की निर्णय घेता आला नाहीं. पक्षाचें मत असें पडलें कीं मूलभूत स्वरूपाचे असे दोनच मार्ग आपणापुढे आहेत सरकारशीं सहकार्य करावयाचें; परंतु काहीं विशिष्ट गोष्टींवर टीका मात्र करावयाची, अगर सरकारला विरोध करावयाचा, परंतु काहीं विशिष्ट गोष्टींस पाठिंबा द्यावयाचा. नक्की निर्णय घेणें अशक्य होण्याचें कारण हें कीं, "भारतीय जनतेचा शत्रु" कोण ह्याबद्दल पक्षाचें एकमत होईना.

भारतीय समाजवाद्यांच्या दोन प्रमुख संप्रदायास ढोबळ मानानें 'अमेरिकन विरोधी' व 'ब्रिटिशविरोधी' अशीं नांवें देता येतील. साम्यवाद्यांचा परंपरागत मार्ग म्हणजे, साम्राज्यवाद हा भारतीयांचा सर्वांत मोठा शत्रु आहे असें सांगणें: तेव्हा अमेरिकाविरोध हेंच साम्यवाद्यांचें धोरण होय, हें ओघानें आलें. आतां अमेरिकेस मुख्य वैरी मानणें म्हणजे "अमेरिकेच्या धमकीस तोंड देण्यासाठीं नेहरू-सरकारच्या निशाणाखालीं दाखल होणें." परंतु राजेश्वर राव ह्यांच्या नेतृत्वाखालील, अधिक लढाऊ आंध्राच्या साम्यवादी गटानें, आंध्र बैठकीच्या जाहीरनाम्यात दाखवून दिलें आहे कीं, "ज्याच्याशीं झगडा करावयाचा असा विशिष्ट साम्राज्यवाद कोठें आहे हें स्पष्ट न करता, नुसतेंच सर्वसामान्य साम्राज्यवादाशीं लढा देण्याच्या गोष्टी बोलणें चूक आहे." आंध्र जाहीरनाम्यानें पुढें असेंहि दाखवून दिलें आहे ब्रिटिश साम्राज्यशाही हाच आपल्या राष्ट्रीय प्रगतीचा व म्हणजेच आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचा मुख्य शत्रु होय. आतां हा जाहीरनामा मान्य करावयाचा म्हणजे जमीनसुधारणा, औद्योगीकरण ह्या मुद्द्यांबाबत—विशेषतः भारतातील परदेशीय भांडवलाच्या प्रश्नाबाबत सरकारचीं जीं अंतर्गत धोरणें आहेत त्यावरून सरकारशीं झगडा करणें आलें. आता ह्या दोहोंतून कोणतें धोरण स्वीकारावयाचें ह्याचा निर्णय करणें सोपें नव्हतें. परंतु अखेर साम्यवादी पक्षानें असा निर्णय घेतला कीं, आपला मूलभूत विरोध हा ब्रिटिश सत्ता व सरंजामशाही ह्यांचेशींच आहे. म्हणजेच, काँग्रेसविरोध हा पुनश्च "राष्ट्रीय प्रश्न" बनला व त्यात सर्व प्रगतिशील लोकांनीं लक्ष घालायला हवें असाच, साम्यवादी पक्षाच्या दृष्टीनें, ह्याचा अर्थ ठरला. अशा रीतीनें साम्यवादी पक्षानें आपल्या 'लोकशाही संघटना सरकार'च्या कल्पनेचा पुनरुच्चार केला.

सदरहू लोकशाही संघटना ही पूर्वीच्या लोकशाही आघाडीहून फारच भिन्न होती. ही नवी संघटना केवळ डाव्याच गटाची नव्हती.

"काँग्रेसबाबतच्या कटु अनुभवानें ज्याचे डोळे उघडले आहेत परंतु साम्य-वादाच्या संपूर्ण कार्यक्रमांत भाग घेण्याची ज्याची अद्यापि तयारी नाहीं असा प्रचंड बहुजनसमाज तसेंच समाजवादी पक्ष, ह्या सर्वांचाच अंतर्भाव" तिच्यांत व्हायचा होता. मदुरा काँग्रेसपुढील राजकीय ठराव मांडतेवेळीं पक्षाच्या चिटणिसांनी केलेल्या भाषणातील एका विधानावरून, वरील धोरणास पक्ष केवढें महत्त्व देतो तें दिसून येईल. अजय घोष म्हणाले, "आपल्यापुढील सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे जनतेची मोठ्यांत मोठी चळवळ चालविणें! तिच्या मार्गांत जी जी गोष्ट येईल—मग ती गोष्ट म्हणजे आपलाच पक्षीय अगर हट्टवादी दृष्टिकोन असो वा आपल्या संघटनेबाबतच्या कडक कल्पना असोत—तिचा त्यागच केला पाहिजे."

पक्षाचें आजचें धोरणहि अगदीं तेंच आहे. एवढेंच कीं लोकशाही आघा-डीच्या प्रवेशमर्यादा अधिक ढिल्या केल्या आहेत, कारण आज ती राष्ट्रीय लोक-शाही क्रांतीची आघाडी बनली आहे व ह्यामुळें तिच्यात केवळ कष्टभाराक्रांत जनतेचाच नव्हे तर सर्वच जनतेचा अंतर्भाव होत आहे. लोकशाही आघाडीचें तंत्र अत्यंत धूर्ततेचें आहे. आघाडी आहे कायम स्वरूपाचीच, परंतु तिची तात्कालिक उद्दिष्टें, तसेंच ही आघाडी उभारण्याच्या विशेष पद्धति ही प्रत्यक्षा-तल्या परिस्थितीस अनुसरून वेगळीं असू शकतील. जर परचक्र आलें तर आघाडी, जें सरकार सत्तारूढ असेल त्यास साह्य करील परंतु संधी येईल तेव्हा सरकारास सत्तेवरून दूर करणें हें आघाडीचें उद्दिष्ट राहील. अजय घोष ठासून सांगत आहेत कीं बहुजनसमाजाच्या चळवळीचें दिग्दर्शन करायचें तें ह्याच दिशेनें केलें पाहिजे. गोवाविमुक्ति मोहीम, संयुक्त महाराष्ट्र चळवळ व कानपूरच्या गिरणीवाल्यानीं मागणी व पुरवठा ह्याचा समतोल राखण्याची अर्थशास्त्रीय मोहीम सुरू केली होती, तिच्याविरुद्ध कामगार वर्गानें केलेली संघटित उठावणी ही उदाहरणें लोकशाही आघाडीचें तंत्र विशद करण्यासाठीं घेतलीं आहेत.

परंतु आघाडीचें कार्य एवढें एकच नाहीं. आपल्या आर्थिक राजकीय व सामाजिक जीवनांत मक्तेदार भांडवलशाहीचें जें बळ वाढत आहे त्याचेशी झगडा करण्याचा 'लोकशाही' चा सारखा तगादा चालू आहे. प्रस्तुत आघाडी हा ह्या लोकशाहीचे हात बळकट करण्याचा एक मार्ग बनायची आहे.

अशा रीतीनें, डाव्या पक्षाच्या संघटनेचे हात बळकट करणारी एक शक्ति म्हणूनहि काहीं अशी आघाडीचा उपयोग केला जावयाचा आहे. 'कॉंग्रेसच्या जनताविरोधी धोरणांना सामना देता देता एकीकडे आपल्याला डाव्या गटांशी ध्येयवादी व बंधुभावाचा झगडा करून, त्याच्या चुका त्याच्या ध्यानीं आणून द्यायच्या आहेत." हात अगदीं एसावाचे आहेत खरे, पण हा स्वर मात्र खास याकोबाचाच !

## साम्यवादी पक्ष फाटाफुटीच्या मार्गावर

स्वदेशातील तसेंच परदेशातीलहि घटनामुळें साम्यवादी पक्षाच्या पथकामध्यें दर्जाची आणीबाणीची परिस्थिति निर्माण झाली आहे. १९५५ साल हें साम्यवादी पक्षास नवें वळण देणारें साल ठरलें आणि आंध्रच्या निवडणुकांत साम्यवाद्यांना आलेलें अपयश हें बहुधा ह्या आणीबाणीच्या परिस्थितीचें पहिलें द्योतक होतें. जूनमध्यें पंडित नेहरू सोविएत रशियात व आशियाई लोकशाही राज्यात आपल्या स्नेहसंवर्धनाच्या दौऱ्यावर गेले. स्वतंत्र आशियाईंचे कैवारी शांतीचे संदेशवाहक आणि थोर लोकांचे थोर पुढारी ह्या नात्यानें त्यांचें सर्वभर स्वागत केलें गेलें. आता नेहरू व त्याचें सरकार ह्यांचा, 'साम्राज्यवाद्यांचे हस्तक' व सरंजामशाही नादिरशहा म्हणून धिक्कार करणें अशक्य बनलें. भारत सरकार हें सोविएत रशिया, चीन आणि आशियाई लोकशाही राष्ट्रें ह्यांचेशीं खऱ्याखुऱ्या स्नेहभावानें वागणार आहे, हें आता पूर्णपण सिद्ध झालें. परदेशीय आघाड्यावर भारत सरकारनें साम्यवाद्यांवर नक्कीच जय मिळावला होता.

स्वदेशीहि साम्यवाद्यांचे आसन डळमळू लागलें आहे हें त्यांना आंध्रमध्यें आलेल्या अपयशावरून दिसून येतें. पंचवार्षिक योजना, समाज विकास योजना व राष्ट्रीयीकरणाचे धोरण, ह्यामुळें कॉंग्रेस प्रतिगामी स्वरूपाची असल्याची भाषा काढणें साम्यवाद्यांना अशक्य होऊन बसलें समाजवादी वळणाची समाजरचना कॉंग्रेसनें मान्य केल्यानें समाजवाद्यांना अधिकच गोंधळांत पडल्यासारखें झालें.

वर्षाचे अखेरीस, पीच्छेहाट होण्याचा आणखी एक प्रकार घडून आला, तो म्हणजे रशियन नेत्यांनी भारतास दिलेली भेट ! ह्या भेटीच्या वेळीं, कॉंग्रेसच्या नेतृत्वाखालीं भारतानें घडवून आणलेल्या प्रगतीची त्यांनीं प्रशंसा केली; हा केवळ एवढ्या उदाहरणापुरताच झालेला पराभव नव्हे तर तात्त्विक दृष्ट्याहि

पराभवच ! कारण साम्यवादेतर राज्यपद्धतींनाहि सुधारणा होऊं शकते अशी ह्या नेत्यांनीं कबुलीच दिली नाही काय ? सोव्हिएत कम्युनिस्ट पार्टीच्या विसाव्या कॉंग्रेसमध्यें क्रुश्चेव्ह ह्यांनी हें अगदीं स्पष्ट केलें आहे. त्यांनीं सांगून टाकलें कीं परंपरागत साम्यवादी तंत्रापेक्षा वेगळे मार्ग अवलंबूनहि समाजवाद निर्माण करता येतो. समाजवाद निर्माण करणें म्हणजे "संसदेत पक्कें बहुमत हस्तगत करून ठेवणें, आणि त्याचेंच, 'बूर्झ्वा लोकशाहीच्या हातचें एक साधन' हें स्वरूप पालटून टाकून त्यास अस्सल जनतेच्छानुवर्ती साधन बनविणें.'

ब्रिटनला भेट देण्याच्या आदल्या रात्रीं सोविएत नेत्यानीं 'कॉमिन्फॉर्म' बरखास्त झाल्याचें जाहीर केलें. भारत जरी 'कॉमिन्फॉर्म'चा सभासद नसला तरी भारतीय साम्यवादी पक्षाच्या इतिहासाचें अवलोकन केलें असता हें दिसून येतें कीं, त्यांचीं धोरणें अनेकदा रशियन पक्षाच्या तंत्रानें ठरविलीं जात होतीं आणि ह्याच प्रकारें पुढेंहि चालू राहण्याचा संभव आहे.

ह्या सर्व घटनांचें अंतिम पर्यवसान, साम्यवादी पक्ष निर्वासिताच्या पायरीस जाऊन पोंचण्यात झालें. त्याच्या जन्मस्थानानें त्यास झिडकारून टाकलें आहे आणि भारतात, परकीय उपरा पाहुणा एवढीच त्याची भूमिका आहे.

कोणत्याहि पक्षाच्या अस्तित्वाचें औचित्य तो किती प्रमाणात एतद्देशीय स्वरूपाचा आहे ह्यावर अवलंबून असतें. पक्षांनी आधीं आपल्या राष्ट्रीय राज्याशीं एकनिष्ठ असणें जरूर आहे. आपल्या देशाबाहेरील पक्षाशीं असलेला एकनिष्ठेचा संबंध तोडून टाकणें हें ह्या उद्दिष्टाच्या मार्गावरील पहिलें पाऊल होय. परंतु ह्या नकारात्मक बाबीप्रमाणेंच विधायक स्वरूपाचीहि एक बाजू ह्या प्रश्नास आहे. ती म्हणजे देशातील आर्थिक, सामाजिक व राजकीय बाबींशीं समरस होऊन जाणें ही होय ! परदेशीय निष्ठा आपल्या कधींच नव्हत्या असा भारतीय साम्यवादी पक्षाचा दावा आहे व आपण तो खरा धरून चालू या. आता हा दावा खरा मानला तरी, भारतापुढील समस्यांना तोंड देणें, त्यांची चिकित्सा करणें, त्या सोडविणें असलें कार्य करून ह्या भूमींत स्वतःला पुरतें रुजवून घेणें हें मात्र सदरहू पक्षानें मुळींच केलें नाहीं असें विधान करण्यास काहीं प्रत्यवाय रहात नाहीं. जेनी ली ह्यांनीं भारतास भेट दिली त्या वेळीं जी गोष्ट दाखवून दिली होती ती बरोबरच आहे. त्या म्हणाल्या होत्या कीं, राजकीय स्वरूपाची अडचण हा काहीं भारताच्या प्रगतीचा शत्रु नव्हे, तर "जनतेचें दारिद्र्य ही कटुकठोर

घटनाच ' तिचा खरा शत्रु आहे. परन्तु भारतापुढील समस्यांना केवळ आपल्या हट्टवादी मतप्रणालीचें राजकीय तोडगे सुचविण्यापलीकडे साम्यवाद्यांजवळ आणखी कांही नाहीं हे खरे नव्हे काय ? जर पक्षाच्या प्रकाशनाची यादी वाचून पाहिली तर त्यातहि ही गोष्ट चांगली उघड झालेली दिसून येईल. त्याचें बहुतेक वाङ्मय हें चालू प्रश्नाबाबत लिहिलेली लहान लहान चोपडीं एवढ्याच स्वरूपाचें आहे. रणदिव्यांचें भारतीय आर्थिक प्रश्नांतील आणीबाणीचा समय (The Crisis of Indian Economy) व डांगे ह्यांचें प्राथमिक साम्यवादाकडून दास्याकडे चाललेला भारत ' (India from Primitive Communism to Slavery) असे अपवाद क्वचित् कोठें आढळतील. परन्तु तेथहि भारतीय परिस्थितीस मार्क्सवादाच्या चौकटीत ठाकूनठोकून बसविण्याचेच प्रयत्न दिसून येतील.

ह्याच्याइतकीच महत्त्वाची दुसरी गोष्ट म्हणजे साम्यवादी पक्षाची 'क्रांती'-बाबत काय विचारसरणी आहे ह्याचा पुन्हा एकदा विचार करणे ! अखिल जगातल्या कामगारांनो, (जरूर तर शस्त्रे घेऊनहि—) एक व्हा असे जेव्हा मार्क्सनें आवर्जून सांगितलें तेव्हा कोयते व हातोडे हींच काय ती शस्त्रें त्याच्या हातास लागण्याजोगी होतीं, परन्तु गेल्या शतकांत परिस्थिति खूपच पालटली आहे. बऱ्याच देशात—ह्यात भारतहि आला—लोकशाही राज्यपद्धतीची चौकट व लोकशाहीतील मूलभूत तत्त्वें ह्याचा बराच प्रसार झाला आहे. आज प्रत्येक नागरिकास स्वतःचे असे काहीं मूलभूत हक्क प्राप्त झालेले आहेत व कायदेशीर रीत्या त्याची अमलबजावणी करून घेणे शक्य झालेलें आहे. तसेंच प्रत्येक नागरिकास मतदानाचाहि हक्क मिळालेला आहे. हे बदल ध्यानात घेता, सामाजिक व आर्थिक क्रांति ही जर खरोखुरी क्रांति व्हायला हवी असेल तर ती लोकशाहीच्या मार्गांनी साध्य करून घेता येईल व त्याच मार्गांनी ती साध्य करावयाची आहे हेच दिसून येत नाहीं काय ? साम्यवादी ह्या प्रश्नाला होकार भरतीलहि. परन्तु आम्हाला त्यांना आणखी विचारावयाचें आहे की, तुमची लोकशाहीवरील निष्ठा निखालसपणें खरी आहे काय ? तुम्ही ज्याला लोकशाही पद्धतीचा एकतंत्री कारभार म्हणता तें तुमच्या संघटनेंतील एकतंत्री अमलाचें तत्त्व सोडून द्यायला तयार आहा काय ? मजूर वर्गावर एकाच पक्षाने हुकूमशाही गाजविण्याच्या कल्पनेस सोडचिठ्ठी द्याल काय ? आणि अशा रीतीने मूलभूत मानवी हक्क व विरोध करण्याचा हक्क ह्यांना

तुम्ही एवढे चिकटून आहा ह्यात निश्चळ डायरेक्चारपलीकडे भरीव असे काही आहे ह्याचे प्रत्यंतर येऊ घालं काय? अर्थात् ह्यालाहि जर होकार द्यायचा असेल तर आधी त्यास साम्यवादाचे सार तत्त्वज्ञानच अमान्य करून लोकशाही समाजवादाच्या कल्पनेस मान्यता द्यावी लागेल. आणि असे जर असेल तर साम्यवादी पक्ष हा अस्तित्वात राहायचा तो तरी कशाच्या न्यायाने?

यदा (१९५६ साली) १९ ते २९ एप्रिलमध्ये पालघाटला चौथी साम्यवादी काँग्रेस भरली होती. परंतु तिनेहि निराशाच केली. कारण तीत ह्या मुद्द्याची चर्चा झालीच नाही आणि काही थोड्या तात्कालिक स्वरूपाच्या प्रश्नांची चर्चा करण्यापलीकडे व आपल्या 'लोकशाही संघटने'ची समालोचना करण्यापलीकडे तिने काहीच केलं नाही

## उपसंहार

एक काळ असा होता की जमानदारी व सरंजामशाही हितसंबंधांमुळे आर्थिक सामाजिक दुर्बलांना जे चेपले जात आहेत अशांच्या कार्याचा अगदी योग्य रीतीने पुरस्कार करणारा पक्ष कोणता असेल तर तो साम्यवादी पक्षच, असे अनेकांना वाटत होते. मार्क्सवादामध्ये त्याच्यापाशी सुसंघटित असा एक अखिल जागतिक स्वरूपाचा दृष्टिकोन आहे आणि तो दृष्टिकोन वाढत्याच्या नव्या सामर्थ्याशी टक्कर देत आहे असे भासत होते. ह्या संघटनेत एक प्रकारची शिस्तबद्धता दिसून येई; तिच्या-तले आज्ञापालन अगदी अधिकाऱ्यांनी करून घेतले जात असल्याचे दिसून येई. समाजाच्या विस्कळित परिस्थितीत हा फरक ठळकपणे उठून दिसणारा असा होता. पक्षाच्या पुढाऱ्यांत उच्च देशभक्तीने प्रेरित झालेले पुरुष असून आपल्या स्वार्थत्यागी जीवनाने ते इतरांस स्फूर्ति देत होते. ह्या साऱ्या प्रकाराने सुशिक्षितांची मने आकर्षून घेतली गेली होती. मजूर व किसान ह्यांना हा पक्षाच्या रूपाने आपला कैवारी अवतरल्याप्रमाणे वाटत होता. आज मात्र ह्या पक्षाने केलेल्या नैतिक व बौद्धिक आवाहनात काही राम राहिलेला नाही. साम्यवादांतील एक तत्त्वी कारभाराच्या अगमन तत्त्वाने प्रत्येक चांगल्या गोष्टीचे वाईट गोष्टीत, प्रत्येक सत्याचे असत्यात रूपांतर करून टाकले आहे. मजूर व किसान ह्यांना साम्यवादी पक्ष पाठबळ देत आहे; परंतु त्यांनाहि आपण ह्याच्यावर अवलंबून आहो असे वाटेनासे झाले आहे. राष्ट्रीय योजना आज समाजवादावरच आधारलेल्या आहेत

साम्यवादी पक्षाचें मोठ्यांत मोठें आकर्षण आज हेंच आहे कीं, विरोधी पक्षांपैकीं कोणत्याहि पक्षाहून हाच पक्ष अधिक सुसंघटित आहे. आपण खरोखर राष्ट्रीय वृत्तीचे व लोकशाहीचे पुरस्कर्ते आहों असें दाखविण्याकडे आज पक्षाचा कल आहे व त्यामुळें कांहींची फसगतहि होण्याचा संभव आहे. परंतु साम्यवाद्यांना मतें द्या म्हणून ज्यांना आग्रह होतो त्यांनीं हें मात्र लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, आपल्या पूर्वचारित्र्यात खरोखरची सोडचिठ्ठी देण्याची. अगर खराखुरा लोकशाही कायाकल्प करण्याची कसलींहि चिन्हें त्यांनीं दाखविलेलीं नाहींत. आपल्या देशाचें भवितव्य त्यांच्यावर सोपवून द्यावें अशा योग्यतेस तो अद्याप चढलेला नाहीं.

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय ठाणे,
वा. क्र. ६३५८ नों. दि. ...........
वि. का. वा. क्र. ...................

## ७

# राजकारणाची ख्रिस्ती समीक्षा

राजकीय पक्ष, त्यांच्या मतप्रणाली, धोरण आणि कार्यक्रम यांचे मूल्यमापन करण्यासाठी आम्हीं कांहीं मानवी मूल्यें निर्णायक मानली आहेत. हीं मूल्यें आमचीं राष्ट्रीय ध्येयें, आमची उद्दिष्टमालिका निश्चित करणारीं आहेत. हीं मूल्यें आम्हीं का स्वीकारलीं यांची कारणपरंपरा देत बसणें नेहमीं आवश्यक असतें असे नाहीं. कारण म्हणजे सर्वसाधारण कल्याणासाठीं सर्व नागरिकांमध्यें धर्म मतप्रणाली निरपेक्ष सहकारितेचा हीं मूल्यें आधार आहेत. परंतु मूल्यें झाली तरी अंतिम सत्याशीं त्यांची संगति लावल्याशिवाय त्यांची मौलिकता कायम राहू शकत नाहीं. वास्तव, इतर धर्मांचें परिपालन करणाऱ्यांसोबत ख्रिस्ती लोकांनींहि आपल्या अंगीकृतांची संगती राष्ट्रीय ध्येयांशीं, तशीच आपल्या धर्मकल्पनांशीं लावणें त्यांचें कर्तव्य आहे.

### माणसें म्हणजे व्यक्ति

प्रत्येक मनुष्यप्राण्याच्या असीम मोलाची जी कांहीं कल्पना असेल तिच्यावर लोकशाही तरणें वा मरणें अवलंबून असतें. प्रत्येक मनुष्य दारिद्र्यानें विकृत झाला आहे आणि अन्याय्य रीतिरिवाजाखाली दबलेला आहे. बायबलमध्यें निर्गुण देवावर विश्वास घोषित केला आहे. त्यानें मनुष्याला सृष्टीचा एक विभाग म्हणून उत्पन्न केलें. पण देवाचा संकल्प समजून घेऊन त्याच्याशीं सहभागिता राखण्याजोगी स्वतंत्रता त्याला दिली. मनुष्य देवापासून दूर गेला. तरीहि देवानें नाजोरी येशू ख्रिस्ताच्या ठायीं मनुष्यपण धारण केलें. त्यानें आपला क्रूस आणि पुनरुत्थान यांच्या द्वारें ईश्वरी सहजीवनाचा मार्ग खुला केला. ख्रिस्तानें काय शिकवलें, त्यानें काय केलें यावरून मनुष्याविषयींचें ख्रिस्ती अनुमान मुख्यत्वेंकरून काढलेलें आहे. मनुष्याचे देवानें लावून दिलेले कांहीं स्वाभाविक व्यवहार आहेत,

पण त्याच्याविषयींची मुख्य गोष्ट म्हणजे त्याला ख्रिस्ताच्या ठायीं देवाचा सनातन पुत्र होण्यासाठीं पाचारण करण्यांत आलें आहे. या पाचारणाचा स्वीकार स्वतंत्रपणें करण्याची त्याची जबाबदारी ही त्याच्या व्यक्तिमत्वाचा गाभा आहे. मानव या नात्यानें त्याचें जें सनातन स्थान आहे त्याचा मूलाधार आहे. ख्रिस्ताच्या ठायीं दिलेली ही स्वतंत्रता कोणीहि हिरावून घेऊ शकत नाहीं. मृत्यूलाहि ती नष्ट करता येत नाहीं. आम्ही "देहाचें पुनरुत्थान आणि सनातन जीवन" याची मार्गप्रतीक्षा करीत आहोत. तेव्हां मनुष्याची जी कांहीं प्रतिष्ठा आहे ती "ज्याच्याकरिता ख्रिस्त मेला असा बंधु" तो आहे यातून उद्‌भूत झाली आहे. मनुष्यातला "लहानांतील लहान, गरिबांतला गरीब, दीनांतला दीन आणि हरपलेला" अशा प्रत्येकाला ख्रिस्ताच्याठायीं देवानें त्याच्यासाठीं जें कांहीं केलें त्याच्यामुळेंतर अपार किंमत आहे. मनुष्याला त्याचें बुद्धिप्रधान कार्य आहे समाजातलें स्थान आहे. राजकीय आणि आर्थिक व्यवहार आहेत. आणि त्याच्यायोगें त्याला प्रतिष्ठा प्राप्त होते, पण याचें कारण हें कीं, त्याच्या आत्मविश्वासाला ते साधनीभूत होतात. त्याच्यामध्यें आणि त्याच्याद्वारें त्याचें वैयक्तिक स्थान अभिव्यक्त झालें पाहिजे.

ख्रिस्ताविषयीं अनुकूल वा प्रतिकूल निर्णय घेण्याची पूर्ण मुभा ख्रिस्तानेंच प्रत्येक मनुष्यास दिली आहे. त्याच ख्रिस्ताची घोषणा अविश्रांतपणें करून मानवी व्यक्तीच्या स्वातंत्र्याची व प्रतिष्ठेची क्रांतिकारी कल्पना ख्रिस्ती चर्चला दृढमूल करतां येईल. ख्रिस्ताचें हें पाचारण धार्मिक स्वरूपाचें आहे आणि स्वतः निर्णय घेऊन त्याला जे प्रत्युत्तर द्यायचें त्याचें स्वरूपहि धार्मिकच आहे. हीं दोन्हीं म्हणजे धार्मिक पाचारण आणि धार्मिक प्रत्युत्तर समाजातील व्यक्तिस्वातंत्र्याचा ख्रिस्ती पाया होय. यामुळेंच ख्रिस्ताच्या शुभवर्तमानाची घोषणा करण्याविषयींची कळकळ आणि नागरिक या नात्यानें राजकीय लोकशाही आणि सामाजिक न्याय याविषयीं त्याला जी कळकळ वाटते त्या दोन्ही एकमध आहेत, परस्परापासून अभिन्न आहेत.

शुभवर्तमानाच्याद्वारें मनुष्याना प्रतिष्ठा आणि स्वतंत्रता नेहमींच लाभते हें विधान ऐतिहासिक दृष्ट्या समर्थनीय आहे काय? हा प्रश्न विवाद्य आहे. पाश्चिमात्य देशांत चर्चच्या स्थापित सत्तेखालीं विरोध करून मानवी स्वतंत्रता कशी हस्तगत करण्यात आली हें कोणालाहि दाखवून देतां येण्यासारखें आहे. पण ह्या बाबतींत

लक्षात ठेवण्याजोगी गोष्ट अशी आहे की, ह्या विरोधाची प्रेरणा बऱ्याच प्रमाणात शुभवर्तमानाकडूनच मिळाली होती. इंग्लंड आणि अमेरिका येथे लोकशाहीचा उदय आणि विकास झाला त्यात नॉनकॉन्फॉर्मिस्ट धर्मपंथानीं बजावलेली कामगिरी कमी लेखता येण्यासारखी नाही. स्थापित सत्तेच्या विरुद्ध झालेली उठावणी मुळात निधर्मी जरी होती, तरी त्या निधर्मीयतेवरहि ख्रिस्ती संस्कृति आणि ख्रिस्ती नीतिमत्ता यांचा ठसा उमटलेला होता.

आमच्या देशांत सुद्धा "बंदिवानास बंधमोचन विदित करणे आणि अंधास दृष्टि देणे, भग्नहृदयी जनास मोकळें करणें" चर्चनें अंगीकृत कार्य झालें आहे. हें खरेखुरें समाजकार्य होय. चोहीकडे समाजातील आजार दूर करणें, ज्ञानदानानें मानसिक उन्नति करणें आणि विवेकबुद्धि जागृत करणें हीं कामें शुभवर्तमानानें प्रत्येक मनुष्याला जी प्रतिष्ठा बहाल केली आहे तिच्या प्रीत्यर्थ करीत आली आहे. अस्पृश्यतेची निष्ठुर चाल, जातिभेदाचे कडक निर्बंध आणि स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे हक्क नाकारणाऱ्या परंपरागत क्रूर समजुती यांच्या विरुद्ध लोकांच्या विवेकाला जागृत करण्याचें कार्य ख्रिस्ती चर्चनेंच केलें आहे. हीन जातींतल्या आणि जातिभ्रष्ट झालेल्या ज्या लोकांनी आरंभीं ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला त्यांना आपले मानवी हक्क स्थापित करण्याकरता दूषित पूर्वग्रह आणि जुनाट सनातनीपणा यांच्याबरोबर लढा द्यावा लागला आहे. स्त्रियांचे हक्क, गृह आणि कुटुंब यांचे पावित्र्य यांविषयींच्या सुधारणांना प्रथम हात घालणारे हेच लोक होते. न्याय्य वेतन आणि राहणीचें उच्च मान यासाठीं चळवळ करणारे हेच होते. राजकीय स्वातंत्र्यासाठीं देण्यात आलेला लढा आणि राष्ट्रीय आंदोलनांतून निर्माण झालेल्या मोठ्या प्रमाणांतील सामाजिक सुधारणा यांत चर्चनें पुरेसा पाठिंबा दिला नसला आणि जो दिला तोहि मनमोकळेपणानें दिला नसला तरी आरंभींचा क्षोभ निर्माण करण्यात ख्रिस्ती व्यक्ति व ख्रिस्ती संस्था यांच्या कामगिरीविषयीं शंका घेता येणार नाहीं.

## न्याय आणि प्रेम

मानवी प्रतिष्ठा अबाधित राहील अशी हमी देणें म्हणजे मनुष्याला मनुष्य ह्या नात्यानें जें मिळणें रास्त आहे तें देणें हें न्यायाचें सार आहे. न्यायाची अभिव्यक्ति मानवनिर्मित विशिष्ट कायदेकानून द्वारा व्हावी लागते, तरीहि न्याय कोणाहि

ग्रंथ संग्रहालय, अनुक्रम १०५ 30८९९

व्यक्तीच्या वा एखाद्या विशिष्ट समाजाच्या मर्जीवर अवलंबून नसता. चोहोंकडे मान्य असलेल्या शब्दात हे सांगायचें झालें तर असें म्हणतां येईल कीं, ज्याला अनुसरून मनुष्य आपल्या जीवनाला वळण देतो आणि ज्याच्याविना मानवी जीवनाला अर्थच उरत नाहीं असा न्यायाचा एकदर आशय सारूपात ज्यांत समाविष्ट झाला आहे अशी कायद्याची कल्पना, मग तुम्ही त्याला सृष्टीचा, नीतीचा वा ईश्वरी कायदा म्हणा.

राष्ट्राचे कायदेकानू आणि खुद्द राज्य यांना नैतिक पायाची जरुरी असते असा ज्याचा विश्वास नाहीं त्यांना हुकुमशाही पद्धतीविरुद्ध किंवा राजकारणाचें रूपांतर उघड्यानागड्या स्वार्थसाधूपणात करणाऱ्या व्यक्ति वा पक्ष यांच्याविरुद्ध तक्रार करण्यास कारण राहात नाहीं. सर्वांना सारखाच बंधनकारक असलेल्या विश्वव्यापी नीतिनियमांवर विश्वास म्हणजे कोणताहि समाज वा राज्य यांत दिसून येणारा परस्परांविषयींचा आदर आणि कर्तव्यबुद्धि यांचा आवश्यक पायाच होय.

अनुभूतीपलीकडच्या नियमांविषयी आदरबुद्धि असली तर एक प्रकारची नम्रता येते आणि मानवी परिमितत्वाची जाणीव होते. ही नम्रता खऱ्या सहिष्णुतेचा आत्मा होय. न्याय इतका भव्य आणि मोलवान् आहे कीं कोणत्याहि एका व्यक्तीला, गटाला, वर्गाला किंवा पक्षाला त्याचे पूर्णपणे आकलन होणे अशक्य आहे. अनेक मनांच्या एकजुटीच्या प्रयत्नाने आणि विरोधी मतांच्या संघर्षांतूनच त्याचे दर्शन घडू शकेल अशी ज्यांची खातरी झाली आहे ते आपल्या प्रतिपक्षाच्या बाजूला जो काहीं सत्यांश असेल तो कबूल करायला, आपल्या नजरेतून सुटलेले मुद्दे समजून घ्यायला आणि आपल्याला चूक वाटते त्याची काय कारणें असतील तीं समजून घ्यायला तयार होतील; आणि भिन्न मतांच्या संघर्षांतून एका अधिक मोठ्या संयोगीकरणाची आशा करतील. अनुभूतीपलीकडील जो न्याय त्याच्यासाठी आपण जगण्याची धडपड करितो आणि त्याचीच सेवा करितो याचें स्मरण आपल्याला विरोधी पक्ष आणि निवडणुकज्वर देतो. आपण एकमेकांला विरोध करितो त्यावरूनहि न्यायावर आपली सारखीच निष्ठा आहे हें दिसून येतें.

स्वतंत्र व्यक्तींचा जो समाज असतो त्याची पहिली आवश्यकता अनुभूतीपलीकडचा कायदा वा नियम होय या कल्पनेला चर्चमधील खिस्ती जीवन दुजोरा देतें. चर्च ही आपला स्वामी खिस्त याच्याशीं काहीं विशिष्ट करारान्वये निगडीत झालेली आहे असें मानण्यांत येतें. ह्या कराराचें स्वरूप असें आहे कीं, चर्चच्या

घटकावयवांना परस्पर कर्तव्यता बंधनकारक आहे. ह्या सत्यावरून स्थानिक मंडळी स्थापिलेली असते. यावरून दिसून येत कीं, ख्रिस्ती जीवन म्हणजे ' मनुष्य प्राणी आणि त्याचा उत्पन्नकर्ता ह्याच्या मधली खाजगी बाब नाही, तर ह्या पृथ्वीतलावर ख्रिस्ताच्या स्वामीत्वाखाली व्यतीत करण्याचे सामाजिक जीवन आहे. मानवसमाज व्हावयाचा असला तर त्याने अनुभूतीपलीकडचा कायदा मानला पाहिजे. ह्या सत्याचे प्रगटीकरण म्हणजे ख्रिस्ताच्या करारान्वये एकत्र सांधलेली ख्रिस्ती मंडळी

सनातन नीतिनियमाची अप्रगतिशील व्याख्या होण्याची भीति येथें उद्भवते. स्थिति-स्थापत्याला (status quo) धर्म विहित पाठिंबा पुढें करून पूर्वापार हितसंबधीं आपल्या स्वार्थी हेतूसाठी या कल्पनेचा गेरवाजवी फायदा घेणें शक्य आहे. गुलामगिरी, भांडवलशाही आणि वाशिकवाद हीं ईश्वरी नेमानेम आहेत असा त्याचा पाठपुरावा करणें हें याचें मुद्देसूद उदाहरण म्हणता येईल आपल्या देशांत हिंदु कोड बिलाला सनातन धर्माच्या नावाखाली विरोध झाला हें एक उदाहरण देतां येईल. नैतिक मूल्याच्या अशा विपर्यासासंबधीं निधर्मीवाद आणि मार्क्सवाद यांनी तक्रार केली आहे ती योग्य आहे. पुष्कळ वेळा स्फोटक परि-स्थितीचे नैतिक व राजकीय परिणाम काय होतील हें आचारधर्माचें काटेकोर पालन करणाऱ्यांना समजून येतें त्यापेक्षा वेळ मारून नेणें हें ज्यांचें तत्त्व आहे अशा निधर्मीवाद्यांना अधिक चांगलें समजतें

परंतु हा धोका नैतिक परिस्थितीच्या जाणिवेंतून निर्माण झाला आहे असें नाहीं, तर एखाद्या विशिष्ट समाजाच्या नियमांशी व मूल्यांशी किंवा स्थिति-स्थापत्याशीं त्याची संगति लावली गेल्यामुळें आला आहे. ख्रिस्ताचा क्रूस हा प्रेमाच्या अंतिम कायद्याचे प्रगटीकरण आहे असें ख्रिस्ती चर्च घोषित करितें; पण हें करीत असताना ज्या कायद्यानें ख्रिस्ताला क्रूसावर खिळिलें त्या गोष्टी न्यायदानाच्या कायद्यापेक्षा किंबहुना, समाजांतील सापेक्ष न्यायदानविषयक सर्व ऐतिहासिक बंधनांपेक्षा प्रेमाचा कायदा वरचढ असल्याचेंहि चर्च घोषित करितें. ख्रिस्ताचें राज्य शेवटी येणार आहे, तोपर्यंत ह्या कायद्याची अज्ञात होणारी जी अनुभूति तिच्याकडे ख्रिस्ताच्या क्रूसांत होणाऱ्या आणि त्याच्यांतून सामर्थ्यानें नवीकृत होत जाणाऱ्या प्रेमाच्या उच्च प्रगटीकरणाच्या संदर्भांतून पाहिलें पाहिजे.

## राज्य निर्जीव होणार नाहीं

एका परकीय पाहुण्यानें म्हटलें आहे कीं, भारताच्या वैचारिक वातावरणात महात्मा गांधींचा थोडा, कार्लमार्क्सचा थोडा आणि १९ व्या शतकातील ब्रिटिश उदारमतवादाचा थोडा अंश आहे. गांधीवाद, मार्क्सवाद आणि ब्रिटिश उदारमतवाद या सर्वांनीं भारतातील आणि समाजवादी कल्पनांच्या घडणीला हातभार लाविला आहे. हा एक मोलवान् ठेवा आहे आणि राष्ट्रानें तो जतन करून ठेवणे जरूरीच आहे. पण आत्मप्रीतीनें मानवी सद्गुणाला कायमचें विकृत स्वरूप दिलें आहे हें समजून घेण्यास या सर्व मतप्रणाली अपात्र ठरल्या आहेत. या सर्वांची अशी श्रद्धा आहे कीं, कांहीं विशिष्ट प्रकारची परिस्थिति उपलब्ध झाल्यास एक "शासनसंस्थाविरहित समाज" निर्माण होईल. या श्रद्धेच्या मुळाशीं एक संकुचित दृष्टिकोन आहे, तो म्हणजे अनिष्टाचें कारण अपघातात असून तें दूर करता येण्यासारखें आहे असा समज. पण ख्रिस्ताचा क्रूस मानवी स्वभावाची कांहीं निम्न अंगें विशद करून दाखवून देतो कीं, मनुष्य देवापासून दूर गेला आहे आणि त्याची परिणति देहधारी ईश्वराच्या हत्येंत झाली आहे. यावरून दिसून येतें कीं, मानवाच्या आत्मप्रीतीचें मूळ त्याच्या मनोवृत्तींत आहे. देवापासून झालेली फारकत आणि आपली मर्यादितता घालविण्याची त्याची उत्सुकता याचा परिणाम असा झाला आहे कीं, त्यानें स्वतःला देवाच्या जागीं नेऊन बसविलें आहे. देवापासून झालेल्या फारकतीमुळें मनुष्य स्वतःलाच अंतरला असून आपल्या बंधुजनांसहि तो अंतरला आहे. साम्राज्यवाद, वर्गकलह, हुकुमशाही आणि पिळणुकीच्या इतर प्रकारावरून हेंच दिसून येतें. ह्या बाबतींत ख्रिस्ती मत असें आहे कीं, आत्मप्रीति ही नुसती अपघाती प्रवृत्ति नाहीं, वातावरणांत बदल झाल्यानें ती नाहींशी होणारी नाहीं. सत्तेमध्यें माजलेला भ्रष्टाचार सामाजिक जीवनात चोहोंकडे पाहावयास मिळतो. ह्याचा अर्थ असा नव्हे कीं, सत्तेच्या विकृत रूपाकडे आपण डोळेझाक करावी. वास्तविक पाहता अशा प्रकारापासून लोकांचें संरक्षण करण्यात आलें पाहिजे. यासाठीं मानवी स्वातंत्र्य आणि राज्यसत्ता यांच्या संरक्षणासाठीं सरकार ही संस्था आवश्यक आहे. आता सरकारहि या विकृतीला बळी पडणारें असल्यामुळें खुद्द सरकारी यंत्रणेत नियंत्रणें असण्याची आवश्यकता निर्माण होते. असें झालें तर मानवी स्वातंत्र्याचा पुरस्कार होईल, गळचेपी होणार नाहीं. रिचर्ड क्रॉसमन

यानें न्यू फेबियन एसेजमध्ये ब्रिटिश मजूर पक्षाच्या तत्त्वप्रणालींचा परामर्श घेतला आहे. यांत त्यानें मजूर पक्षाचें महत्त्व कमी होण्याचें एक कारण म्हणून मानवी विकृतीकडे गंभीरपणें पाहण्यास समर्थ करणाऱ्या ऐतिहासिक तत्त्वज्ञानाचा अभाव याचा उल्लेख केला आहे. तो म्हणतो, "प्रगतीचें उत्क्रांतिप्रधान आणि क्रांतिप्रधान तत्त्वज्ञान खोटें ठरलें आहे खरें पाहूं जातां रॉसोचें कुलीन रानटी मनुष्याचें कल्पनाचित्र किंवा मार्क्सचा वर्गविहीन समाज यांच्यापेक्षा मूळ पापाचा ख्रिस्ती सिद्धांत अधिक समर्थनीय आहे." पापासंबंधींचा ख्रिस्ती सिद्धांत मनुष्य आणि राज्यसत्ता यांविषयींच्या आमच्या कल्पनेला वास्तवतेची जोड देऊन भारतांत आज चालू असलेल्या राजकीय तत्त्वज्ञानांत अनुस्यूत असलेल्या काल्पनिक सुख वादामध्यें एक सुधारणा. तत्त्व बायबल म्हणतें कीं, दुष्टांना शासन करण्यासाठीं आणि सज्जनांचा गौरव करण्यासाठीं देवानें राज्यसत्तेची "योजना" केली आहे, आणि ह्या हेतुसाठींच सरकारच्या हातीं शासनसत्ता दिलेली असते अहिंसा तत्त्वावर राज्य स्थापन होईल किंवा पार्लमेंटचा कायदा लोकांना सद्वर्तनी बनवूं शकेल अशी अपेक्षा आपणाला करतां येणार नाहीं. पण सरकारपासून आम्हाला एक मागणी करता येईल कीं, त्यानें देशांत सुव्यवस्था राखावी आणि असे कायदेकानू करावेत. कीं, त्याच्या चौकटींत अहिंसा तत्त्वाच्या परिपालनाला आणि मनुष्य सद्वर्तनाकडे आणि देवाकडे वळावा यासाठीं चालू करण्यांत आलेल्या कार्याला मोकळीक असावी

संग्रहालय
अनुक्रम 30854
IRBK-0106368